# मुग्धा कर्णिक

# शब्दांचीच वस्त्रे धैर्यास माझ्या



# शब्दांचीच वस्त्रे धैर्यास माझ्या

डॉ. मुग्धा कर्णिक

ई साहित्य प्रतिष्ठान

# शब्दांचीच वस्त्रे धैर्यास माझ्या
डॉ. मुग्धा कर्णिक

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

# ई-प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

Whatsapp: **9987737237**

प्रकाशन: ८ मार्च २०२२ (आंतरराष्ट्रीय महिला दिवस)

©esahity Pratishthan®2022

• विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.

• आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

• हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई-साहित्य प्रतिष्ठानची परवानगी घेणे आवश्यक आहे.

## छापील आवृत्ती प्रकाशक- लेखिका डॉ. मुग्धा कर्णिक

लेखिकेचा परिचय

डॉ. मुग्धा कर्णिक

जन्म १९६०

शिक्षण एम् ए समाजशास्त्र

अनुवादशास्त्रात डॉक्टरेट



डॉ. मुग्धा कर्णिक या १९९१ पासून २०१८पर्यंत- संचालक- बहिःशाल शिक्षण विभाग, मुंबई विद्यापीठ होत्या. सामाजिक शैक्षणिक क्षेत्रात मुंबई विद्यापीठाच्या बहिःशाल शिक्षण विभागाच्या संचालक म्हणून २७ वर्षे कार्यरत होते. २०१८ साली निवृत्त झाल्या.

या काळात त्यांनी कोकणच्या ग्रामीण जिल्ह्यांत २००२ पर्यंत विविध शैक्षणिक उपक्रमांचे आयोजन केले

त्यांच्या राजकीय लिखाणामुळे त्या मराठी परिघात समाज माध्यमांतून प्रसिद्ध आहेत. गेली अनेक वर्षे वृत्तपत्रांतूनही सामाजिक-राजकीय लेखन केले आहे. अनेक अनुवाद केले आहेत.द कुकिंग विच या नावाने त्यांनी केलेले खाद्यपदार्थांच्या कृतीचे लेखनही लोकप्रिय आहे. शैक्षणिक शिबिरांचे डिझाइनिंग आणि अंमल. यात गणित, खगोलशास्त्र, वैद्यकशास्त्र, पोषणशास्त्र, जीवशास्त्रातील वनस्पती आणि प्राणीशास्त्रविषय, पर्यावरणशास्त्र, अंधश्रध्दा निर्मूलन, नाट्यप्रशिक्षण, कला या विषयांवरील कार्यक्रम सुमारे पन्नास गावांतून केले. त्याच वेळी मुंबई शहरात विविध

खुल्या- विनाअट प्रमाणपत्र अभ्यासक्रमांची आखणी. इंडिया स्टडी सेंटर ट्रस्ट या शैक्षणिक ट्रस्टच्या त्या व्यवस्थापकीय ट्रस्टी असून या ट्रस्टमधून भारताचे भूशास्त्र, जीववैविध्य आणि पुरातत्वीय अभ्यास या क्षेत्रात काम केले जाते. निवृत्तीनंतर त्या या ट्रस्टचे पूर्णवेळ काम पाहातात. कोविड काळात ७५ ऑनलाईन अभ्यासक्रमांचे आरेखन आणि आयोजन त्यांनी केले.

त्यांची आजवरची प्रसिद्ध पुस्तके:

सहस्रकातील विज्ञान, वृक्षराजी मुंबईची, सेंट्रीज ऑफ मुंबई या तीन पुस्तकांचे संकल्पन आणि संपादन, प्रकाशन.

आयन रॅन्ड लिखित ॲटलस श्रग्ड, द फाउंटनहेड या दोन महाकादंबऱ्याचा अनुवाद.

मालाकाईट कॅस्केट या उरालच्या लोककथांचा अनुवाद

जे आर आर टॉल्कीनच्या लॉर्ड ऑफ द रिंग्ज या जगद्विख्यात अद्भुत महाकादंबरीचा अनुवाद

क्लायमेट चेंज रिकन्सिडर्ड या पुस्तिकेचा अनुवाद


आय ऍम अ ट्रोल, शॅडो आर्मीज, द गॉड डिल्यूजन, ऑन टिरनी, द रीयुनियन या राजकीय पुस्तकांचे अनुवाद.

७० हून अधिक इंग्रजी कवितांचे अनुवाद.

याच बरोबर त्यांनी विपुल स्फुटलेखन केले आहे.

मुग्धा कर्णिक यांचे ई साहित्यवरील पहिले पुस्तक.

कव्हरवर क्लिक करताच उघडेल.



या पुस्तकातील माहिती, संदर्भ व मते सर्वस्वी लेखिकेची स्वतःची आहेत. या सर्वांशी ई साहित्य प्रतिष्ठान सहमत असेलच असे नाही.

टीम ई साहित्य

## मनोगत-

आजवर विविध कारणांनी, विविध निमित्तांनी स्त्रियांसंबंधी मी माध्यमे आणि समाजमाध्यमे यातून जे स्फुटलेखन केले ते सारे लेख या पुस्तकात एकत्रित केले आहेत.

यातील अनेक प्रासंगिक निमित्तांमुळे लिहिले असल्याने ते ते संदर्भ यात येतात. संदर्भ शिळे झाले तरी त्यावर केलेले विचार भाष्य सतत ताजेच रहातील अशी परिस्थिती दुर्दैवाने इथे आहे. वाचकांना यातून काहीतरी विचार मिळेल, स्वतःच्या मतांचा पुनर्विचार करण्याची इच्छा होईल आणि काहींच्या परिसरात, वर्तनात काही ना काही बदल होईल अशी आशा या संकलनामागे आहे.

देशावरील नव्या उजव्या राजवटीत, हिंदुत्वाचा नाझीवाद करण्याची घाई लागलेल्या झुंडीत सामान्य स्त्रियांवरील अन्याय घरोघरी वाढेल, राजकारणात वाढेल, समाजाचा समहिस्सेदार म्हणून स्त्रियांचे अस्तित्व पुसट करण्याचे प्रयत्न होतील हे चित्र स्पष्ट होत चालले आहे. जरा जागं करण्यासाठी काहीसा आक्रोश या संकलनात केला आहे. ही काही सैद्धांतिक मांडणी नाही. साध्यासुध्या वाचक स्त्रीपुरुषांच्या मनांपर्यंत पोहोचण्याचा हा एक वैचारिक आणि सहवेदनाशील प्रयत्न

ई-साहित्य प्रतिष्ठानच्या निःशुल्क इ-पुस्तकांच्या प्रकल्पातून हा आक्रोश काही वाचत्या मनांपर्यंत पोहोचावा. शब्दांचीच शस्त्रे या माझ्या पहिल्या लेखसंग्रहाचे प्रकाशन ई-साहित्यने केल्यामुळे या पुस्तकांचा प्रतिसाद मला कळला. म्हणून हे आणखी एक.

शब्दांचीच शस्त्रे आम्हा स्त्रियांच्या रक्षणासाठी आणि शब्दांचीच वस्त्रे आम्हा स्त्रियांच्या सन्मानासाठी.

हे पुस्तक सावित्रीबाई फुले आणि त्यांच्या सर्व लढाऊ कन्यांस अर्पण.

डॉ. मुग्धा कर्णिक

या छोट्याशा, एकुटवाण्या ग्रहावरचे आम्ही लोक
करतो प्रवास सहजसंथ अवकाशातून
तुसड्या ताऱ्यांजवळून, अलिप्तशा सूर्यांच्या कक्षांना ओलांडून
निघालो आहोत एका स्थळाकडे, संकेत मिळत आहेत
की अखेर नुसते शक्यच नव्हे, आवश्यक आहे
आम्हाला धैर्यशील आणि अनपेक्षित सत्य कळणे

-माया अँजेलौ- स्त्रीवादी कवी

लेखानुक्रम

1. टोळ्यांमधले पुरुष आणि स्त्रियांच्या हाका
2. मी आहे एक काटेरी स्त्री...
3. खैरलांजीचा दुःखकलंक
4. कॅरोलिन हर्शेल आणि जोसेलिन बेल
5. शनीचार अर्थात शनीचा वेडाचार
6. बहूत नाइन्साफी है...
7. सामग्रीची काळजी
8. एका यादीचा कल्लोळ...
9. विवेकनिष्ठा आणि स्त्री
10. सोन्याची वेसण
11. दिवाळीच्या फराळाची नस्ती कसरत
12. स्त्री- एक तितकीच उत्क्रांत मानव
13. शिवराळांचा विरोध स्त्रियांनीच केला पाहिजे
14. न स्त्री मोबाईलम् अर्हति
15. किती काळजी... किती काळजी...
16. शब्द-अपशब्द
17. साथीच्या महामारीत स्त्रिया...
18. अडसर झालेल्या प्रतिगामी स्त्रियांची कहाणी
19. धैर्य
20. भारतीय स्त्रीची कदान्नदशा...
21. कुंकवाची उठाठेव! पॅटची उठाठेव
22. मानवजन्मदात्या योनीचा अवमान- नेहमीचीच गोष्ट
23. सुहैला अब्दुलअली: निर्भयतेचे दुसरे नाव
24. स्फुल्लिंग धैर्याचे
25. दूध मागणाऱ्या भिकारणी...

# टोळ्यांमधले पुरुष आणि स्त्रियांच्या हाका

थोडेथोडे बदल होऊ लागलेत- थोडीशी नवीन प्रगत उत्क्रांत तत्वे झिरपू लागली आहेत असं वाटू लागलेलं असतं आणि दाण्णकन भ्रमाचा भोपळा फुटून त्याच्या चिरफळ्या उडाव्यात असं झालं नागालँडच्या स्त्री-आरक्षण विरोधाची बातमी वाचून. आमच्या संस्कृतीशी, टोळी-संस्कृतीशी हे विसंगत आहे म्हणत स्त्रियांसाठी असलेल्या ३३ टक्के राजकीय आरक्षणाला नागालँडच्या पुरुषांनी विरोध केला आहे. पुरुषसत्ताक, पितृसत्ताक टोळ्यांचे विशेष हक्क अबाधित राखणं हे घटनेचं काम आहे, तसं आश्वासन घटनेचे कलम ३७१ (अ) मध्ये आहे म्हणत नागालँडची पुरुषटोळी विरोधात उतरली आहे.

नागालँडमधील टोळ्यांत लोकशाही व्यवस्था फार प्राचीन आहे वगैरे आपण ऐकून असतो. गावामध्ये गावसंसद असते आणि त्यातून सारा कारभार निर्णयन चालते. खरेच आहे हे. पण या तथाकथित लोकशाहीत तिथल्या अर्ध्या लोकसंख्येला म्हणजेच स्त्रियांना थारा नाही. खाजगी मालमत्तेचा, वारशाचा हक्क स्त्रियांना नाही. स्त्री ही घरातील पुरुषाच्या वर्चस्वाखाली असते आणि तिला स्वयंनिर्णयाचा अधिकार नाही हे या तथाकथित लोकशाहीचे मूळतत्व. त्यामुळे ही लोकशाही नसून थोडक्यात पुरुषगणशाही आहे. जागतिकीकरणानंतर जे काही बदलाचे वारे जगाच्या कानाकोपऱ्यांत घुसले ती हवा नागालँडलाही लागली. तेथील

स्त्रिया- वारशाने आलेली मालमत्ता मिळवू शकत नाहीत- किंबहुना म्हणूनच नागालँडच्या अनेक स्त्रियांनी शिक्षण घेतले. नोकऱ्या करायला सुरुवात केली. तेथील शासकीय नोकऱ्यांत त्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेमुळे पन्नास टक्के स्त्रिया आहेत. यामुळे सामाजिक संरचना बदलणार आहेच. पण परंपरागत अधिकारांची सवय झालेला नागा पुरुष हातचे वर्चस्व जाऊ देऊ इच्छित नाही. म्हणून आमच्या टोळीत अपवाद करावा आणि आमच्या स्त्रियांना आरक्षण देऊ नये ही मागणी पुढे येत आहे. अर्थातच सुशिक्षित नागा तरुणी याचा विरोध करतील आणि ही लढाईही त्या कधी ना कधीतरी जिंकतील.

स्त्रीवादी भूमिकेतून मांडल्या जाणाऱ्या मतांच्या संदर्भात काही नरपुंगव अशा स्त्रियांना दात काढून फेमि‘नाझी’ म्हणत असतात. गंमतीगंमतीत चाललेल्या चर्चांमध्ये असले शाब्दिक खेळ क्षम्यही मानले जातात. पण नाझी या शब्दाचा सांगोपांग विचार करण्याचे दिवस जगभर आलेले असताना आपण नेमक्या कोणत्या विचाराची खिल्ली उडवतो आहे याचे मनन अशा लोकांनी जरूर करावे.

नागालँड तर दूर भारताच्या कोपऱ्यात आहे आपल्यापासून. (अनेक लोकांना ते विदेशी चिंकी वाटतात हा आणखी एक अज्ञानाचा भाग). पण अशा प्रकारे स्त्रियांचे हक्क डावलणे, परंपरागत पुरुषप्रधान मानसिकतेतून त्यांचे हक्काचे पैसे बळकावणे, त्यांना मालमत्तेत वाटा न देणे हे सारे प्रकार आपल्याच अवतीभोवतीचे बापभाऊनवरे निर्लज्जपणे करीत असतात.

नुकत्याच झालेल्या नोटाबंदीच्या अखिल भारतीय संकटानंतर देशभरात एक गोष्ट सारखीच पाहाण्यात आली. घराघरांतून बाहेर नोकरी न करणाऱ्या, घरातच कष्ट

उपसणाऱ्या आणि त्याचे नगद मोल न मिळणाऱ्या बायकांनी डब्याडुब्यांतून नवऱ्याच्या चोरून काही रोख पैसे साठवले होते. किती विविध कारणं असतात हे असे चोरून पैसे साठवण्यासाठी... घरातील अडीअडचणीच्या वेळी कामी यावेत म्हणून, सणासुदीला पोराबाळांना काही चीजवस्तू घेता यावी म्हणून, माहेरचे पाहुणे आले तर त्यांच्या स्वागतासाठी कदाचित् दमडा मिळणार नाही म्हणून लाज झाकण्यापुरते आतिथ्य करता यावे म्हणून, मासिक पाळीसाठी पॅड्स विकत घेता यावीत म्हणून, आतल्या कपड्यांसाठी पैसे द्यायला नवरा रडवतो आणि घरात सांगायची लाज वाटते म्हणून... कल्पनाही करवणार नाही असली कारणं असतात बायांनी चोरून पैसे साठवण्याची.

नोटाबंदीनंतर अनेक बायकांकडे पाचशे हजारच्या नोटा साठवलेल्या पैशात होत्या. दोनतीन हजार रुपयांपेक्षाही कमी रक्कम... मोलाची बचत बिनमोलाची होऊ नये म्हणून या सगळ्या बायांनी साठवलेले पैसे नवऱ्यांकडे दिले- नोटा बदलून आणायला- कारण बॅंकेत जाणं हे अजूनही फक्त पुरुषांनीच करायचं असतं. बऱ्याच जणींना पैसे बाजूला टाकल्याबद्दल चोरीचा आरोप ठेवून नवऱ्यांनी मारहाण केली. शिव्या दिल्या. पैसे बदलून आणल्यानंतर ते पैसे नवऱ्यांनीच खिशात घातले. आणि नंतर कोणत्याही प्रकारे रोख हातात देणे बंद केले. मध्य प्रदेशमधील अक्शन एड संस्थेच्या वन स्टॉप अक्शन सेंटरने एक पाहाणी केली, त्यातून त्या राज्यातील हकीकती अहवाल रुपात आल्या आहेत. नऊ नोव्हेंबरला एका चोवीस वर्षाच्या बाईला- तिच्या चार पोरांसकट नवऱ्याने घराबाहेर काढले- कारण तिच्याकडे चार हजार पाचशे रुपये  निघाले. दुसऱ्या एका आईने आपल्या तेरा वर्षाच्या मुलीच्या

इन्शुलीनसाठी नवरा पैसे देत नाही म्हणून चोरून पैसे बाजूला टाकले होते. नवरोबांनी तिला मारमारून मुलीसकट बाहेर काढले.

आमच्या आजुबाजूच्या अनेक गरीब घरांतल्या कष्टकरी बाया घरी जाऊन नवऱ्याचा मार खातात. पैसे त्याला काढून देतात कारण मार खाऊनखाऊन त्यांची सहनशक्ती संपलेली असते. एखादा पुरुष बाईला लाथाबुक्क्यांनी मारतो तेव्हा तिचं शरीरच नव्हे तर तिचा आत्माही चेचून निघतो हे पाहिलंय कधी तुम्ही डोळयांनी?

हे आहे पुरुषसत्ताक मानसिकतेच्या समाजाचे कर्तृत्व.

ते आदिवासी टोळींतल्यांचेही असते, सुसंस्कृतीच्या इतिहासाचे ढोल बडवणाऱ्या ख्रिस्ती, इस्लाम, ज्यू, हिंदू, जैन, बौध्द या सर्व धर्मांतूनही ते दिसते. सर्व काळया, पिवळया, गव्हाळ, गोऱ्या वर्णांतूनही दिसते.

डाएश किंवा आयसिसच्या नराधमांनी सिरीयाच्या सीमेलगतच्या एका गावातून पंधराशे स्त्रिया, लहान मुले पळवली आणि त्यांना गुलाम बनवले. त्यातील एका अगदी लहान वयातच आयसिसच्या जिहादी मूर्खांची वासना भागवण्यासाठी अनंतवेळा वापरल्या गेलेल्या तरुणीने स्वतःची कशीबशी सुटका करून घेतली. ती आता डाएशच्या कृष्णकृत्यांविरुध्द जाहीरपणे बोलते आहे, फिरते आहे. जीवन असून नसल्यासारखे करणाऱ्या या संघटनेच्या जबड्यात तिच्याबरोबरच्या हजारो मुली अजूनही रोज लचके तोडल्या जात आहेत. मेल्यावर बहात्तर हूर मिळणार असतानाही जगताना या नराधमांना कुणाचाही उपभोग घ्यायचा असतो हा एक दारूण विनोद.

स्त्रीच्या बाबतीत अनेक पुरुषांची नैतिकता चुटकीसरशी थिजून जाते कारण स्त्री ही दुय्यमच आहे हा विचार गेल्या दोन सहस्रकांपासून अब्राह्मनिकल धर्मांनी आणि हिंदू-ब्राह्मणी धर्माने संथ विषप्रयोगासारखा भिनवत नेला आहे.

स्त्रियांना आता खूपच चांगले दिवस आले आहेत हे खरंच आहे, कारण त्यांनी ते लढूनझगडून मिळवले आहेत. तरीही घरातला मानसिक छळवाद, मारहाण, अपेक्षांचे गलिच्छ गाठोडे वागवत आला दिवस जगणाऱ्या अनेक स्त्रिया जगभर आहेत. म्हणूनच अजूनही स्त्रीवरील अन्यायाबद्दल बोलत राहिलंच पाहिजे. खरा नाझीवाद पुरुषच राबवतात हे न ओळखता स्त्रीच्या हक्कांबद्दल बोलणारांनाच अजूनही  फेमिनाझी म्हणून हिणवणाऱ्या मठ्ठांना अक्कल येवो.

त्यांना रोखणाऱ्या पुरुषसत्ताक मानसिकतेच्या गुलाम झालेल्या अडाणी स्त्रिया आणि नरजन्माला आले म्हणजे झेंडे रोवले असे मानणारे पुरुष असे त्यांचे पाय ओढत राहिले तरीही त्या पुढे जात आहेत. नागालँडच्या टोळयांमधल्या, कुठल्याही टोळयांमधल्या, जगभरातल्या धार्मिक निष्ठांवंतांच्या मूर्खपणाच्या वरवंट्याखाली स्वतःहून सापडण्याचं नाकारणाऱ्या स्त्रियांची संख्या वाढत राहो.

लढाऊ स्त्रीवादी कवयित्री माया अँजेलौच्या एका कवितेतील या काही ओळी नागालँडच्या लढाऊ स्त्रियांसाठी, मार खाऊनही पोरं जगवणाऱ्या स्त्रियांसाठी...

*... तरीही मी उठतेच आहे...*

*जरूर लिहा तुम्हीच रचलेल्या इतिहासात माझ्याबद्दल तुम्ही*

*तुमची कडूजहर, विकृत असत्ये*

*मला अगदी धुळीला मिळवू पाहाल तुम्ही*

*पण तरीही मी उठेन, उधळेन धुळीसारखीच.*

*मला मोडून पडलेलं पाहायचं होतं तुम्हाला?*

*मस्तक झुकवून आणि नजर खाली करून?*

*पाहायचे होते माझे खांदे ओघळलेले- अश्रूच्या थेंबासारखे*

*माझ्या आक्रोशाने दुबळे झालेले?*

*जरूर करा मला घायाळ तुमच्या शब्दांनी*

*विंधून टाका तुमच्या नजरांनी*

*तुमच्या द्वेषाच्या धारेने मी मरेनही ठार*

*पण तरीही मी उठेन, वाऱ्यागत.*

*इतिहासाने शरमेचं म्हणून जे दडवलं त्यातून बाहेर पडून*

*मी उठतेय*

*वेदनांच्या कल्लोळात रुतलेल्या भूतकाळातून*

*मी उठतेय*

*काळाशार समुद्र आहे मी. असीम, झेपावता*

*भरतीच्या लाटेबरोबर आहे मी*

*जी वाढत जाते, प्रलयंकर होत जाते*

*भयाचा अंधार आणि आतंकाच्या रात्री... मागे टाकून*

*मी उठतेय*

*नवलस्फटिकी पहाटेच्या झांजरवेळेत शिरून*

*मी उठतेय*

*माझ्या पूर्वजांनी दिलेले नजराणे घेऊन मी उठतेय*

*मी आहे स्वप्न आणि आशा गुलामीत असलेल्या कुणाचीही*

*मी उठतेय*

*मी उठतेय*

*मी उठतेय*

*****

# मी आहे एक काटेरी स्त्री...

अमेरिकेसारख्या बलाढ्य लोकशाहीचे नेतृत्व ट्रम्पसारख्याच्या हाती निवडणूक प्रक्रियेतून गेले खरे. पण त्यांच्या कारकीर्दीच्या पहिल्या दिवसापासून त्यांचा ऐतिहासिक ठरेल असा विरोध सुरू झाला. कुणीही वाट पाहिली नाही- त्यांना थोडा वेळ द्या वगैरे लाघवी समजूतदार शब्दांच्या निसरड्या दलदलीत तिथली विरोधी जनता फसली नाही. शपथविधी झाला त्याच्या दुसऱ्याच दिवशी, २१ जानेवारी २०१७ या दिवशी अमेरिकेच्या राजधानीत वॉशिंग्टन डीसी मध्ये आणि सर्व महत्त्वाच्या शहरांत स्त्रियांचे आणि त्यांच्या सोबत असलेल्या सर्व पुरुष, भिन्नलिंगी, भिन्नकाम लोकांचेही प्रचंड मोर्चे निघाले. ही लाट प्रचंड होती. तिचे रोंरावणे नव्या सत्ताधाऱ्यांचे कानफाट फोडणारे होते.

ट्रम्पनी निवडणूकीत उतरण्या आधीपासून आणि प्रचाराच्या धुळवडीत असताना स्त्रियांविषयी, भिन्नलिंगी, भिन्नकामी, अपंग, इतरवंशीय, मुस्लिम किंवा इतर धर्मीय यांच्या विरोधात अत्यंत अपमानास्पद वक्तव्ये केली होती. पण त्यांचे पूर्वीचे म्हणजे २००५ सालातले स्त्रियांविषयीचे काही उद्गार रेकॉर्ड करण्यात आले होते. आणि त्या टेप्स प्रचाराच्या काळात बाहेर आल्या. हे उद्गार त्यांच्या व्यक्तिमत्वातील हीण अगदी वाऱ्यावर फडकावणारे होते. अनेक स्त्रियांनी त्यांनी केलेल्या लैंगिक वर्तनाबद्दल, जबरदस्तीबद्दल, गलिच्छ वर्तनाबद्दल पुढे येऊन

तक्रारी केल्या. त्या सगळ्या खोटे बोलत आहेत असे निर्लज्जपणे सांगणारा हा इसम अखेर अध्यक्ष झाला. अनपेक्षितपणे समाजातील गलिच्छ वृत्ती जिंकतात कधीकधी... हे माहीतच आहे आपल्याला.

ज्या पन्नास टक्के मतदारांनी त्याला नाकारले ते सारे मतदार- ‘काय करायचं लोकशाहीत निवडून आलेल्याचा आदर करणे भाग आहे आपल्याला’ वगैरे बंडल कारणे देत गप्पा बसले नाहीत. अध्यक्षपदाची सूत्रे हाती घेण्यासाठी त्यांना जो अवधी मिळाला त्याचा त्यांनी पुरेपूर वापर केला.

आणि कारकीर्दीच्या पहिल्याच दिवशी अभूतपूर्व असा मोर्चा निघाला. आणि यात जी काही वादळी भाषणे झाली, त्यांचा जो प्रतिसाद होता तो पाहाता ही लोकशाहीप्रेमी जनता, ही शांतीप्रेमी जनता आता युध्दस्वी, द्वेषमूलक अशा राजकारणाला विरोध करीत राहील हे स्पष्ट आहे.

या मोर्चात सहभागी झालेल्या काहींची भाषणे इतिहासात कायम संस्मरणीय म्हणून नोंदली जातील. अनेक स्त्रीवादी चळवळीतील विचारवंत, कलावंत, अभिनेते, गायक यात सहभागी झाले होते.

ट्रम्पनी त्यांच्या त्या फुटलेल्या टेपमध्ये असे म्हटले होते की बाया गटवायच्या तर त्यांच्या xxx पकडल्या तर काम साधतं. या टेपनंतर सारा सुसंस्कृत समाज त्यांच्या विरुध्द गेला. नंतर ते स्वतःच्या पोटच्या पोरीबद्दलही असेच असंस्कृतपणे बोलले. किती सुंदर आहे ती, तिचं शरीर जगातलं बेस्ट आहे. आणि माझं लग्न झालेलं नसतं आणि मी तिचा बाप नसतो तर मी तिला xx केलं असतं. असले उद्गार

त्याने एकाच नव्हे तर अनेक ठिकाणी काढले. पण कदाचित् असंस्कृत, नीच आवडीनिवडी असलेल्या मतदारांची संख्याही तेवढीच बलवत्तर होती. आणि इतक्या घाणेरड्या पातळीवरची मानसिकता गर्वाने मिरवणारा हे मनुष्य निवडून अमेरिकेच्या अध्यक्षपदी विराजमान झाला.

या घटनेने जनमानसात तीव्र कल्लोळ उसळला आणि व्यक्त झाला ही एका प्रगत लोकशाही वृत्तीचीच खूण आहे. या मोर्चात तरुणींबरोबर अगणित वृध्द स्त्रियाही आलेल्या. त्यातली एक वृध्दा म्हणाली- माझा विश्वास नाही बसत. अजूनही या गोष्टी आम्हाला गृहीत धरता येत नाहीत. अजूनही कुणी आम्हाला अवमानित करते... आमच्या हक्कांवर गदा आणते. अशक्य वाटतंय हे.

मानव्याबाबत मागास विचारांचे रिपब्लिकन सत्ताधारी स्त्रियांच्या संततीजन्म थांबवण्याच्या स्वयंनिर्णयावर निर्बंध आणू इच्छिते. गोऱ्या अमेरिकनांना विशेष हक्क असावेत, बाकीच्यांना हाकून लावावे किंवा दुय्यम स्थान द्यावे हा त्यांचा अजेंडा आहे. गन कंट्रोल व्हावा, पोलिसांनी काळया लोकांवर अन्याय करणे थांबवावे असे त्यांना अजिबात वाटत नाही. एलजीटीबी समुदायाला ख्रिस्ती धर्मानुसार शिक्षा व्हावी असे त्यांना मनापासून वाटते. मुस्लिम धर्माविरुध्द नव्हे तर मुस्लिम धर्मीयांविरुध्द फायनल सोल्यूशन वापरले जावे असे उघड बोलणारे अनेक आहेत त्यांच्यात. आरोग्यसेवा ही परवडण्यासारखी ठेवण्याचं काहीच कारण नाही (मरू देत भिकारड्यांना) हे त्यांचं मत आहे. पर्यावरणासंबंधी बड्या कंपन्यांच्या आड येणारे सर्व नियम रद्द करावेत असं वाटतं त्यांना. या अनेक प्रश्नांच्या बरोबर स्त्रियांबाबत गलिच्छ बोलणारा माणूस त्यांचा मेरूमणि आहे.

या एकंदर नैतिक पीछेहाटीच्या प्रवासाविरुध्द आवाज उठवायला अमेरिकेभरच्च्या स्त्रियांनी जबरदस्त ऐक्यप्रदर्शन केले.

मेरिल स्ट्रीप या विख्यात अभिनेत्रीने जणू या संकल्पनेला आपल्या गौरवस्वीकाराच्या भाषणातून तोंड फोडले होते. ट्रेवर नोव्हा सारख्यांनी ट्रम्पची सालडी काढली होती. पण या मोर्चात झालेल्या भाषणांनी अमेरिकन जनतेचा खरा नैतिक चेहरा जगासमोर झळाळून आला.

लाखो माणसे एकत्र आली होती. ट्रम्पच्च्या ग्रॅब देम बाय द पुसीज् या हिणकस वाक्याचा संदर्भ घेऊन सर्वांनी लोकरीने विणलेल्या मांजरटोप्या घातलेल्या. प्रेमशांतीचा रंग म्हणून गुलाबी रंगाची उधळण होती.

या मोर्चात ॲश्ली ज्यूड या हॉलिवुड अभिनेत्रीने आपल्या जबरदस्त आवाजात निना डोनाव्हॅन या एकोणीस वर्षाच्या तरुणीने लिहिलेले गद्यकाव्य भाषण म्हणून वाचून दाखवले. डॉनल्ड ट्रम्प यांनी एका परिषदेत पुटपुट केली होती. हिलरीला उद्देशून ते म्हणालेले- वॉट अ अ नॅस्टी वुमन... मायक्रोफोनने ती पुटपुट सर्वांपर्यंत पोहोचवली होती. त्याच दिवशी निना डॉनावेनने ती कविता लिहायला घेतली- आय ॲम अ नॅस्टी वुमन... महिनाभर ट्रम्पची मुक्ताफळे आणि रिपब्लिकनांची धोरणे निरखत राहिली ती. आणि ही दीर्घ गद्य कविता पूर्ण केली. नंतर ती अनेक ठिकाणी वाचलीही गेली. ॲश्ली ज्यूडने ही कविता वॉशिंग्टनच्या मोर्चात सादर करण्याचा प्रस्ताव तिला दिला. अमेरिकेच्याच नव्हे तर जगभरातील स्त्रीवादी चळवळीमध्ये- अन्यायग्रस्तांच्या उद्धारामध्ये खतरनाक प्राण भरण्याची ताकद या आविष्करणात आहे.

ॲश्ली ज्यूडने ही कविता जणू सर्व संतप्त स्त्रियांचा आत्मा त्यात ओतून अभिव्यक्त केली. हे संतापाचे आविष्करण मुळातून पाहावे असेच.

लांबलचक आहे कविता. अमेरिकन शिव्या भरपूर आहेत त्यात- भद्र समाजाच्या संकेतांच्या चौकटीत न बसणाऱ्या. पण या काही ओळी पुढे देते आहे...

*मी आहे एक काटेरी स्त्री*

*पण इतकीही काटेरी नाही*

*जितके काटेरी आहेत हे रंगवलेले गर्वाचे झेंडे स्वस्तिकचिन्हासह*

*माहीत नव्हतं मला सैतानांचंही पुनरुत्थान होतं म्हणून...*

*पण आज या रस्तोरस्ती जाणवतो मला हिटलर...*

*मिशीची जागा घेतलीय टकलाचा भाग झाकणाऱ्या केसाच्या टोपाने*

*कॅबिनेट मंत्रीमंडळ म्हणतात पण आहेत नाझीच...*

*नवी गॅसचेम्बर्स आहेत इलेक्ट्रोकन्वर्जन थेरपी...*

*अमेरिकेतून भिन्नकामी माणसांना हाकून लावणारी...*

*इंद्रधनुष्यांचे रंग बदलून विखरतील आत्महत्यांची पत्रे अखेरची.*

*मी नाही इतकी काटेरी- वर्णद्वेषाइतकी, अफरातफरीइतकी,*

*हितसंबंधांच्या खणखणाटाइतकी...*

*भिन्नलिंगी-भिन्नकामी व्यक्तींच्या तिरस्काराइतकी...*

*श्वेतवर्णवर्चस्वाच्या आग्रहाइतकी, स्त्रीद्वेषाइतकी, अज्ञानाइतकी,*

*गोऱ्यांना विशेष हक्क हवेत म्हणणारांइतकी...*

*पण तरीही म्हणता मी आहे काटेरी स्त्री!?*

*मग होय तर, आहे मी- संतप्त, शिवराळ आणि स्वाभिमानी स्त्री...''*

अमेरिकेत या गद्यकाव्याचे दमदार पडसाद उमटत आहेत. वादळ रोंरावत फिरतंय.

बॉब डिलानच्या भाषेत जणू एक उत्तर वाऱ्यासवे घोंघावतंय...

जणू ही कविता या वादळाचा पाहता डोळा ठरली आहे. मॅडोना या पॉप आय़कॉननेही जोरदार भाषण केले. शिव्या घातल्या. ती म्हणाली, स्वतंत्र असण्यासाठी, आपलं अस्तित्व जपण्यासाठी, समान वागणूक मिळण्यासाठी हा लढा आहे. या अंधारातून बाहेर पडण्यासाठी आपण सारे एकत्र चालत जाऊ या.

ती पुढे म्हणाली- ट्रम्प निवडून आल्यावर मी इतकी अस्वस्थ झाले की व्हाईट हाऊस उडवून द्यावं असं वाटलं मला. पण त्यातून काहीच साध्य झालं नसतं. आपल्याला क्रांती करायची आहे- प्रेम आणि शांतीची. त्यासाठी आपल्याला संतत विरोध करावा लागेल...

ही निदर्शने सुरू असताना ट्रम्प सीआयएच्या कचेरीला पहिली भेट देऊन व्हाईट हाऊसकडे परतत होते... त्यांच्या मोटरताफ्यापर्यंत वादळाचा आवाज पोहोचत होता. सीआयए तर सारंच ऐकत असते. व्हाईट हाऊस उडवून देण्याचा विचार संताप व्यक्त करण्यासाठी बोलून दाखवल्यामुळे मॅडोनाची चौकशी करायचे आदेश निघाले

आहेत. सीआयए मागे लागणार आहे. काटेरीपणाचा काटा काढण्याचे प्रयत्न सुरू होतील.

भारतातही असे काटे काढणारी सेना कामाला लागतेच. आपण सारे एकच आहोत. सर्वतोपरीने. आणि तरीही वादळ उठतंच नैतिकतेच्या चिरंतन कल्पनांच्या केंद्रांतून.

# खैरलांजीचा दुःखकलंक

भैय्यालाल भोतमांगे यांच्या अचानक मृत्यूनंतर पुन्हा एकदा तळाशी बसलेला खैरलांजीचा दुःखकलंक ढवळून वर आला. २००६मध्ये ही भयानक घटना घडली. २९ सप्टेंबर २००६ हा दिवस महाराष्ट्राच्या जातीय अत्याचारांच्या इतिहासातील आणखी एक काळाकाळाकुट्ट दिवस. आज अनेक तरुणांना या खैरलांजी घटनेची माहितीसुध्दा नाही. कोपर्डी खून आणि अत्याचाराच्या घटनेने अंतःकरण पिळवटून निघालेल्या अनेक मराठा, कुणबी मराठा नवतरुण-तरुणी तेव्हा साताठ वर्षाच्या नाकळत्या वयात असतील. जमिनीचा काही हिस्सा रस्त्याच्या कामासाठी घेतला जाण्याला सुरेख भोतमांगे हिने हरकत घेतली. तक्रार केली, याचा संताप येऊन जवळपास चव्वेचाळीस जातदांडग्यांनी भोतमांगे कुटुंबाला घेरले. सुरेखा बोतमांगे, तिचे दोन मुलगे, आणि एक मुलगी अशा चौघांना या जात्यांध, माजोरी जमावाने किती क्रूर रीतीने मारले याचे अगदी गोलगोल वर्णनही या मुलांनी ऐकलेले नाही.

भैय्यालाल भोतमांगे कसाबसा पळाला आणि एका झाडावर चढून लपून राहिला. त्याने तिथून सारे काही असाहाय्यपणे पाहिले. सायकलच्या साखळ्या, लाठ्याकाठ्यांनी या चव्वेचाळीस पूर्ण शुध्दीत असलेल्या जातदांडग्यांच्या जमावाने त्या सर्वांना फुटेस्तोवर मारले. मायलेकींना नागवून त्यांना गावभर फिरवले आणि मग त्यांच्यावर बलात्कार करून ठार केले. त्या दोघींची प्रेते नाल्यात मिळालेली.

आंधळया मुलालाही हालहाल करून मारले. दुसऱ्याला तर मारलेच. या सर्व भयानक अंधाराचा साक्षी होता केवळ एक- भैय्यालाल- मौतमांगे.

त्याच्या जिवंत रहाण्यामुळे आपल्या थोर जातीय संस्कृतीची मोठीच अडचण की हो झाली. तोही मेला असता तर मग ते सारे दलित होते हाच त्यांचा गुन्हा होता आणि गावातल्या कुणाशीही त्याची जाती दुश्मनी नव्हती असं सिध्द करणं सोपंही गेलं असतं कदाचित. स्थानिक डॉक्टरांनी बलात्कार झालाच नसल्याचे सर्टिफिकेट देण्यासाठी लक्ष्मीदर्शन केले अशी बोलवा होती. यशदाच्या अहवालामध्ये मधुकर कुकडे या भाजपच्या आमदारावर तपासात ढवळाढवळ केल्याचा ठपका ठेवण्यात आला होता. पण असे सारे स्वच्छ पुसून काढणे आपल्या या महान देशात सोपे आहे ही देवाचीच कृपा.

सुरुवातीचे काही दिवस तर मराठी वृत्तपत्रांतून काहीही बाहेर आले नाही. जे आले ते घटनेची भयानकता समोर आणणारे नव्हतेच. मग साब्रिना बकवॉल्टर यांचा लेख टाइम्स ऑफ इंडियात आला आणि मग मात्र या गुन्ह्याला तोंड फुटले. जातीय संरक्षणाच्या कडेकोट भिंतीत गुन्हा दडून राहू शकला नाही.

या अत्याचाराविरुध्द पहिला आवाज उठवयाला दलित संघटनाच पुढे आल्या. बिगरजातीय, राष्ट्रीय राजकारण करणाऱ्या संघटना यात मागेच होत्या. राज्याच्या मुख्यमंत्र्यांनी भैय्यालालला घर, रोख मदत, आणि नोकरी देऊ केली. शून्य झालेल्या भैय्यालालला केवढी मोठी मदत.

गेली दहा वर्षं तीन महिने तीन आठवडे हा खटला चालला. अडतीस संशयितांपैकी आठ जणांपैकी सहाजणांना फाशी सुनावली गेली. दोघांना जन्मठेप झाली. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठापुढे- पूर्वी कोणताही गुन्हा केलेला नसल्याने फाशीऐवजी सौम्य शिक्षा दिली जावी हा प्रतिवाद केला गेला- आणि सहाही आरोपींच्या फाशीची जन्मठेप झाली. यावरून पुन्हा एकदा निषेधाची लाट उसळली- स्थानिक दलित संघटनाच भैय्यालालच्या पाठीशी उभ्या राहिल्या. सीबीआयने अपील करण्याची भाषा केली पण कृती काही पुढे सरकली नाही.

भैय्यालाल भोतमांगेने शिक्षेच्या या सौम्यीकरणाविरुध्द स्वतःच सर्वोच्च न्यायालयाकडे दाद मागितली.

त्या खटल्याच्या तारखा पडत राहिल्या आणि भैय्यालालच्या विदीर्ण हृदयाने आधीच अखेर हार मानली.

मुख्य साक्षीदाराविना हा खटला आता कसा चालेल याची कल्पना करणे तसे सोपेच आहे आपल्यासाठी.

भंडारा न्यायालयाने या सरळसरळ जातीयवादी हत्याकांडात जातीय दृष्टीकोन नव्हताच असेच गृहीत धरून खटला चालवला. उच्च न्यायालयाने ही दुर्मिळातील दुर्मिळ घटना आहे असे म्हणता येत नाही म्हणून सांगून टाकले.

खैरलांजी आणि कोपर्डी या दोन्ही ठिकाणी गलिच्छ, शरमेने मान खाली जाईल अशा घटना घडल्या. एकात चार बळी एकात एक... याने काही क्रौर्याची खोली

कमी होत नाही. नितीन आगेच्या भयंकर खुनातही तेच. पण दोन्हीकडेही अत्याचारितांच्या सहानुभूतीसाठी त्यांच्यात्यांच्या जाती उभ्या राहिल्या!

दलितांच्या नेत्यांनी कोपर्डीला धाव घेतली तशीच मराठ्यांच्या नेत्यांनीही खैरलांजीला धाव घेतली होती.

पण मोर्चांचे अस्त्र मात्र स्वजातीयांवरील अत्याचाराविरोधातच वापरले गेले.

का नाही खैरलांजी घडल्याबरोबर कुणबी मराठांच्या संघटनांनी जात विसरून जातबांधवांच्या क्रौर्याविरुध्द मोर्चे काढले? का नाही दलितांच्या संघटनांनी स्त्री ही सर्वात शोषित-दलित घटक आहे म्हणत कोपर्डीनंतर मोर्चा काढला? हे प्रश्न न्यायासारखेच लोंबकळत रहाणार आहेत कां?

महिन्याभरात विसरून जाऊ आपण सारे एका भीषण घटनेचा साक्षीदार असाच मरून गेला हे.

विस्मरणाचा शाप कसा उःशाप ठरतो चांगलंच माहीत असतं संस्कृतीच्या इतिहासाला...

***

# कॅरोलिन हर्शेल आणि जोसेलिन बेल

अचानकच ऍड्रिएन रिच या स्त्रीवादी कवयित्रीची प्लॅनेटेरियम नावाची कविता सामोरी आली. कॅरोलिन हर्शेल या आद्य अवकाशवैज्ञानिक स्त्रीच्या सन्मानार्थ लिहिलेली ही कविता आहे. १७५० ते १८४८ या काळात जगलेल्या कॅरोलिनचं आयुष्य टायफॉइडमुळे आलेल्या कुरुपतेमुळे सर्वसामान्य होऊ शकलं नाही. तिचं लग्न होणार नाही म्हणून तिच्या आईने तिला त्या काळी मुलींना जे भरतकामाचं वगैरे प्रशिक्षण दिलं जायचं तेही धडपणे मिळू दिलं नाही. ती घरकामाची नोकरी वगैरे करू शकेल असं म्हणून तिला घरातल्या धुणीभांडी वगैरे कामांनाच आईने जुंपलं. आईच्या चोरून वडिलांनी तिला थोडं शिकवायचा प्रयत्न केला, पण त्यांचा मृत्यू झाल्यावर तेही थांबलं. पण तिच्या भावांनी हेकट आईला दाद न देता तिला आपल्याबरोबर इंग्लंडला घेऊन जायचं ठरवलं. विलियम हर्शेल हा तिचा भाऊ तेव्हा संगीतात पुढे जाऊ इच्छित होता. मात्र त्याचा रस खगोलशास्त्राकडे वळला आणि त्याची ही बहीण त्याला त्यात मदत करू लागली. दुर्बिणी बनवण्याच्या कामात भिंगे, आरसे घसाईमध्ये काम करू लागली. दुर्बिणींवर काम करताना झपाटल्यासारखी तहानभूक विसरणाऱ्या भावाला त्याच्या खगोलीय निरीक्षणांच्या नोंदी करू लागली. आणि असे करताकरता स्वतःच ती त्यातील तज्ज्ञ झाली. विलियम हर्शेलने युरेनस ग्रहाचा शोध लावला, तर कॅरोलिनच्या नावावर आठ धूमकेतूंची आणि दोन मेसियर ऑब्जेक्ट्सची नोंद आहे. पहिला धूमकेतू शोधण्याचा मान जरी कॅरोलिनला मिळतो,

तरी खरे पहाता पहिला धूमकेतू मारीया किर्श हिने १७०० साली शोधून काढला, पण तिने तेव्हाच्या पद्धतीनुसार त्या शोधाचे श्रेय नवऱ्याला गॉटफ्रिड किर्शला दिले होते (!). कॅरोलिन हर्शेलला काही काळानंतर रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटीने सन्मान दिला, सुवर्णपदक दिले. केलेल्या वैज्ञानिक कामासाठी मानधन मिळवणारी ती पहिलीच महिला. १८३५ मध्ये रॉयल अस्ट्रॉनॉमिकल सोसायटीचे सदस्यत्व मारी सॉमरविलच्या जोडीने कॅरोलिन हर्शेलला देण्यात आले.

पण ही जी प्लॅनेटेरियम नावाची कविता कॅरोलिन हर्शेलच्या सन्मानार्थ ऍड्रिएन रिचने लिहिली, त्यात एक संदर्भ आहे पल्सारच्या शोधाचा. पल्सारचा शोध तर फार नंतरचा- मग कॅरोलिनवरच्या कवितेत तो संदर्भ काय करतो आहे. कॅरोलिनच्या मृत्यूनंतर १२० वर्षांनी लिहिलेली ही कविता आहे. तेव्हा पल्सारचा कुठेही काही उल्लेख असायचं कारण नव्हतं.

ऍड्रियन रिचने हा जो संदर्भ कवितेत गुंफला आहे त्याचा संबंध येतो, कवितेच्या रचनेच्या आदल्याच वर्षी लागलेल्या पल्सारच्या शोधाचा. जो जोसेलिन बेल या संशोधक विद्यार्थिनीने लावला होता. क्वेसार्सचा शोध घेण्यासाठी चाललेल्या प्रकल्पात प्रा. हेविश यांच्या मार्गदर्शनाखाली रोज रात्रभर जागून जोसेलिन बेल येणाऱ्या रेडिओ सिग्नल्सची नोंदणी, निरीक्षणे घेत असे. रोजच्या रोज येणाऱ्या नोंदी आणि आलेख हजारो फूट कागदांच्या हिशेबात पाहावे लागत असत. क्वेसार्सचे निरीक्षण करणे सोपे नव्हते. त्यात अनेक चुका होत. फरक होत. शास्त्रीय भाषेत ज्याला अनॉमली म्हणतात तशा अनॉमलीज म्हणजे विसंगत वाटणाऱ्या त्रुटी खूप असत. या विसंगती बहुधा मानवी चुकांमुळे किंवा निरीक्षणांतील त्रुटीमुळे तयार

होतात असे मानले जात असे. जोसेलिन बेलने असा एक विसंगत वाटणारा सिग्नल आपल्या मार्गदर्शकांना दाखवला. तो काही वेगळा रेडिओस्रोत असेल अशी शंका तिला होती. पण ते मान्य केले गेले नाही. गाईडने ते निरीक्षण सुरुवातीला स्वीकारले नाही. पण जेव्हा तितक्याच सातत्याने, नेमकेपणाने तो सिग्नलही येत राहिला आणि त्याचबरोबर दुसराही एक येऊ लागला. आणि मग पल्सारचा शोध लागल्याचे नक्की झाले.

जोसेलिन बेल ही तेव्हा डॉक्टरेटची विद्यार्थिनी होती. प्राध्यापक नव्हती. त्यामुळे अर्थातच हा शोधनिबंध लिहिताना तिचे नाव दुसरे आणि तिच्या मार्गदर्शकांचे पहिले होते. या शोधासाठी ऑक्टोबर १९७४मध्ये नोबेल जाहीर झाले तेव्हा तिचे नाव त्या पुरस्कारासाठी अंतर्भूत करण्यात आले नाही. शोध लागला तेव्हा ती विद्यार्थिनी होती हा एक भाग स्पष्टच होता. दुसऱ्या मुद्द्याची शंका ही अनेकांनी घेतली- ती म्हणजे जोसेलिन ही स्त्री होती.

ही शंका येण्याला पार्श्वभूमीही आहे. जोसेलिन बेलच्या करीयरच्या सुरुवातीपासून या पार्श्वभूमीने तिची इतर स्त्रियांप्रमाणेच पाठ सोडलेली नव्हती. अगदी अलिकडे ज्या गुरुत्वाकर्षणीय अवकाशलहरींच्या शोधाला नोबेल पुरस्कार मिळाला त्या शोधातील त्रिमूर्तींपैकी प्रा. रॉन ड्रेवर- जे आपल्या स्पष्टवक्तेपणासाठी प्रसिद्ध आहेत त्यांनी याना लेविन यांनी लिहिलेल्या पुस्तकात दिलेल्या मुलाखतीत म्हटले आहे, की जोसेलिन बेलला इंग्लंडच्या सर्वोत्कृष्ठ समजल्या जाणाऱ्या रेडिओ अस्ट्रॉनमी केंद्रात ती स्त्री आहे हेच कारण देऊन१९६०च्या दशकात नोकरी नाकारण्यात आली होती. अर्थात अशा गोष्टी अधिकृतरित्या कुणीच मान्य करीत

नाही हेही ड्रेवर म्हणतात. त्यामुळे जोसेलिन बेलला केंब्रिज हा दुसरा पर्याय स्वीकारणे भाग पडले. जे पल्सारच्या शोधासाठी उपकारकच ठरले.

नोबेल न मिळाल्यामुळे आपल्यावर अन्याय झाला असल्याचा बाऊ जोसेलिन बेलने कधीच केला नाही. प्राध्यापक मार्गदर्शकांना जसे अपयशाचे धनी व्हावे लागते तसेच ते यशाचे धनी झाले तर त्यात गैर काय असा प्रश्न ती करते. शिवाय पुरस्कार मिळाला नसला तरीही हा शोध माझाच आहे हे सर्वांनाच माहीत झाले आहे, आणि त्याचे विविध प्रकारे फायदे मला मिळाले असेही ती बोलून दाखवते.

कॅरोलिन हर्शेलप्रमाणेच जोसेलिन बेलचाही सहभाग दुर्बिणीच्या घडणीत होता. फक्त ही दुर्बिण काचाभिंगांची नव्हे तर मेगाहर्ट्झच्या हिशेबात सिग्नल गोळा करणारी अवाढव्या रेडिओ दुर्बिण होती. कॅरोलिन हर्शेलचा काळ एका शतकापेक्षा अधिक मागचा होता, त्यामुळे तिच्यावर झालेला अन्याय कित्येक पट जास्त होता. जोसेलिन बेलवर त्या मानाने कमीच अन्याय झाला म्हणायचे. तिचे वडील स्वतःच प्लॅनेटेरिअम बांधण्याच्या कामात होते आणि खगोलशास्त्रीय लेखनही करीत असत ही जमेची बाजू होती. ती त्यांची पुस्तकं वाचू लागली म्हणून नाहीतर त्या काळातल्या वहिवाटेवर चालणाऱ्या तिच्या शाळेने तिची बुद्धी चिरडून टाकायचा पुरता प्रयत्न केला असता. शाळेने इतर मुलींना जसे विज्ञानाचे शिक्षण घ्यायला मनाई केली होती, तशीच जोसेलिनलाही केली. पण जोसेलिनचे पालक शाळेच्या या धोरणाच्या विरोधात खमकेपणाने झगडले आणि त्यांनी शाळेला तिला विज्ञान शिकायचा परवानगी द्यायला लावली. शाळेचे ऐकले असते तर जोसेलिनला पाककला, क्रॉसस्टिच असले विषय शिकत गप्प रहावं लागलं असतं. ती या शाळेत

जेव्हा अकरावीत नापास झाली तेव्हा तिच्या आईवडिलांनी तिला दुसऱ्या शाळेत यॉर्क येथे पाठवले. तिथे तिला भौतिकशास्त्राचे शिक्षक चांगले लाभले.

सगळी माहिती घेऊन साठवण्यापेक्षा काही नेमक्या गोष्टी लक्षात ठेवून त्यांचा विचार करून, त्यातून पुढली बांधणी करत, पुढे जायचं हा भौतिकशास्त्रशिक्षणाचा कळीचा मुद्दा जोसेलिन त्यांच्याकडून शिकली. विज्ञान म्हणजे स्वतंत्र विचार, प्रतिभावंत विचार हेच जोसेलिन शिकली आणि म्हणूनच विसंगती म्हणजे मानवी चूक असे मान्य करून गप्प न रहाता तिने अंतराळात दूरवर चाललेल्या घडामोडींच्या शक्यतेचा वेध घेतला. न्यूट्रॉन स्टार- नेब्युलांच्या अंतर्भागी असलेला प्रचंड ऊर्जेचा बिंदू पृथ्वीकडे पाठवत असलेल्या एका धडधडीतून तिने वेध घेतला.

जोसेलिन बेल ही वैज्ञानिक आहे, त्याचबरोबर तिला कवितांचे, साहित्याचे प्रेम आहे. जेव्हा तिने प्लॅनेटेरियम ही ॲड्रिएन रिचची कविता वाचली तेव्हा तिला पल्सारच्या उल्लेखातून स्वतःची प्रतिमा ताबडतोब जाणवली आणि कॅरोलिन हर्शेल आणि जोसेलिन बेलमधला धागाही जाणवला. तिने त्यासंबंधी फार सुंदर लेखन आपल्या ब्लॉगमध्ये केले आहे.

सुप्रसिद्ध खगोलशास्त्रज्ञांवरील व्याख्यानांच्या एका मालिकेत एक तरी स्त्री खगोलवैज्ञानिक असावी म्हणून काही तिच्यासह काही स्त्रीवादी खगोलवैज्ञानिकांनी कॅरोलिन हर्शेलच्या नावाचा आग्रह धरला होता. पण कॅरोलिन हर्शेलचे जे चित्र उपलब्ध होते त्यातून ती दिसायला सुंदर नाही हो स्पष्ट होत होते. आणि याच एका मुद्द्यावर तिचा समावेश त्या मालिकेत करण्यात आला नाही हे जोसेलिन बेल नोंदवते. सर्व प्रकारे युक्तीवाद करूनही त्या साऱ्याजणी हरल्या हे जोसेलिनने काहीशा

हताशपणे लिहून ठेवले आहे. कॅरोलिनचे स्त्रीत्व आणि कुरुपत्व दोन्ही तिचा अंतिम पराभव करू शकले नाही, जोसेलिनचे स्त्रीत्व आणि अननुभवी असणे तिचा अंतिम पराभव करू शकले नाही.काळाने या दोघींना काहीसा न्याय दिला हे खरेच. पण दूषित समाजवृत्तीच्या प्रभावामुळे पूर्वी प्रतिभावंत स्त्रियांना किती अन्यायाला सामोरे जावे लागले त्याची ही दोन उदाहरणे- कॅरोलिन आणि जोसेलिन.

कॅरोलिन काळाच्या पडद्याआड गेली. जोसेलिन आज ऐंशी वर्षांची आहे. दोघींनाही सलाम.

***

# शनीचार अर्थात शनीचा वेडाचार

व्रतवैकल्ये-कुळाचार- धर्माचे नियम आदिंविषयी श्रध्दापूर्ण प्रेम असलेल्या संगीसाथी स्त्रीपुरुष आजकाल शनीस्पर्शाच्या घटनेने अकांडतांडवाचे रूप घेतल्याचे पाहातो आहोत. यातले लक्षात घेण्यासारखे काही मुद्दे काही श्रध्दावादी महिलांनीच मांडले. चॅनेली चर्चांवर आणि फेसबुकवरील लेखांमधून या गोष्टी पाहायला मिळाल्या. आयुर्वेदाची पदवी घेतलेल्या एका बाईंनी नास्तिक महिलांनी या श्रध्दाविषयात नाक खुपसण्याचे किंवा तुंबड्या लावण्याचे काहीच कारण नाही वगैरे म्हणत शनीस्पर्श स्त्रियांनी टाळला पाहिजेच हा मुद्दा उचलून धरला. पाठोपाठ पंकजा मुंडे यांचीही वक्तव्ये आली.

भगतबाई, क्रांतीगीताबाई यांच्यासारख्या अनेक आघाडीच्या प्रतिगामी हिंदुत्वाला घट्ट चिकटून बसणे कसे योग्य हे सांगणाऱ्या स्त्रियांनी या निमित्ताचा उपयोग केला.

या मुद्द्यांना उभा छेद देणारे मुद्दे हिंदुधर्मातीलच काय कुठल्याही धर्मातील स्त्रीविरोधी भूमिकांवर शनीच्याच काय कुठल्याच देवळात जाणे किंवा देवाच्या नावाचे उत्सव, बाजार भरवणे मान्य नसलेल्या पुरोगामी विचारांच्या स्त्रियांनीही या निमित्ताचा उपयोगच केला.

या मुद्द्यांवर चर्चा करणे, किंवा अमक्यातमक्यांनी या विषयावर बोलणे हे चूक आहे, रिकामटेकडेपणाचे आहे वगैरे म्हणणारांना एकच सांगावेसे वाटते, की या साऱ्या संवादाचे, बोधनाचे एक कारण आहे. एक निमित्त घेऊन बुध्दीजागृती किंवा जाणीवजागृती केली जाते. जे अयोग्य आहे असे वाटते त्यावर बोलण्याचे कारण सर्व माणसांसाठी, एकच असते की त्यानिमित्ताने जागर होतो. ज्या सश्रध्दांना आपल्या श्रध्दा योग्य वाटतात त्यांनी त्यावर लिहावे-बोलावे यामागेही तेच कारण आहे आणि ज्यांना या श्रध्दा अनाठायी, घातक वाटतात त्यांनी त्यावर लिहावे बोलावे यामागेही तेच कारण आहे. कोणता पक्ष आत्ताच्या घडीला बलवत्तर ठरतो याला काहीही महत्त्व नाही. बदलाच्या, बुध्दीउत्क्रांतीच्या चक्रात अखेर काय टिकेल आणि काय फेकले जाईल हे काळच ठरवेल. आणि त्याला मात्र जबाबदार असतील चिरंतन अशी नीतीमूल्ये.

एका चॅनेलवरील चर्चेचा कार्यक्रम पूर्ण झाल्यानंतर त्यात सहभागी झालेल्या बदलाची मूल्ये स्वीकारणाऱ्या स्त्रीला, तिच्या ठाम मतांमुळे परिवर्तन मान्य नसलेल्या दोन व्यक्तींनी टोळी करून रॅगिंग म्हणावे इतपत त्रास दिला. फेसबुकवर मी एका व्रताबद्दल व्रते करणाऱ्या स्त्रियांना मठ्ठ म्हणून त्यांना चेतवले होते. त्या स्टेटसमधील चेतवण्याच्या क्षमतेमुळे बराच वन्ही चेतला. पण या सर्व गोष्टी या बुध्दीजागृतीच्या प्रवासाचाच भाग आहेत.

या समाजात बहुसंख्य स्त्रिया मठ्ठपणे धर्मवाक्य प्रमाण मानून निरर्थक गोष्टी करतात असा आम्हा विरुध्द मताच्या, पुढची मोकळी वाटचाल शोधणाऱ्या स्त्रियांचा विश्वास आहे. त्या बहुसंख्य आहेत म्हणून त्यांना सांभाळून घ्यावे किंवा

दुखवू नये वगैरे प्रतिवाद फार लंगडे आहेत. आताच्या श्रध्दा मानून पक्क्या झालेल्या स्त्रियांच्या वर्तनात आता कशाहीमुळे फरक पडण्याची शक्यता नाही. पण तीव्रपणे, धारदारपणे या मठ्ठपणाला विरोध होताना ऐकायला मिळाला, वाचायला मिळाला तर आत्ता ज्यांची वये प्रश्न पडण्याची आहेत, त्यांच्यात बदल संभवतो. म्हणून ती धार कायम ठेवणे आहे, मंडळी.

आणि जे मूर्खपणाचा प्रचार गुलजार, कचकड्या शब्दांत करत रहातात त्यांना आताच नव्हे फार पूर्वीपासून राजाश्रयाचे दिवस आहेतच. त्यांचा वरचष्मा नेहमीच राहिला आहे. नास्तिकांना ठार करण्याची सौदी-इस्लामी पध्दत या समाजात नसली तरीही त्यांच्याकडे तुच्छतेनेच पाहिले जाते. या साऱ्यांना आव्हान देणारे प्रश्न विचारले जाऊ नयेत अशी व्यवस्था शिक्षणपध्दतीतूनही बिंबवलेली आहे. तरीही शनीला स्पर्श करण्याच्या एखाद्या निरुपद्रवी कृतीमुळे साऱ्या बाजूंना जाग आल्यासारखे होते, चर्चा सुरू होते, भोंदूपणावर टीका करणाऱ्या व्यक्तींची मते व्यासपीठांवर येतात हीच गोष्ट खूप आशादायक आहे.

कुठल्या ना कुठल्या शतकात सर्व धर्मांतल्या कालबाह्य विश्वासांचा ऱ्हास होईल, त्यांच्या नावाने माणसांच्या आत्म्याच्या खिशात हात घालणारी आणि द्रव्यही लुटणारी सर्व दुकाने बंद होतील यासाठी आम्ही बोलत रहाणार. त्या आयुर्वेदवाल्या जाज्ज्वल्ल्य बाईंच्या भाषेत सांगायचे तर साकळलेल्या बुध्दीच्या गुठळ्या नष्ट करण्यासाठी आमचे जलौकाचरण सुरूच राहील. तुम्ही नाभिक म्हणा की आणि काही... ती तुमच्या बुध्दीची स्पष्ट मर्यादा आहे.

# बहूत नाइन्साफी है...

स्त्रियांच्या संदर्भात काहीही मोकळेढाकळेपणाने बोलायचं याला एका महान संस्कृतीची पार्श्वभूमी लागते. आपल्या थोर देशातही ती इतर अनेक इस्लाम पट्ट्यातल्या देशांप्रमाणेच आहे यात वादच नाही. शिवाय अमेरिकेसारख्या केवळ दोनअडीचशे वर्षांची सांस्कृतिक पार्श्वभूमी असलेल्या जागतिक महासत्ता असलेल्या राष्ट्राचा ट्रम्पसारखा अध्यक्ष स्त्रियांबद्दल ‘मोकळेपणाने’ बोलतो तर मग महान संस्कृतीत असे मोकळेपणाने बोलणे हे अगदी संस्कृतीचे सार्थकच म्हणावे लागेल.

स्त्रियांबद्दल हसतखेळत केलेल्या वक्तव्यांवरून एवढे अकांडतांडव, करणाऱ्या कुणालाही आपल्या थोर संस्कृतीचे, आपल्या राजकीय संस्कृतीचे भान नाही असेच म्हणेन.

या ‘मोकळेपणाचा’ एक आढावाच घेऊन टाकू.

नगरवधू किंवा गणिका हा शब्द आपल्या संस्कृतीत पुरुषांचे मनोरंजन करणाऱ्या स्त्रियांसाठी वापरला जात असे. त्यालाच समानार्थी असलेला वेश्या हा शब्द वापरून कित्येक राजकारण्यांनी यशस्वी होऊ पाहाणाऱ्या स्त्रियांना कसे गौरविले होते, गौरवत असतात. अलिकडेच भाजपच्या दयाशंकर झा यांनी खाजगीत बोलण्याऐवजी चुकून सार्वजनिक ठिकाणी बसपाच्या मायावती वेश्येपेक्षा वाईट आहेत इतकी त्या तिकिटांची विक्री करतात असे म्हटले होते. आता खाजगीत

अनेक स्त्रियांचा गौरव असाच प्राकृतात केला जातो. ते शब्द पेपरात छापायचे तर फारवेळा इंग्रजी एक्स हे अक्षर टंकावे लागेल. म्हणून सोडून देऊ.

पण संस्कृतीतले महिलांचे दुय्यम दासीस्थान अनेक राजकारण्यांकडून कधीही विसरले जात नाही हा संस्कृतीचा गौरवच नव्हे काय.

आपले महान प्रधानसेवक एकदा बेटीबचावच्या वेळी म्हणाले होते, हजार मुलग्यांमागे आठशे मुली जन्मल्या तर उरलेल्या दोनशेंना बायका कशा मिळणार... बहू हवी असेल तर बेटी वाचवा. असा मोकळेपणा या संस्कृतीलाच शोभेसा आहे. मग ते बांगला देशच्या अध्यक्षांचा गौरव करताना म्हणाले, की त्या एक स्त्री असूनसुद्धा दहशतवादाचा सामना करीत आहेत. किती हा स्त्रीबद्दलचा काळजीचा भाव... असूनसुद्धा... अहाहा!

भारतात बलात्कार वगैरेसारख्या अत्यंत नैसर्गिक, स्वाभाविक घटना वारंवार होतात. अहो हा सृष्टीचक्राचाच भाग आहे. तेव्हा विविध पक्षांचे राजकीय नेते कायकाय म्हणाले आहेत एकदा उजळणी करू. यामुळे बाकीच्या अनेक असंस्कृत देशांनी भारत हा स्त्री पर्यटकांसाठी अत्यंत असुरक्षित असल्याचे घोषित केले

माननीय जेटलीजी म्हणालेले की बलात्काराची एखादी बारीकशी घटना घडली तर त्याची जगभर जाहिरात केल्यामुळे पर्यटन क्षेत्राचे करोडो रुपयांचे नुकसान होते. बलात्कार करणाऱ्या तरुण मुलांना फाशी द्या ही क्रूरक्रूरक्रूर मागणी करणाऱ्यांना ठाम उत्तर देताना मुलायमसिंगजींच्या मुलायम काळजाने मुलांच्या रक्षणार्थ २०१४मध्ये मोरादाबादमध्ये हे अमर उद्गार काढले- मुली प्रथम मैत्री करतात. मुलामुलींच्यात

मतभेद होतात. मतभेद झाले की मुली रेप झाला म्हणतात. मुलगे मुलगे आहेत शेवटी. चूक होते त्यांच्या हातून. मग काय रेपसाठी फाशी देणार? सरकारने रेपबद्दलचे कायदे बदलले पाहिजेत.

इस्लामिक तत्वांचे 'शांतताप्रिय' पाठीराखे अबू आझमी म्हणाले- बलात्कार झालेल्या स्त्रीला आणि करणाराला दोघांनाही फाशी झाली पाहिजे कारण स्त्रीने दुसऱ्या पुरुषाबरोबर जाणे हेच इस्लाममध्ये त्याज्य आहे. त्यांच्या मूर्ख मुलाने आणि सुनेनेही त्या बिचाऱ्यांवर टीका केली.

संस्कृतीचे प्रेम काही केवळ पु. राजकारण्यांना नसते, ते तर म. राजकारण्यांनाही असते. राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या सौ. आशाताई मिरजेताई दिल्लीतल्या आणि मुंबईतल्या बलात्काराच्या संदर्भात म्हणाल्या होत्या, स्त्रियांचे कपडे, त्या कशा वागतात, त्या कोणत्या वेळी कुठे असतात या गोष्टीही बलात्काराला कारणीभूत आहेत.

काँग्रेसचे कैलासवासी नेते- ईश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो बरोबरच म्हणालेले- जब तक महिला तिरछी नजर से नहीं देखेंगी तब तक पुरुष उसे नहीं छेडेगा.

भाजपचे बाबुलाल गौर तर मोठेच संस्कृतीप्रेमी होते... रशियन ललनांना धोतर सोडून दाखवण्याचे शिक्षण द्यायला तयार झालेला हा नेता महिलांनी अंगभर कपडे घालावेत म्हणजे बलात्कार होणार नाहीत म्हणून सांगत असे. जीन्सटीशर्ट हे तर

भारतीय बायकांनी घालूच नयेत असे त्यांचे ठामच मत होते. काय चूक आहे, काय चूक आहे?

आंध्र प्रदेशचे काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नेते बोत्सा सत्यनारायण निर्भया बलात्कारासंदर्भात म्हणालेले, भारताला मध्यरात्री स्वातंत्र्य मिळालं म्हणून काही स्त्रियांनी रात्री बेरात्री बाहेर फिरू नये. फारसे प्रवासी नसलेल्या त्या बसमध्ये चढताना तिने विचार करायला हवा होता. ते पुढे असेही म्हणाले की ही एवढी किरकोळ घटना असूनही सोनियाजी निदर्शकांना भेटायला गेल्या. जी घटना बोत्साजींना किरकोळ वाटली ती सोनिया गांधींना फार मोठी वाटली- हेच मुळात चुकलंय.

या सर्वांत सर्वात थोर असे विधान केले दीदी ममता बॅनर्जी यांनी. बलात्कार का होतात याची फार गहिरी मीमांसा केली दीदींनी. पूर्वी स्त्रीपुरुष हातात हातही घालत नसतं. पालक ओरडायचे. आता सगळंच मुक्त झालंय. मुक्त व्यवस्था, मुक्त पर्याय. बलात्कार होणार नाहीत तर काय होणार... शिवाय ही माध्यमं दोनचार किरकोळ बलात्कारांच्या घटनांवर केवढा ओरडाआरडा करतात. सगळीकडे निगेटिब चित्र जातं.

पहा बलात्काराचं सांस्कृतिक भान स्त्रीपुरुष सर्वपक्षीय, सर्वलिंगी राजकारण्यांना आहे. आणि यातच आपल्या देशाची सांस्कृतिक शक्ती आहे.

स्त्रीच्या सौंदर्याचे तर राजकारणी किती मोठे पूजक, भोक्ते, उपभोक्ते... आपण जाणतोच. राजकारणात फक्त शहरातल्या आकर्षक स्त्रिया येऊ शकतात, गांवढळ

अनाकर्षक स्त्रियांना त्यात जागा नाही हे मा. मुलायमसिंगांनी ठणकावून सांगितलेले ग्रामीण स्त्रियांना.

गोव्याच्या लक्ष्मीकांत पार्सेकरांनी मुख्यमंत्रीपदावर असताना स्त्रियांना सांगितले होते की सूर्यतापापासून आपली चामडी वाचवा. ती काळी पडणार नाही याची काळजी घ्या. राजकारण्यांनी चामडी वाचवायला सांगणे किती महत्त्वाचे आहे पहा.

दारूच्या ब्रॅन्ड्सना स्त्रियांची नावे द्या, विक्री वाढेल असे सुचवणारे महाराष्ट्राचे एक मंत्री गिरीश महाजन किती रसिक आहेत याची काहीतरी दाद देणे ही या संस्कृतीत वाढलेल्या स्त्रियांची नैतिक जबाबदारी होती. पण आजकाल स्त्रिया नैतिक जबाबदाऱ्या पार पाडत नाहीतच...

स्त्रियांची स्वातंत्र्याची योग्यताच नाही. हे अगदी साधेसे सांस्कृतिक सत्य आहे. आणि त्या दृष्टीने त्यांची लग्ने बाळपणीच लावून द्यावी असे हरयाणवी नेते ओमप्रकाशजी चौटाला म्हणाले. अखिल खाप पंचायतीची मागणी त्यांनी योग्य ठरवली. आपल्या नै का संस्कृतिच्या मर्दानी झाशीवाली रामतीर्थकर हेच सांगत फिरायच्या सगळीकडे... गेल्या बिचाऱ्या.

सिने-टीव्ही पडद्यावर प्रसिद्ध झालेल्या अभिनेत्यांप्रमाणेच अभिनेत्रींना राजकारणात आणून देशाचा फायदा करून दिल्यानंतर त्यातल्या विशेषतः अभिनेत्रींना त्यांची जागा दाखवून देण्याचे आवश्यक कार्य आपले राजकीय नेते करतात. लोकही करतात. समाजवादी पक्षाचे माजी नेते नरेंद्र अग्रवाल जया बच्चनला बॉलिवुडची डान्सिंग गर्ल, फिल्मों में नाचनेवाली म्हणाले, पूर्वीचे सेनेचे

आणि आता काँग्रेसचे महान नेते संजय निरुपम स्मृती इराणीला ठुमके लगानेवाली म्हणाले. जयललिताच्या चारित्र्यावर तर सतत शिंतोडाभिषेक करायचे लोक. गृहमंत्री असलेले सुशीलकुमार शिंदे यांनी जया बच्चनला आसामवरील चर्चेत आठवण करून दिली की हा गंभीर विषय आहे- फिल्मी नाही. आवश्यकच आहे हे सारे. बिचारे सगळे नंतर माफीही मागून टाकतात. आपली सांस्कृतिक जबाबदारी सांभाळताना बिचाऱ्यांना कितीवेळा माफी मागावी लागतो, स्पष्टीकरणं द्यावी लागतात. मागतात. देतात.

महिलांसाठी संसदेत आरक्षण नकोच मुळी. कारण त्याचा फायदा खेड्यातील अनाकर्षक स्त्रियांना न मिळता शहरी, बड्या घरच्या स्त्रियांना मिळेल आणि आमची पोरं संसदेत शीळ घालू लागतील असे म्हणणाऱ्या मुलायम सिंगांनी संस्कृतीची जपणूकच केली नाही कां.

आपले नुकतेच निवृत्त झालेले राष्ट्रपती प्रणव मुखर्जी यांचा बेटा अभिजीत मुखर्जी निर्भया बलात्कारासंदर्भातल्या निदर्शनांवेळी म्हणालेला की या सगळ्या रस्त्यावर उतरून निदर्शन करणाऱ्या रंगवलेल्या ओठांच्या, (डोक्यात) काहीतरी बिघडलेल्या बायका आहेत. त्यांचा वास्तवाशी काहीही संबंध नाही. मुख्तार अब्बास नक्वी काका म्हणाले या पावडर लावलेल्या, ओठ रंगवलेल्या बाया मुंबईत जी काही निदर्शनं करीत आहेत त्यामुळे देशाला धोका आहे...

बसपाचे राजपाल सैनी म्हणाले बायकांना मोबाईल फोन्स देऊ नयेत. काय उपयोग करतात त्या मोबाईलचा. त्यांच्या कामांत काहीही उपयोग नसतो मोबाईलचा. माझ्या आईकडे, बायकोकडे कधीही मोबाईल नव्हते काय बिघडलं?

एकंदरीत आकर्षक दिसणे, मोबाईल वापरणे, कलावंत असणे, यशस्वी असणे, निर्भय असणे... या सर्व गोष्टी आपल्या संस्कृतीच्या विरोधात आहेत. त्यामुळे सर्व विचारपंथांचे अनेक राजकारणी त्यासाठी आपला जीव बिचारे पाखडत असतात.

स्त्रियांबद्दल थोडे विनोदाने बोलणे, त्यांच्या अंगप्रत्यंगदर्शनाचा आनंद घेणे, त्यांना पळवणे, त्यांच्यावर संधी असलीच- त्यांनी दिली तर बलात्कार करणे, त्यांच्या योनीचे उल्लेख जातायेता करणे ही आपली सांस्कृतिक पार्श्वभूमी आणि पृष्ठभूमीही आहे.

या सर्व डीजेच्या नादात एक बिचारा राम कदम मुलांसाठी मुली पळवायला मदत करायचं म्हणेल तर त्याच्यावर एवढी टीका...

बहूत नाइन्साफी है...

( हा उपरोध आहे असे लिहून वाचकांचा अपमान करायचा नाही. पण लिहावे लागते. कारण उपरोध न समजून तंडायला सुरुवात केल्याची उदाहरणे अनुभवली आहेत. आणि म्हणे स्त्रियांना विनोद समजत नाही, उपरोध समजत नाही...)

या सर्व पुरुषप्रधान संस्कृतीच्या चिखलराड वाटेवर स्त्रियांना ही लांच्छने सोसावी लागतात याचे अतीव दुःख आणि संताप आहेच.

***

# सामग्रीची काळजी

एका खेडेगावात आम्ही महिलांचं 'पोषक आहार' हे शिबिर घेतलं होतं. त्यातले दोन दिवस स्वतःच्या प्रकृतीसाठी स्त्रियांनी घेण्याचा पोषक आहार या विषयावर असणार होते. सात दिवस रोज दोन तास चालणाऱ्या त्या शिबिरात पहिल्या दोन दिवसांतच त्यांच्याशी गप्पा प्रश्नोत्तरं झाल्यानंतर एक गोष्ट लक्षात होती की स्वतःसाठी आहार एवढ्याच विषयावर बोललं पाहिजे. पोषक आहार राहिला दूर... रोजचा पोटभरीचा आहारच यांनी वेळच्या वेळी घ्यावा बस्स एवढंच ठसवायला हवं.

या सत्तर-एक स्त्रियांमधील पन्नास-एक स्त्रिया अगदीच किरकोळ, निस्तेज, डोळे खोल अशा दिसणाऱ्या होत्या. जवळपास प्रत्येकीला पाळीतला स्राव खूप जास्त किंवा अगदीच कमी अशा तक्रारी होत्या. ज्यांना जंतुसंसर्गामुले श्वेत स्रावाची दुखणी होती अशा अगदी खंगलेल्या तरूण मुलींना तर त्यावर बोलायला तोंड उघडणंही पाप वाटत होतं.

अखेर चौथ्या दिवशी आमचे सांगणे शिकवणे, सकाळी उठल्यावर केवळ घोटभर कोरा चहा पिऊन दुपारपर्यंत रहाण्याऐवजी त्याच्यासोबत निदान आदल्या रात्रीची चतकोर-अर्धी चपाती-भाकरी तरी खात जा गं बायांनो इथवर येऊन अडकले होते. जेवताना स्वतःसाठी थोडीतरी भाजी, कोरड्यास जे काही केलं असेल ते राखून

ठेवा... सगळंच नवऱ्याला, सासरकडच्यांना वाढून लोणच्याशी चपाती भाकरी खाणं टाळा हे कानीकपाळी सांगत राहिलो होतो. त्यांच्या अन्नात येणारे पदार्थ तसे बरे होते. सुकटीचे विविध प्रकार, महिन्यात एकदा कोंबडी, मटण, ओली मासळी, भाजी असं विकत आणलं जायचं. पण त्यातलं तुम्ही किती खाता, वाटीभर तरी खाता का यावर क्षीण होकार येत होता. आणि मग हळुहळू कंठ फुटत सत्य डोकावू लागायचं. त्यांनाच काय, घरातल्या मुलींनाही यातल्या खास चिजा मिळत नसत. या तर कष्टकरी बाया होत्या. शेतात राबणं, गुरांपाठी राबणं, घरात राबणं... सगळंच करणाऱ्या.

पहिले दोन दिवस आमच्या तज्ज्ञांनी जी काही पोषक आहाराची पुस्तकी माहिती दिली ती ऐकताना त्यांचे आ वासत आणि जांभयाही येत. हा माझा तिसरा असाच अनुभव होता.

आज स्त्रीला एका धार्मिक थेरड्याने सामग्री म्हटले म्हणून वातावरण जरासे हिंदकळले. पेटूनबिटून काही उठत नसतो आपण. त्याने ते बोलणे चूकच होते. पण त्याने फक्त जे घडते ते निर्लज्जपणे बोलून दाखवले एवढाच काय तो दोष. नाहीतर भारताच्या शहरांत परिस्थिती जरा बदललेली असली तरी गावखेड्यांतून अजूनही हाच दृष्टीकोन आहे. प्रश्न असा आहे... या सामग्री तर सामग्रीचीही काळजी घेत नाहीत त्या सामग्रीचे तथाकथित रक्षक.

अशाच शिबिरातली एक लेक मला भेटायला लपून छपून आली. आणि रडत रडत सांगू लागली- ताई मला ना त्या वाटेने नुसतं दह्यासारखा पांढरं बाहेर येतं. आणि खाज तरी इतकी उठते की जाऊन जीव द्यावा वाटतं हो. विचारल्यावर सांगितलं की

गावातला डॉक्टर पुरुष आहे- त्याच्याकडे जायचं नाही म्हणून बंदी केलीय. काय मला दाखवायचं ते त्याला दाखवणार काय म्हणतो नि शिव्या घालतो. आणि तालुक्याच्या गावी लेडी डॉक्टर आहे तिच्याकडे जायला त्याला वेळ नाही. मी करू तरी काय... बायकोवर परपुरुषाची नजर पडू नये- आपल्या सामग्रीवर दुसऱ्या कुणाची नजर पडू नये हे मुख्य. मग त्या सामग्रीला वाळवी लागून ती कुरतडली गेली तरी बेहत्तर. ही वृत्ती भारतात रुजलेल्या सर्वच धर्मांच्या चौकटीतून पावन होते आहे. प्राचीन हिंदू धर्म, बौद्ध धर्म, जैन धर्म, शीख धर्म आणि ख्रिस्ती, इस्लाम, ज्यू- सर्वांनाच स्त्रीचे दुय्यमत्व सोयीचे पडते.

एका संपूर्ण समूहाला मालमत्ताच ठरवले की त्याचा मालमत्तेवरचा हक्कच संपतो. कायद्याच्या दृष्टीने सर्वात विकसित अशा इंग्लंडनेही तीच चलाखी केली होती. ‘कोवर्चर’ नावाने विवाहित स्त्रियांना मालमत्तेची मालकी असण्याची सोयच नव्हती. याला अपवाद होता केवळ राणीचा. अविवाहित स्त्रियांचा मालमत्तेचा हक्क मात्र अबाधित होता. मनुस्मृतीवर बोलण्यात अर्थच नाही इतके तिचे अन्यायीत्व आहे. विवाहित वा अविवाहित कुणालाच मालमत्तेचे हक्क नाहीत. अपवादांची जंत्री देऊ नका. नियम वेगळे अपवाद वेगळे.

घरात शिजवलेलं काय खावं, किती खावं, आपल्या प्रकृतीची काळजी घेण्यासाठी काय करावं याची सत्ता आजही आपल्यातील करोडो स्त्रियांना नाही हे सत्य आहे.

***

# एका यादीचा कल्लोळ...

२४ ऑक्टोबर २०१७ रोजी राया सरकार या विद्यार्थिनीने फेसबुकवर एक यादी पोस्ट केली. विद्यापीठांमधून, नामवंत शैक्षणिक संस्थांमधून विद्यार्थिनींना लैंगिक प्रकारचा त्रास, अधिक्षेप सोसावा लागतो, त्यात नामवंत प्राध्यापक सहभागी असतात ही काही गुप्त बातमी नाही. पीएचडी प्रबंध, एमफिल प्रबंध एवढेच नव्हे तर नेहमीच्या डिग्री शिक्षणातही अशा प्रकारे मुलींचे शोषण करण्याचे प्रयत्न होतात. कधी यशस्वी, कधी अयशस्वी.

कुणी कधी हिंमत दाखवून तक्रार केलीच तर व्यवस्थेतील बारकावे, सर्व उतरंडींतून जाऊन, सोपस्कार पार पाडून तक्रारीवर कारवाई होण्यास वेळही लागतो आणि ती कारवाईही फुसकी असते हाही अनुभव नवा नाहीच. अनेकदा तक्रार मागे घ्यायला लावणे, किंवा तोंडाला पानं पुसल्यासारखी दिखाऊ कारवाई होणे हे नित्याचेच. संस्थेची इभ्रत जाऊ नये म्हणून प्रकरण गोलमाल करणे, त्यात्या प्राध्यापकाचा दबदबा जातपात, पत प्रतिष्ठा, वरपर्यंतचे संबंध वगैरे गोष्टी आपले खेळ दाखवतच असतात, आणि विविध प्रकारे दबाव येऊन तक्रारदारानेच फार काही विवरण न देणे हे तर अगदीच सर्वसामान्य.

राया सरकारने एक यादी प्रसिद्ध केली. त्यात फार तपशील नाहीत पण व्यक्तींची नावे आणि संस्थांची नावे एवढे आहे. ही यादी तिने अनेक मुलींशी फोनवर बोलून

लिहून काढली आहे. या यादीतील लोकांबद्दल वृत्तवाहिन्यांनी चौकशी केली असता त्याबाबत कुठल्याच संस्थेतून दुजोरा मिळालेला नाही. काहींनी सांगितले की असे काही नाहीच, अशा कुणाचीही चौकशी अशा गुन्ह्यांसंदर्भात झालेली नाही, आणि काहींनी सांगितले की जी काही चौकशी झाली त्याचे तपशील संस्थेच्या नियमांनुसार आम्ही बाहेरच्या कुणालाही देऊ शकत नाही.

आता इन्जी पेन्नू नावाच्या विद्यार्थिनी ब्लॉगरने एक गूगलस्प्रेडशीट टाकली आहे आणि भारतातील विद्यार्थिनींना त्यात नावे भरायचे आवाहन केले आहे.

या सगळ्या प्रकारामुळे विद्यापीठे, शैक्षणिक संस्थांमधील वातावरण खळबळून निघाले असेल यात नवल नाही. पण एक वेगळाच संघर्ष उभा राहिला आहे तो स्त्रीवादी चळवळीमध्येच.

गेली अनेक वर्षे लैंगिक छळाची दखल कायदेशीरित्या घेतली जावी यासाठी स्त्रीवादी संघटना पद्धतशीरपणे काम करीत आल्या आहेत हे सत्यच आहे. पण हातपाय बांधून धावायला लावल्यासारखीच या कार्याची अवस्था आहे हेही तितकेच सत्य आहे. अनेकदा प्रखर प्रयत्न करूनही हे संभावित गुन्हेगार सहीसलामत सुटतात. पेपर तपासायची परवानगी काढून घेणे, काही काळापुरते विभागप्रमुख पद जाणे यापलिकडे काही फारसे होत नाही.

परंतु या यादीमुळे आपण करत असलेल्या शिस्तबद्ध प्रयत्नांना बाधा येईल असे या चळवळीतल्या जुन्या नेतृत्वाचे म्हणणे आहे. निवेदिता मेनन, कविता कृष्णन

यांसारख्या सातआठ स्त्रीवादी चळवळीच्या नेत्यांनी या यादीचा निषेध करून ही यादी फेसबुकवरून काढली जावी असे आवाहन केले आहे.

तर दुसरीकडे अनेक विद्यार्थिनी म्हणत आहेत की या यादीमुळे या प्रश्नावर प्रकाश तरी पडला. भारतीय संस्थांमधून या प्रश्नावर साधी चर्चाही होणे दुरापास्त असते. याला प्रमुख कारण मुलींच्या मनातील बदनामीची भीती हे असलं, तरीही आपण बोलून फारसा काही उपयोग होणार नाही, अर्धवट कारवाईनंतर पुन्हा आपण याच लोकांच्या तावडीत रहाणार आहोत याची ‘खात्री’ हे कारणही असतेच.

या मुलींनी नव्या युगात, सोशल मिडियाचा वापर करून असल्या लोकांची नावे प्रसिद्ध करून त्यांना शरमिंदे करण्याचा, आणि त्यांची कृष्णकृत्ये चव्हाट्यावर मांडण्याचा मार्ग स्वीकारला या मागे हेच कारण आहे. अशी यादी प्रसिद्ध केल्यामुळे कारवाई होऊ शकणार नाही. जोवर मुली निर्भयपणे समोर येऊन संस्थागत व्यवस्थेत स्पष्ट तक्रार करणार नाहीत तोवर संस्थांना काहीही कारवाई करता येणार नाही. पण निदान तशा व्यक्तींचे जाहीर धिंडवडे तरी निघतील अशा त्यांची अपेक्षा आहे.

या यादीची दखल परस्पर घेऊन काहीही कारवाई करणे संस्थांच्या नियमांत आणि नैतिकतेही बसणारे नाही. कारण अशा प्रकारे झालेले सर्वच आरोप खरे असतील असेही नाही. अनामिक राहून केलेल्या आरोपांत कुणालाही ठरवून लक्ष्य केले जाण्याचीही शक्यता असतेच. आणि आरोपीच्या पिंजऱ्यात उभ्या केलेल्यांनाही योग्य प्रकारे चौकशी होण्याचा, आपली बाजू मांडण्याचा अधिकार आहे.

राया सरकारने ही यादी प्रसिद्ध करण्यापूर्वी इमेल्स, स्क्रीनशॉट्स, आणि लिखित स्वरुपातील साक्षी गोळा केल्या आहेत. पण तक्रारदारांच्या परवानगी शिवाय ती ते सारे जाहीर करणार नाही. त्यामुळे सध्या तरी हे सारे वादळ केवळ एक प्रश्न ऐरणीवर आणण्यासाठीच उठले आहे हे स्पष्ट आहे.

१९९७साली सर्वोच्च न्यायालयाने जी मार्गदर्शक तत्वे घालून दिली त्या आधारे अनेक शैक्षणिक संस्थांतून लैंगिक शोषणाच्या प्रश्नात काम करणाऱ्या समित्या स्थापन झाल्या. २०१३मध्ये कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळासंबंधीचा कायदा मंजूर झाल्यानंतर या समित्यांची थोडीफार पुनर्रचना करण्यात आली.

कारवाईची प्रक्रिया कोणत्याही कायदेशीर प्रक्रियेइतकीच गुंतागुंतीची आहे. समिती-उपसमिती, शोधन, पडताळणी हे सारे तीन महिन्यांत पूर्ण करायचे आणि मग त्यांच्या शिफारसी कुलगुरूकडे किंवा व्यवस्थापकीय मंडळाकडे पाठवायच्या. कोणतीही कारवाई झाली तरी ती त्या व्यक्तीच्या सर्विस बुकमध्ये नोंदली जाते. आणि संपूर्ण चौकशीसंबंधी पूर्णपणे गुप्तता पाळली जाते.

या यादीत नाव असलेले, आणि एकंदर विवादात भाग घेणारे एक प्राध्यापक पार्थ चतर्जी म्हणतात, की या प्रक्रियेला कंटाळून जाणे स्वाभाविक असले तरीही केवळ तोंडी आरोपांच्या आधारे अशा याद्या प्रसृत केल्यामुळे काहीच साध्य होणार नाही. न्याय मिळणे शक्य होणार नाही. आपल्या शैक्षणिक संस्था स्त्रियांसाठी सुरक्षित ठराव्यात या दिशेने हे पाऊल निरुपयोगी ठरेल.

पण त्याच वेळी दिल्लीच्याच एका कॉलेजच्या माया जॉन म्हणतात अशी यादी बाहेर येते याचाच विचार गांभीर्याने करायला हवा. आज जी काही पद्धत अनुसरली जाते ती निष्प्रभ का ठरते आहे याचा विचार करणे या यादीमुळे भाग पडते आहे. या समित्यांवरील अनेक सदस्य व्यवस्थापनाने नेमलेले असतात. ही प्रकरणे कशी हाताळावीत यात व्यवस्थापनाची जी भूमिका असेल त्यालाच साजेसे सारे पार पडू शकते. त्यामुळे पुनर्विचार व्हायलाच हवा.

संस्थेची इभ्रत हा जो काही सोयिस्कर प्रकार असतो त्यात अनेकदा शोषणाच्या बळी ठरलेल्या स्त्रियांनाच गप्प केले जाते हे सर्वत्र सत्य आहे. कधीकधी न्याय्य निर्णय घेतल्यानंतरही त्यांना न्यायालयात आव्हान दिले जाते आणि मग त्याला स्थगिती मिळवता येते. विद्यार्थिनींना अनेकदा एका विशिष्ट मर्यादेपुढे लढता येणे आर्थिक-सामाजिक कारणांमुळे शक्य होत नाही आणि मग हे संभावित शोषणकर्ते मोकळेच रहातात.

माया जॉन म्हणतात त्याच्याशी मी सहमत आहे. अशी यादी सार्वजनिक अवकाशात यावी वा न यावी, अशे करणे योग्य की अयोग्य याची चर्चा होत राहू द्यात, पण आता ती आलीच आहे हे स्वीकारून हे का घडले याच्या कारणांपर्यंत जाऊन त्या कारणांचे निराकरण करण्याची ही संधी आहे.

अशा याद्यांचे आवाहन केल्यास, अनेक घटक त्याचा वैयक्तिक हेवेदाव्यांच्या विद्यापीठीय राजकारणासाठी गैरवापर करतील ही भीती निश्चितच आहे, म्हणून या प्रकारच्या याद्यांना उत्तेजन देण्याचे कारण नाही. पण कधीकधी अशी वादळे

डबक्यांवर साठलेले शेवाळाचे तवंग घुसळून दूर करू शकतात हे तर सत्यच आहे ना.

सोशल मिडियातून चालवलेला न्यायाचा प्रयत्न कदाचित् कायद्याच्या चौकटीत यशस्वी होणार नसला तरीही लोकांना प्रश्नाचे भान देणे, जाणीवजागृती करणे यासाठी या तरुण स्त्रियांनी सोशल मिडियात काही लोकांना उघडे पाडायचा निर्णय घेतला तर ते समजून घ्यायलाच हवे.

***

# विवेकनिष्ठा आणि स्त्री

प्रथमोपचार कसा द्यावा यासबंधीची एक कार्यशाळा सुरू होती. बेशुद्ध पडणे, मूर्च्छा येणे यातील फरक सांगताना शिकवणारे डॉक्टर म्हणाले होते की अनेकदा स्त्रिया बेशुद्ध पडतात तेव्हा ती खरी बेशुद्धी नसते. थकव्याने आलेली मूर्च्छा किंवा चक्कर असेल किंवा अगदी काहीच झालेले नसतानाही त्या बेशुद्ध असल्यासारख्या पडून रहातील. पाणी शिंपडण्यामुळे खरी बेशुद्धी जात नाही. पुढे डॉक्टरांनी सांगितल- असे जरी असले तरीही तुम्ही लगेच आजुबाजूच्यांना ही बेशुद्धी खरी नाही वगैरे सांगण्याची गरज नाही- कारण तुम्हाला माहीत आहे आपल्या देशात स्त्रियांना, विशेषतः गावातल्या स्त्रियांना किती कमी विश्रांती मिळते. अंगमेहनतीची कामे पुष्कळ, खाणेपिणे जरा दुय्यम दर्जाचेच आणि समाज पुरुषप्रधान मानसिकतेचा असल्यामुळे मानसिक त्रासही भरपूर असतो. अशा वेळी स्त्रिया अजाणता अशा प्रकारे विश्रांती शोधतात. देह आणि मन एकत्र येऊन ही पडून रहाण्याची विश्रांती खेचून घेते. त्यांचे त्यांनाही ते कळत नसते. तेव्हा कृपा करून प्रथमोपचारक म्हणून तिथे हजर असल्यास ती स्त्री बेशुद्धीचे नाटक करत होती वगैरे विधाने करू नका.

त्या डॉक्टरांचे मला फार कौतुक वाटले होते. भारतातील स्त्रियांची एकंदर परिस्थिती विचारात घेऊनच आपल्याला त्यांच्या आरोग्याच्या प्रश्नांचा विचार

करावा लागतो. त्यांच्या शारीरिक तसेच मानसिक आरोग्याची मुळे ही एकंदर समाजाच्या घडणीतच गुंतलेली आहेत.

या सामाजिक परिस्थितीबद्दलचे विश्लेषण करीतच स्त्रियांचे मानसिक रोग, भयगंड, विकलता, आणि त्या पोटी विवेकनिष्ठेचा ऱ्हास कसकसा होतो याची मांडणी करावी लागणार आहे. विवेकनिष्ठा नसलेल्या स्त्रियांना एकंदरीतच मूर्खात काढले जाऊन त्यांची अप्रतिष्ठा करणे सोपे असते. समाजातील स्त्रीचे स्थान दुय्यम ठेवण्याची अनेक साधने बाद झाल्याच्या या नव्या काळात कोणते मार्ग स्त्रीच्या प्रगतीला बाधक ठरतील हे लक्ष देऊन पाहावे लागेल.

ज्या अविवेकी वर्तनाची किंवा विचाराची बळी माणूस ठरतो त्याच अविवेकाचा आधार माणूस कसा काय घेऊ लागतो हा प्रश्न आपल्याला अनेकदा पडतो. स्त्रियांच्या बाबत हे अधिकच खरे आहे कारण संस्कार, संस्कृती, सामाजिक प्रथा, चालीरीती, कुळाचार या नावांखाली अनेक अविवेकी, अविचारी बंधनांचे सोसणे याचे नाव भारतीय स्त्री. हे या देशातील एका लहानशा मर्यादित कप्प्यातल्या चिमूटभर स्त्रियांबाबत खरे नसेल, पण सर्वसाधारण चित्र हेच आहे. ते जाती, वर्ग, धर्म या सर्व स्तरांतून दिसते. शैक्षणिक पात्रता वाढत गेल्यानंतर स्त्रिया बऱ्याच अंशी या जुनाट अविवेकाच्या प्रथांतून काही अंशी सुटल्याचे दिसते, पण ती मुक्तता पूर्ण झालेली नाही. किंबहुना, आधुनिकतेच्या नव्या मूल्यांसोबत तथाकथित सांस्कृतिक मूल्ये आम्ही टिकवून ठेवतो हे म्हणण्याच्या सोसापायी शिक्षित आधुनिक स्त्रीची कुतरओढ चाललेली संपन्न वर्गातून, जन्मतःच लाभलेल्या तथाकथित उच्च जातींमधून सातत्याने दिसते.

मनु काय, कौटिल्य काय आणि स्त्रियांसाठी सदाचार मुक्तावली लिहिणारे मध्वाचार्य काय हे सारेच भारतीय स्त्रियांच्या मानगुटीवर आजतागायत स्वार झालेल्या पुरुषप्रधान संस्कृतीचे रचनाकार होते. त्यांच्या काळातील रूढ प्रथा किंवा समाजरचनेला बळकटी देणारे दंडक त्यांनीही रचले आणि राजांकरवी त्या दंडकांची अंमलबजावणी होत राहिली.

मात्र आजच्या लोकशाही भारतात त्या पूर्वीच्या दंडकांना कायद्याचे थेट अधिष्ठान नसले तरीही भारतीय मानसात हेच दंडक रुजलेले आहेत. आणि हे दंडक स्त्रियांच्या मनात खोलवर रुजल्यामुळे त्यातील अन्यायकारक मूल्यव्यवस्थेविरुद्ध ब्र काढणाऱ्या किंवा ते झुगारून देणाऱ्या स्त्रिया म्हणजे रोल मॉडेल न बनता खलप्रवृत्तीच्या असल्याचा एक अंतःप्रवाह सर्वत्र संचार करत असतो.

या जोडीलाच स्त्रियांचे माणूसपण खच्ची करणाऱ्या इतरही अनेक गोष्टी संस्कृतीच्या साच्यात घडलेले स्त्रीपुरुष करत असतात. स्त्रियांकडे विनोदबुद्धी कमी असते, स्त्रिया नीट विचार करू शकत नाहीत, स्त्रिया भावनेने विचार करतात- तर्काने नव्हे- हृदयाने करतात, मेंदूने नव्हे, अखेर बाईची अक्कल ती केवढी असणार, सोबत अखेर कुणीतरी पुरुष हवाच, शेवटी बाईनेच पडतं घ्यावं लागतं, पुरुषाचा अहं दुखावला तर तो काम तरी कसं करणार वगैरेंच्या सोबत- स्त्रियांमध्ये सहनशक्ती जास्त असतेची फोडणी बसते. आपल्या संपूर्ण परिसरात, बालपणापासून हेच अगदी सहज ऐकत झेलत असलेल्या स्त्रिया नकळत विकल होत जातात. आपण वेगळ्या पडू, आपले कुटुंबीय आपल्यावर प्रेम करेनासे होतील, आईबाबांना आवडणार नाही,

अखेर कुटुंबाच्या पलिकडे काय आहे वगैरे चिंतांच्या जंजाळात स्त्री आपल्या विवेकबुद्धीचा स्वहस्ते भुगा करत रहाते.

स्वतःच स्वतःची विवेकबुद्धी अशा तऱ्हेने तडजोडीच्या दलदलीत फसू देणे हे काही फक्त स्त्रिया करतात असे नाही. स्त्री, पुरुष आणि भिन्नलिंगी अशी सारीच माणसे हे करू शकतात. या देशात सामाजिक उतरंडीत खालच्या समजल्या जाणाऱ्या जातींप्रमाणेच ब्राह्मणवादी पुरुषी वर्चस्ववादाचा वरवंटा स्त्रियांच्या विचार शक्तीवर फिरत राहिलेला आहे.

नवीन युगाच्या आव्हानांना सामोरे जाताना, बुद्धीजीवी असताना आपण स्त्रियांनी नाहक कुठल्यातरी जुनाट पुरुषप्रधान संस्कृतीचे ओझे बाळगून पावले रखडत चालत राहू नये याची काळजी आपली आपण वाहिली पाहिजे.

रोजचे आयुष्य जगताना, कुटुंबासोबत जगताना, आपल्या माणूस म्हणून जबाबदाऱ्या सच्चेपणाने निभावताना, पुढे जाताना बुद्धीचे, प्रतिभेचे पंख पसरू पाहाताना आपल्या पायातल्या बेड्या निघाल्या आहेत पण कोळीष्टके चिकटून राहिली आहेत याचे भान आणायची स्त्रियांना- मुलींना, तरुणींना, प्रौढांना, वृद्धांनाही गरज आहे. आणि ही कोळीष्टके साफ करण्यासाठी परखड सत्याचा, विवेकनिष्ठेचाच व्हॅक्यूम क्लीनर वापरावा लागेल. कोळीष्टके विणणारे कोळीही गारद करावे लागतील आणि पुन्हा कुठे नवी जळमटे निघू नयेत म्हणून मनाचे कानेकोपरे नेहमीच लख्ख ठेवावे लागतील. हे रोज करावे लागणारे काम आहे. स्थित्यंतराचा काळ तसा कधीच संपत नसतो. समाजाची उत्क्रांती होणे ही सततची प्रक्रिया आहे. आणि ती आपोआप होत नसते तर त्या उत्क्रांतीचा कारक समाजाचा प्रत्येक घटक असू

शकतो. मागे खेचणारे कारक जसे असतील तसेच पुढे नेणारेही असतात. विवेकनिष्ठा म्हणजे अखेर काय? सामाजिक उत्क्रांतीमध्ये तिचा सहभाग कसा असू शकतो.

फार पूर्वीच्या, अगदी प्राचीन काळातील अनुभवांवर, गरजांवर आधारित असे जे नियम असतात ते जेव्हा कालबाह्य ठरतात तेव्हा ते सोडून देणे म्हणजे विवेक. त्या कालबाह्य गरजांभोवती बेतलेल्या प्रथा परंपरा सोडून देणे म्हणजे विवेक. आणि आपल्याला जे पटले आहे ते लोकमताची, आप्तमताची पर्वा न करता अंमलात आणणे म्हणजे विवेक निष्ठा. हे प्रत्येक बदलत्या कालखंडात व्हावेच लागते. कालबाह्य परंपरा, नियम, आणि संस्कार बुद्धीच्या निकषांवर उतरत नसतानाही केवळ संस्कृतीजतनाच्या नावाखाली पाळणे, कुळाचार म्हणून पाळणे हा अविवेकच. कधीकधी लोक, विशेषतः स्त्रिया या परंपरा पालनामुळे आपल्याला आनंद मिळतो, स्नेहसंमेलने, आप्तभेटी होतात अशा लंगड्या सबबी देताना पाहायला मिळते. पण इथे मला खरोखरच आठवतो कोळीष्टकाच्या एखाद्या धाग्याला अडकून जोरजोरात फडफडणारा एखादा कीटक. तो फडफडतो म्हणजे तो काही जोरात उड्डाण करीत नसतो. तो हतबल होऊन थकत जातो. आणि अखेर शक्तीहीन लटकत रहातो. त्याला खायला कोळी आला नाही तरीही तो केवळ थकूनच मरून जातो.

स्नेहभेटींना विवेकी पर्याय असतात, नटण्यासजण्यासाठी, सुग्रास अन्न खाण्यासाठी इतर योग्य कारणेही मिळू शकतात. पण आपण ज्यात केवळ ओझ्याचे शिंगरू बनून सांस्कृतिक येरझाऱ्यांनीच हेलपाटणार असू, आणि आपल्या व्यक्तिमत्वात त्यामुळे काहीही चांगला फरक पडणार नसेल तर मग हा सांस्कृतिक

अविवेक सोडायलाच हवा. कठीण वाटले तरीही बुद्धीच्या कसोटीवर आपली कृती तपासून पाहात मगच त्यावर वेळ, पैसा आणि मुख्य म्हणजे स्वतःचे कष्ट खर्च करणेच श्रेयस्कर आहे. माणूसपणाचे आहे. उत्क्रांतीच्या प्रक्रियेत मानवी समाजांचे विचार एका विशिष्ट काळात अडकून पडतात हे खरे आहे. पण त्यावर मात करून पुढे जाणे हीच सामाजिक आणि बौद्धिक उत्क्रांतीची योग्य दिशा आहे.

***

# सोन्याची वेसण

मध्यम परिस्थितीतील अनेक दांपत्ये केवळ बायकोच्या अंगावर सोन्याचे दागिने हवेत, पोटावर लोंबत येईल एवढे तरी लांब मंगळसूत्र हवे, चारदोन बांगड्या, कानातले हवेत या हट्टाग्रहापोटी संसाराच्या सुरुवातीलाच घायाळ होत असलेली दिसतात. घरात जीवन सुखकर करणाऱ्या गरजेच्या वस्तू एकवेळ नसल्यातरी चालवून घेतात. पण प्रतिष्ठेचे सोने मात्र अंगावर हवेच अशी विशेषतः स्त्रियांची मानसिकता असते. यात उभयपक्षी आया, बहिणी, आज्या, मावश्या हिरीरीने सामील होतात.

सोन्याच्या दागदागिन्यांचा इतिहास तसा सुरस आहे. इजिप्शियन, ग्रीकोरोमन, आणि भारतीय संस्कृतीत सुवर्णालंकारांचे स्थान विशेष होते. नंतर हे लोण तसे जगभर पसरले. पण अजूनही युरोपीय देशांतील सर्वसामान्यांमध्ये सोने अंगावर घालण्याचे वेड भारताच्या तुलनेत अत्यल्प आहे. पण त्यामुळे त्या कमी सुरक्षित आहेत, किंवा कमी सन्मान्य आहेत असे अजिबातच झालेले नाही. मात्र भारतात सर्वत्र जरासे स्थैर्य आलेल्या कुटुंबांत सोन्यासाठी जीव पाखडायला बायका आणि पुरुषही तयार असतात.

कर्ज काढून लग्ने केली जातातच. पण त्यातला एक मोठा भाग सोन्याच्या अंगठ्या, आणि इतर सोन्याच्या दागिन्यांवर खर्च करण्यासाठीच होतो.

एक जवळपास अनाथ मुलगा आठवतो. जवळपास अनाथ म्हणजे वडील नव्हते आणि आई अपंग. इमारतींच्या जिन्याखाली झोपून, सार्वजनिक नळ-संडास इथं प्रातर्विधी करून आयुष्याची दहा वर्षे  मुंबईत त्याने काढली होती. मग केबलवाल्याकडे नोकरी लागल्यावर झोपडपट्टीत एक जागा घेऊन तो राहू लागला. ओळखीपाळखीच्या सर्वांनी त्याला घर लावायला वस्तू देण्यापासून मदत केली. याने लग्न ठरवलं. आणि म्हणाला माझं एक स्वप्न आहे ताई... बायकोला मला दोनपदरी लांब सोन्याचं मंगळसूत्र करायचं आहे. बास, फक्त तेवढ्यासाठी कर्ज काढणार आहे... त्याला अनेक प्रकारे समजावले तरीही त्याने शेवटी तेच केले. पन्नास हजार रुपये कर्ज मंगळसूत्रासाठी. या कर्जात मान अडकवूनच त्याने संसार ओढायला सुरुवात केली. मग नोकरीच्या ठिकाणी इथेतिथे हात मारायची सुरुवात केल्याविना सोन्याचं कर्ज फिटण्यासारखं नव्हतंच.

सोन्याच्या देवाणघेवाणीची विवाहाच्या व्यवहारांत फार मोठी परंपरा आहे. भलेभले लोक होणाऱ्या बायकोच्या, सुनेच्या घरच्यांकडून सोन्याची भीक मागून घेतात. भीक ती भीक मागायची वर शिरजोरी करायची हे तर केवळ आक्रीतच. पण त्याला समाजमान्यता आहे.

एखाद्या लग्न समारंभाला गेल्यावर नववधूच्या अंगावर किती तोळे सोने आहे, त्यातलं माहेरच्यांनी किती घातलं, सासरच्यांनी किती घातलं याचा अंदाज नजरेनेच मांडणारे निष्णात लोक तिथे जमलेले असतात. आसेतुहिमाचल लग्नात सोन्याचं महत्त्व नववधुवरांपेक्षा अधिक असतं. सोन्यावरून लग्न मोडतात, आणि सोनं दिलं जातंय म्हणून विजोड विवाह उरकलेही जातात. उच्चशिक्षित, उच्चप्रतिष्ठित

स्थळांसाठी सोनं मोजण्याची पद्धत समाजाच्या अंगवळणी पडली आहे. या सोन्याने नाते जुळून येते तेच मुळात भेगाळलेले असते असा विचार क्वचितच कुणाला शिवत असेल.

माझी स्वतःची आठवण आहे. आम्ही ठरवलेलं लग्नात सोन्यावर एक पैही खर्चायची नाही. माझ्या आईलाही सांगितलं, तुला काय द्यावंसं वाटत असेल तर घरातल्या उपयोगी वस्तू उपकरणे दे. फ्रीझ, अव्हन, मिक्सर यातलं सारं. सोनं नकोच. तरीही तिने कानातले हट्टाने घेतले. सासरचं मंगळसूत्र चांदीतलं होतं आणि वाटी सोन्याची. माझं लक्षही गेलं नव्हतं. पण अनेक भोचक भवान्यांनी हे काsssय सासरच्यांनी चांदीतलं मंगळसूत्र घेतलं म्हणून चुकचुक केली होती. मला मंगळसूत्राचीच फिकीर नव्हती तर ते सोन्याचं असण्याची वा नसण्याचीही काही फिकीर नव्हती हे त्यांच्या पचनीच पडत नव्हतं.

सोनं स्त्रीच्याच नव्हे तर कुणाच्याही अंगावर का असावं याची आर्थिक कारणे अर्थातच फार जुनी आहेत. सोनं ही एक हमखास द्रव्य मिळवून देणारी गोष्ट. राजेरजवाड्यांपासून ते सामान्यांपर्यंत सोनं हे त्यांच्या धनिकतेचं मोजमाप. संकटकाळी ते विकून आवश्यक त्या वस्तू घेण्यासाठी सोयीचे.

स्त्रीच्या नावे घर, शेती, मालमत्ता नसण्याच्या काळापासून स्त्रीधनाची संकल्पना रुजली होती. स्त्रीधन म्हणजे बहुधा सोन्यारुप्याचे दागिने, भांडी. ते तिच्या हक्काचे. आपत्तीच्या काळात ते विकून तिला आधार व्हावा हीच कल्पना. तरीही हे स्त्रीधन अन्याय्य परिस्थितीत तिच्या मदतीला येऊ शकत नाही याचीही अगणित उदाहरणे आहेत. नवरा मरून गेलेल्या आणि पदरात फक्त मुली असलेल्या स्त्रियांचे स्त्रीधनाचे

दागिने लुबाडून घरातून हाकून दिल्याची किंवा घरातच मोलकरीण म्हणून राबवल्याची उदाहरणे अनेक कुटुंबांत घडली आहेत. दागिने चोरीला गेल्यानंतर तर बायका फारसे काहीच करू शकत नाहीत.

विशेषतः या आधुनिक काळात स्त्रीधनाची कल्पना आता आपले संदर्भ हरवून बसली आहे. आता सुरक्षिततेसाठी घर, जमीन, दुकान वगैरे मालमत्तांमध्ये स्त्रीचे नाव असणे हे गरजेचे आहे. तिचा वैद्यकीय विमा, आयुर्विमा असणं महत्त्वाचं आहे, तिची वेळच्या वेळी वैद्यकीय तपासणी होणे गरजेचे आहे. तिचे मन मारून तिला घरकामात राबवून घेणं बंद करणं गरजेचं आहे. या गोष्टी कुणी सहजासहजी लुबाडू शकत नाही.

स्त्रियांच्या दृष्टीने सोन्याचांदीपेक्षाही अधिक महत्त्वाचे आहे ते शिक्षण, कौशल्य आणि आत्मविश्वास. फोलपटी परंपरा झुगारून स्वत्व सांभाळण्याची ताकद.

नका मागू दागिने, नका खर्च करू दागदागिन्यांवर. महागडे सोन्याचे दागदागिने हे अखेर स्त्रीवर घातलेल्या वेसणी, लोढणी, बेड्याच आहेत. ते तिने हौस वाटल्यास क्वचित स्वतःच्या हिंमतीवर, स्वतःच्या मिळवलेल्या पैशाने विकत घ्यावेत, पण सासरचे, माहेरचे, नवरा या नात्यांकडून परंपरागत अपेक्षा म्हणून घालून घेऊ नयेत. त्यात आपण तोळ्यातोळ्याने आपले स्वातंत्र्यच गमावत असतो याची खूणगाठ बांधावी.

एवढं सोनं घातलं अंगावर तरीही हिचं समाधान नाही असा कसलासा भाव त्या सोन्यामध्ये असतो.

विचार करा, अंगावर सोनं घालून तुमच्या सुखात भर पडते की वरपांगी प्रतिष्ठेत?

गळाभर माळा, हातभर पाटल्या बांगड्या, जिथंजिथं म्हणून तारा अडकवणं शक्य आहे तिथे तिथे अलंकार घालून तुमची दुःखं कमी होतात? स्वत्वाचा ठायीठायी अपमान होणं थांबतं? आसवं गळायची थांबतात?

तुम्ही कपड्या-दागिन्यांच्या उत्पादकांच्या जाहिरातींनी पुरस्कृत केलेल्या मालिका पाहाता... तस्सेच काहीतरी अंगावर हवे म्हणून खुळावता. आणि त्या हट्टापायी स्वतःच्या स्वच्छ, सन्मान्य अस्तित्वाची साधी सुखे लाथाडता.

कुठल्या ना कुठल्या परंपरागत सण-समारंभात आपली कौटुंबिक वत्ता किती आहे हे जगाला दिसावे म्हणून सोने लादून झुलत असलेल्या स्त्रिया आणि त्यांच्या भरजरीपणातून दिसणाऱ्या स्वतःच्या इभ्रतीकडे समाधानाने नजरा टाकणारे त्यांचे कुटुंबपुरुष आपल्याला पाहायला मिळतात.

अनेक मोक्याच्या सरकारी अधिकारपदांवरील स्त्रिया लाच खातात ती सोन्याच्या रुपात हे ही ऐकून असाल. एका बाईंचा फाईल पुढे सरकवण्याचा रेटच एक ग्रॅम, दोन ग्रॅम, एक तोळा या मापात असे. आणि खणात उघडून ठेवलेल्या जेवणाच्या डब्यात लाल पुडी टाकायची असे त्यांचे तंत्र होते. या लाचखाऊपणातले वेगळेपण म्हणजे बाईंचा सोन्याच्या दागिन्यांचा सोस हेच. अनेक लाचखाऊ पुरुष अधिकारीही आपल्या बायकोसाठी दागिने या मिषाने लाच घेतात. एकंदर सोन्याचे दागिने हे समाजातील हर प्रकारच्या भ्रष्टतेची लक्षणे ठरू लागले आहेत.

'चोरीचा मामला' नावाचा एक जुना मराठी सिनेमा आठवतो. अगदी गरीबीत रहाणारे मायलेक. ललिता पवार आणि निळू फुले या दोघांनी तो सिनेमा जिवंत केला होता. त्यात अखेरीस लेकाला लुटीतले सोन्याचे दागिने मिळतात. पैसे मिळतात. दोघं तो आनंद साजरा करण्यासाठी एकत्र बसून चवीचं जेवतात. पोटभर समाधान पावतात. आणि मग म्हाताऱ्या आईला ते दागिने घालून बघण्याची हुक्की येते. ती ते भराभरा अंगावर चढवते. आरशात बघत रहाते... आणि हर्षातिरेकाने हसू लागते. खूप हसते, खूप हसते... आणि आरशासमोर बसून आपलं दागिन्यांनी सजलेलं रुप पाहून हसता हसता हृदय बंद पडून बसल्याबसल्याच मरून जाते.

ते सिनेदृश्य मला अजूनही लख्ख आठवतं. आणि वाटतं कधी काही न मिळालेल्या म्हातारीचं हृदय बंद पडलं असं नाही. सतत सोनं अंगावर लादून घेत त्यातच आनंद मानणाऱ्या अनेक बायकांच्या हृदयांचे किती कप्पे बंद पडलेले असतील...

अतिशय अनुत्पादक अशा प्रकारची सोन्यातली गुंतवणूक म्हणजे अंगावरचे दागिने. यातून जोवर तुम्ही पैसे उभे करायला कर्ज काढत नाही, तोवर ते दागिने म्हणजे जिवाला घोर, आणि सामाजिक वेसण एवढे दोनच हेतू साध्य करतात. तरीही भल्या मोठ्या प्रमाणात सोन्याचे दागिने घडवणारे जवाहिरे, त्यांच्या दुकानांच्या चकचकाटी जाहिराती, त्यांची आलिशान, थंडगार दुकाने हा सारा व्यवहार बहुतांश स्त्रियांच्या संवेदनाहीन अशा दागिन्यांच्या सोसाच्या आधारावर सुरू रहातो.

एका संपूर्ण समाजाची समसमान प्रगती व्हायची असेल तर समाजातील सर्व घटकांची सामाजिक, शैक्षणिक प्रगती विषम असून चालत नाही. पण विषम प्रगतीचे

लाभार्थी अनेक असतात. समाजातील एका महत्त्वाच्या घटकाला एका निर्बुद्ध आसक्तीत- सोन्यानाण्याच्या आसक्तीत गुंतवून ठेवणे ही विषम प्रगतीच्या लाभार्थींचीच चाल म्हणावी लागेल.

हा आज न पचणारा विचार वाटेल. पण हा भविष्याचा विचार आहे. तरुण मुलींनी सोन्याचे दागिने घडवण्याचा सोस टाकून द्यावा. स्वतःला घडवण्याचा सोस धरावा- इतकेच मागणे.

***

# दिवाळीच्या फराळाची नस्ती कसरत

दिवाळीबद्दल काही लिहिले तर भावुक लोकांच्या भावनबिवनांचा चिवडा होतो. तरीही दिवाळीचा फराळ करणाऱ्या आणि परंपरा सांभाळणाऱ्या साध्यासुध्या स्त्रिया या विषयाचे विश्लेषण करायला हरकत नाही.

एक जाहिरात अलिकडेच आली होती. सून तयार फराळ आणून बरण्यांतून भरताना तिचा नवरा म्हणतो- हे काय, असलं काही आईला आवडायचं नाही. तिला स्वतःला फराळ करायला खूप आवडतं. तिला हे तू केलेलं अजिबात चालणार नाही. तेव्हा सून सांगते, सासूबाईंना माहीत आहे आणि त्यांची संमती आहे. या दिवाळीला फराळ करण्याचा वेळ त्या स्वतःला हवा तसा घालवणार असं त्यांनीच कबूल केलंय. मग ती तिच्या सासूबाईंसाठी काढलेली तिकिटं वगैरे सांगते- जो जाहिरातीचा भाग असतो.

ही जाहिरात खरंच खूप भावली.

घरोघरच्या मध्यमवर्गीय स्त्रिया घरादारासाठी फराळ करणे यासाठी रात्रीचा दिवस करून आणि कंबरडे मोडून घेऊन मोठमोठाले डबे भरून दिवाळीचे सात-आठ ठरलेले पदार्थ करण्यात दिवाळीच्या आधीचे काही दिवस घालवत असत.

पूर्वी घर-चूल-मूल याच महामंत्राने जीवन कंठणाऱ्या स्त्रिया एकत्र कुटुंबात होत्या. दुसरे काहीच व्यवधान नाही आणि पाचसहा बायका एकत्र काम करताना हा सारा प्रकार जमवण्यासारखा होता. परातींच्या हिशेबाने सगळे पदार्थ करणे, त्यांची

वाटावाटी करणे हा कदाचित् काहीजणींसाठी विरंगुळा, मन रमवण्याची एक संधी असू शकली असती.

साठ-सत्तरच्या दशकानंतर जसजशी कुटुंबे स्वतंत्र होऊ लागली, स्त्रियांच्या कमाईची गरज पडू लागली आणि स्त्रिया घरची नि बाहेरचीही आघाडी सांभाळू लागल्या तसतशी सणवार हे एक जबरदस्तीचे ओझे होऊ लागले हे निदान काही बायकांना निश्चित पटेल. परंपरां सांभाळण्याचा बडीवार माजवणाऱ्या, पितृसत्ताकात मुरलेल्या स्त्रियांना हे पटणार नाहीच.

परंपरा सांभाळण्याचा किंवा तोडण्याचा मुद्दा घडीभर बाजूलाच ठेवू. दिवाळीचा फराळ या गोष्टीत गुंतलेल्या कष्टांचा, व्यर्थतेचा आणि त्याचबरोबर बदललेल्या आर्थिक स्थितीचा विचार आपण स्त्रियांनी करायलाच हवा.

एक म्हणजे ही साताठ पदार्थांचा फराळ करण्याची परंपरा तशी अगदीच अलिकडची. पैसेवाल्या, जमीनदारी, खोती असलेल्या घरांतून असा फराळ होत असे. पण शेतकरी, कष्टकरी बहुजनसमाजातच काय गरीब पुरोहितांच्या घरांतही पोहेदिवाळी असे. मळणी करण्याचा मौसम म्हणजे दिवाळीचा मौसम. नव्या धान्याचा उत्सव. कोकणासारख्या भातपिकाच्या प्रदेशात पोहेदिवाळी असे. गूळपोहे, दूधपोहे, दहीपोहे, चिंचेच्या कोळातले पोहे, ताकातले पोहे आणि फार भारी म्हणजे फोडणीचे किंवा दडपे पोहे रोजच्या रोज ताजे करून खाण्याचा उत्सव. तळणीच्या पदार्थात बोरं- म्हणजे तांदळाच्या पिठात गूळ कालवून बोराएवढे गोळे तळून काढत. जिथे भात नाही तिथं गव्हाच्या पिठात गूळ कालवून बोरं. हे असलं साधंसुधं गोडाधोडाचं खाऊन पुन्हा अंगमेहनत होतीच. बोरं खाऊन पोरं खूष. दारावर

येणाऱ्या मागत्यांनाही तीच दिवाळी- पसाभर पोहे आणि ओंजळभर बोरं. हे सारं आता पुरतं विस्मरणात गेलं.

आज आपल्याकडे जीवनशैली पार बदलली. विकारांचा हल्ला बदलला. आपण सणांच्या खादाडीत बदल केला तो आर्थिक सुबत्तेला साजेसा केला, बदलत्या जीवनशैलीशी पूर्ण विपरीत असा. विशेषतः स्त्रियांचे कष्ट वाढवणारा आणि खाणारांची तब्येत बिघडवणारा.

स्वतंत्र झालेल्या चारपाच माणसांच्या कुटुंबातल्या बायका जवळपास एकट्याने फराळासाठी राबतात आणि अनेकदा तब्येती बिघडवून घेतात याचा आपण विचार करायला हवा ना?

एक तर ते सारे परातींच्या हिशेबातले पदार्थ तुपातेलात तळलेले, मळलेले, पांढऱ्या साखरेत घोळलेले असतात. काही काळापूर्वी खाण्याची विविधता कमीच होती तेव्हा त्यांचे अप्रूप होते. आता परंपरा म्हणून तेच ते तेच ते करत कंबरडे मोडून घेताना निदान या पदार्थांची आरोग्याच्या दृष्टीने काय पत आहे ते तरी तपासून घ्यायला हवे. आणि हे काम सध्या तरी स्त्रियांनीच करायचे आहे.

परिचयात एक कुटुंब आहे. नवरा मधुमेही, बायको मधुमेहाच्या उंबरठ्यावरची, दोन्ही मुले जाडीजाडी- पण ते दिवाळीचे पदार्थ करायलाच हवे हे मानेवरचे जू काही बाई खाली ठेवत नाहीत. चार पदार्थ घरी करायचे, चार बाहेरून मागवायचे- हे झाले नाही तर घरात काहीतरी विपरीत घडेल ही अंधश्रद्धा. साखरेतले पदार्थ खरे तर या संपूर्ण कुटुंबाने वर्ज्य करायला हवेत. पण नाही. मग सण कसला. याला विरोध केला तर नवऱ्यावर फुरंगटून बसणार. हे बदलायला हवं हे पटवून घेणेच नाही.

परवा एक पुरुष ओळखीच्या बाईला सांगताना ऐकलं, ए ताई, घरी ये ना फराळाला. बायकोने चिक्कार करून ठेवलंय. आम्ही कुणी खात नाय. करायचं म्हणून करते. सांगून ऐकत नाय. तुला खाऊन चालतंय तर तू तरी ये... ती म्हणाली, मग शेजारीपाजारी वाटून टाका. तर म्हणाला, कुणाला देणार नाय, सगळे नालायक आहेत शेजारी. म्हणून ओळखीच्यांना घरी बोलवतोय. ये तू. ती म्हणाली, अरे बाबा, घरचा फराळ झाला थोडा, आता तुझ्याकडं येऊन काय करू.

दिवाळीत घरी आलेले पाहुणे म्हणतात- अहो, तेवढं फराळाचं देऊ नका. नुसता चहा चालेल बघा. फराळ नको.

आजकाल तयार फराळ मिळतो, अनेक सामान्य परिस्थितीतल्या स्त्रिया फराळ तयार करतात. त्यांच्याकडून मोजकाच फराळ विकत आणावा खुशाल. आणि नेमकाच खावा. अनेकदा यातला फराळ वाईट दर्जाच्या तेलात किंवा वनस्पती तुपात केलेला असतो म्हणून स्वतः करायची खटपट असते. हे खरंय की वनस्पती तुपातले पदार्थ खाऊच नयेत. पण वाईट तेलातले तळणही टाळायलाच हवे. याला उपाय गरजू बायकांना घरी बोलावून सामान देऊन फराळ करवून घेणे. (आणि हो त्यात जातपात पाहू नये.) आणि भाराभर करूही नये. पूर्वी खाण्यापिण्याची वानवा होती तेव्हा टिकणारे पदार्थ करून ठेवणे रास्त होते. आताही काही पदार्थ दिवाळीसाठीच नव्हे तर नेहमीसाठीही वरचेवर करायला हरकत नाही. कुरमुऱ्यांचा, पातळ पोह्यांचा, भाजक्या पोह्यांचा चिवडा हे दिवाळीसाठीच नव्हे तर रोजच्या मधल्या वेळच्या चबिनचाऱ्यासाठी जरूर घरात ठेवावेत. पण बाकी डबेच्या डबे भरून, चकल्या, कडबोळी, शंकरपाळ्या, करंज्या-कानोले, लाडू करणे हे फारसे आरोग्यदायी नाही.

याच फराळाची मोठी मागणी अमेरिका वगैरे देशात स्थिरावलेल्या भारतीयांकडून असते. भलीमोठी उलाढाल असते. पण ते ही जेव्हा मागवतात तेव्हा दोन ते तीन खाण्यांत संपेल एवढेच मागवतात. आज ही उलाढाल चौदा कोटींच्या घरात आहे. परंपारिक खाण्याची हौस अशा रीतीने समाजातील दुर्बळ स्त्रियांना हात देत असेल तर चांगलेच आहे.

पण घरोघरच्या स्त्रियांनी तो सर्व उटारेटा करणे आणि त्यात स्वतःच्या प्रकृतीबरोबरच घरच्यांच्या प्रकृतीचीही वाट लावून घेणे हे एक प्रकारे दिवाळीत अकलेचे दिवाळे एवढेच म्हणेन.

शरीर जपाल तर मन-बुद्धीही जपाल. हे स्त्रियांनी लक्षात घ्यायलाच हवे. त्यागमूर्ती बनून, जागरणे करून, दिवाळीचा फराळ करणे यात फार काही थोरवी नाही. त्याऐवजी, एकदोन चांगली पुस्तके वाचा. दिवाळी अंक वाचा, संगीत ऐका, चित्रपट, नाटके पहा, फिरायला जा, एखाद्या सामाजिक कार्य करणाऱ्या संस्थेला भेट द्या किंवा मदत करा.  मुलाबाळांसोबत, आईवडिलांसोबत, मित्रमैत्रिणींसोबत चांगला वेळ घालवा. फराळ मनाला आणि बुद्धीलाही हवा असतो.

दिवाळीला वेगळे काय करता येईल याचा विचार करा.

विवेकाची जपणूक स्त्रियांना हर प्रकारे करायची आहे. स्त्रीच्या परंपारिक भूमिकेत विवेकाची जपणूक जवळपास होतच नाही. त्यामुळे परंपरांना मोडणे वा मुरड तरी घालणे महत्त्वाचे ठरते.

***

# स्त्री- एक तितकीच उत्क्रांत मानव

स्त्री म्हणजे काहीतरी वेगळी माणूस आहे हे सांगण्याचं प्रथम बंद झालं पाहिजे. स्त्री आणि पुरुष यांची उत्क्रांतीतील नैसर्गिक निवडीच्या तत्वातून बनलेली वेगळी शरीरे, त्यांच्या काही इंद्रियांची- जननेंद्रियांची कार्ये ही जरी वेगवेगळी असली तरीही त्यांचे रक्त, हाडे, हृदय, यकृत, फुफ्फुसे, श्वसनसंस्था, पचनसंस्था, कातडी, दात, नखे, स्नायू, हातपाय, ज्ञानेंद्रिये, मज्जासंस्था म्हणजेच मेंदूही सारख्याच प्रकारे कार्यरत असतात. स्त्री आणि पुरुष दोघांनाही होणारे कर्करोग, हृदयविकार, मधुमेह, सिऱ्हॉसिस वगैरे सारखेच असतात. स्त्रीचा शेंबूड वा इतर उत्सर्जिते सुगंधी वा दुर्गंधी असतात आणि पुरुषाची नसतात असे काही आजवर तरी कुणाला आढळलेले नाही.

मग स्त्रीपुरुषांत जननेंद्रिये, त्यानुसार असलेले स्तन,कंबर यांचे लहानमोठे आकार आणि गर्भधारणाशक्ती यातील फरक सोडला तर फरक कुठला आहे?

स्त्रीची भावनाप्रधानता वा संवेदनशीलता आणि पुरुषाचा कणखरपणा, कठोरपणा या साऱ्या अतीचर्चित, अतीफुल्लित गोष्टींना अद्यापही फारसा आधार नाही. या ना त्या प्रकारचे भय आणि दहशत या खाली वावरणाऱ्या व्यक्ती नेहमीच अधिक झटकन रडवेल्या होतात, थरकापतात. आणि मुळापासूनच फारसे भय वाटूयाला न आलेल्या व्यक्ती कणखर होतात. लहानपणापासून संस्कार होतात ते असेच. अमकं करू नको, तमकं करायचं नाही, असं वागू नये, तसं बोलू नये, अमुक

केलं तर झोडपून काढलं जाण्याचं भय- शारीरिक वा शाब्दिक हिंसेचे भय ज्यांच्या वाट्याला येते त्यांच्या संवेदना उत्क्रांतीच्या नियमांनुसारच अधिक जपून वागायला शिकवतात. आणि कदाचित हे भय स्त्रियांच्या जनुकांतही रेखले गेले असते, पण उत्क्रांतीच्या प्रक्रियेत असे बदल होण्यासाठी लक्षावधी वर्षे जावी लागतात. आणि जगातील पुरुषप्रधान संस्कृतींमध्ये स्त्रीलिंगी माणसांचे दमन फार नाही काही हजार वर्षांपासूनच सुरू झाले आहे. त्यामुळे जे भयाकुल होणे, भावनाकुल होणे वगैरे होते ते जनुकजन्य अनुवंशातून नव्हे तर परिस्थितीवशात् होते असे स्पष्ट म्हणता येते.

खरे म्हणजे आपण स्त्रीलिंगी माणसांनी- हा वाक्प्रयोग मी अगदी स्पष्ट हेतूने करते आहे- स्त्रीलिंगी माणसे. आम्ही स्त्रिया आणि आम्ही पुरुष या कथनात आम्ही माणसे या भावनेचा बऱ्याच अंशी लोप होतो. आपण सारेच एकाच मानववंशातील आहोत याचा विसर पडण्यासाठी ही भेदगामी शब्दरचना अधिकाधिक परिणामकारक होत रहाते आहे. परवाच आंतरराष्ट्रीय स्त्री दिन पार पडला. त्यात आपण स्त्री असल्याचा अभिमान स्त्रियांकडून व्यक्त केला जाण्याचे प्रमाण फार मोठे होते. पुरुषही स्त्रियांना स्त्री म्हणून विशेष मान देत होते. एका विशिष्ट परिस्थितीत हे योग्यही आहे. स्त्रीदास्याच्या कल्पना मेंदूत घर देऊन वागवणाऱ्या लोकांच्या मनावर परिणाम करण्यासाठी, त्यांच्या जाणीवा थोड्या समृद्ध करण्यासाठी हे आवश्यक होते, असेल.

पण यापलिकडे जाऊन आपल्याला आपला एक माणूस म्हणूनच विचार करणे भाग आहे. स्त्रीलिंगी माणूस आणि पुल्लिंगी माणूस, भिन्नलिंगी माणूस असे काहीही भेद असोत- मुख्य ओळख ही माणूस हीच असायला हवी. घरीदारी, कुटुंबात,

कामाच्या ठिकाणी स्वतःचा विचार केवळ स्त्री म्हणून न करता एक माणूस म्हणून करणे, स्वतःचा विचार केवळ एक पुरुष म्हणून न करता एक माणूस म्हणून करणे किंवा आपण भिन्न लिंगी म्हणून न करता आपण माणूस म्हणूनच करणे हे आपल्या विवेकी जगण्याच्या वाटचालीतले पहिले पाऊल आहे.

आता याची प्रतिबिंबे कितीतरी ठिकाणी पडू शकतात. त्या व्यवहारातील जागा पाहू. जन्म देणे, बाळाला अंगावर दूध पाजणे हे ज्या मुळे शक्य होते त्या स्त्रीशरीरात आपली प्रज्ञा आपले मन वास करते ते शरीर एक सहजोत्पन्न घटित आहे. जसे शुक्रजंतू उत्पन्न होणारे शरीर पुल्लिंगी माणसांत आहे, किंवा यापैकी काहीच न होणारे शरीर भिन्नलिंगी माणसांत आहे हे देखील सहजोत्पन्न घटित आहे. या सहजोत्पन्नतेमुळे स्त्री वा पुरुषांवर वा भिन्नलिंगींवर इतर कोणत्याही जबाबदाऱ्या आपतः किंवा सहजोत्पन्न येऊन पडत नाहीत. त्या जबाबदाऱ्या या धर्म-राजकारण-समाजसत्ता या त्रयीने गेली चारपाच हजार वर्षे वेगवेगळे नियमन करून लादलेल्या आहेत. त्या कसकशा विकसित झाल्या, किंवा दास्याचे, शोषणाचे रोख फायदे पाहून कसकशा घट्ट होत गेल्या हा विषय फार मोठा आहे, आणि त्याचे वाचन करावे हे मी निश्चित सुचवेन, सर्व माणसांना. पण त्या निसर्गदत्त नक्कीच नाहीत. समाजसत्तेची शोषणशक्ती म्हणजेच जतन करावी अशी उदात्त संस्कृती असते हा एक फार मोठा गैरसमज आपल्या मनात रुजलेला असतो. जो सर्व लिंगी माणसांच्या मनांत धर्म-देव-रूढी-परंपरा यांच्या उदात्तीकरणाद्वारे किंवा ढोल बडवण्यातून, खुल्या जखमेवर जळू चिकटवल्यासारखा जडवला जातो. ही जळू खस्सकन ओढून ठेचायला हवी. काही क्षण नक्कीच रक्तस्राव होतो. पण नंतर रक्तशोष थांबतोच.

आम्ही अनेक विचारी बायामाणसे या जळवा फेकून देऊन रक्तशोष थांबवण्यात यशस्वी झालो आहोत. पण त्याची किंमत चुकवणे नेहमीच सोपे असते असे नाही. विशेषतः तुमचे प्रिय असलेले वा नसलेलेही सवयीचे आप्तजन तुमचे रक्त काढू शकतात हे खरेच आहे.

दोघांना झालेल्या अपत्याला जन्म देऊन झाल्यावर, त्याला अंगावर दूध पाजत असतानाही अनेक बायामाणसांना वाटते बापईमाणसाला त्याचे हगमूत काढायला कसे सांगावे, डायपर बदलायला कसे सांगावे. बाळाच्या शीचा रबडा, वास फक्त आईनेच काढावा असा काहीही निसर्गदत्त नियम घडलेला नाही. बाळासाठी अन्न शिजवणे, त्याला आंघोळ घालणे ही कामेही बायामाणसांप्रमाणेच बापईमाणसेही करू शकतात. स्वयंपाक करू शकतात, कपडे धुवू शकतात, झाडलोट, आवराआवरी, साफसफाई, सारी कामे कोणत्याही लिंगाची माणसे करू शकतात. लिंग अमुक म्हणून कोणतेही ज्यादा काम करायला लावणे हा नंतरच्या नियमांचाच बडिवार होता. त्यातून एक दास्यव्यवस्था आपसूकच घट्ट होत गेली. याच दास्यव्यवस्थेला टिकवणे म्हणजेच तथाकथित संसार टिकवण्याचा मूलमंत्र समजावा अशी शिकवण हेतूपुरस्सर दिली जाऊ लागली.

जगभर जसजसे विवेकी समाज उदयाला येऊ लागले तसतशी ही दास्यव्यवस्था धुडकावली गेली. स्त्रीपुरुष अशा दोन्ही लिंगांच्या माणसांनी समाजस्थित्यंतराच्या काळात जे काही नियम तेव्हाच्या काळाला साजेसे होते ते आता कालबाह्य झाले हे समजून घेऊन भिरकावून दिले. प्रजनन हेच मानवजातीचे प्रमुख कार्य राहिले नाही, कुटुंब टिकवणे हेच एकमेव सुरक्षेचे साधन राहिले नाही, तेव्हा स्वतःच्या

बुद्धीप्रतिभेचा विकास हा प्राधान्यक्रम झाला. आणि नरे चि केला हीन किती नर प्रकारातल्या चौकटी मोडल्या गेल्या. भारतातल्या शहरात या चौकटी मोडल्या गेल्या आहेत. गावाखेड्यात त्या मोडल्या जाऊ नयेत, आणि समाजसत्ता, जुन्या शोषण व्यवस्था कायम रहाव्यात म्हणून बऱ्याच संघटना, मागास विचारांच्या संघटना आणि व्यक्ती फुगवूनफुगवून संस्कृतीचा उदोउदो करीत असतात. इंदुरीकर नावाचा पोंगा कीर्तनकार, रामतीर्थकर नावाची पोंगा प्रवचनकार आणि असले अनेक लोक महाराष्ट्रभर मागास विचारांचे मखरात थापून मिरवत असतात. त्यांना आमंत्रणे देऊन आपल्या बुद्धीवर आपल्या हाताने कुऱ्हाड मारून घेणारे समूह इथे आहेत हेच मुळात लांच्छन आहे.

भारतीय स्त्री ही कुणी वेगळीच आहे असा काहीसा पवित्रा या मागास-संस्कृतीरक्षक लोकांचा असतो. हे लोक तसे अनेक घराघरांत कुटुंबांत विखरून असतात. नवे ज्ञान, नवे तंत्रज्ञान, नवे आकाश स्त्रीलिंगी माणसांना गवसूच नये, गवसलेच तर त्यांना ते फार काळ उपभोगता येऊ नये, म्हणून हे असले लोक हंशाटाळ्या मिळवत अगदी थिल्लर प्रकारे मनोरंजन करत स्त्रीदास्यमुक्तीवर टीका करीत असतात. दुर्दैव म्हणजे देशावर ज्याची काळी सावली आहे त्या सत्ताधारी पक्षाच्या धार्मिक समजेला साजेसे जे जे बोलले जाते, लिहिले जाते त्याला सहजच राजाश्रय मिळतो आहे. अनेक ठिकाणांहून विज्ञानविरोधी, आधुनिकता विरोधी, उदारमतवाद विरोधी अशा प्रतिगामी बोलघेवड्या पोकळ लोकांना व्यासपीठ मिळते आहे. घणाघाती, जोरदार वक्तृत्व म्हणजे ज्ञान नव्हे, कामही नव्हे हे अजून किती प्रकारे सिद्ध व्हावे लागेल... कोण जाणे. पण काहीच वाचन नाही, ज्ञानाची साधनेच

नाहीत अशा कप्प्यांमधल्या स्त्रीपुरुषांनी याच शृंखलांत बंदिस्त रहावे म्हणून आपली जीभ झिजवणाऱ्या या वक्त्यांना शक्य होईल तिथेतिथे आव्हान दिले पाहिजे.

भारतातील स्त्रीवादी आंदोलनापुढे हे एक महत्त्वाचे आव्हान आहे. आपण सर्वांनी मिळून भूतकाळाच्या गोजिऱ्या नरकात परत लोटू पाहाणाऱ्या या लोकांना पराभूत केले पाहिजे. तरुण सुशिक्षित, विवेकी मुलामुलींनी या जुन्या खोडांचा वक्तृत्वाने आणि लेखनाने पराभव केला पाहिजे असे मी आवाहन करेन.

***

# शिवराळांचा विरोध स्त्रियांनीच केला पाहिजे

एकाद्या गरीब वस्तीत रहाणाऱ्या सभ्य लोकांना नेहमीच एक प्रश्न आपल्या मुलांच्या दृष्टीने शिणवत असतो. त्यांच्या कानावर सतत खूप घाण गलिच्छ शिव्या पडत असतात. त्यांना भीती वाटते की आपली मुलेही असल्याच शिव्या देऊ लागतील. साधारण साठेक वर्षांपूर्वी सर्वच पुरुषांनी लैंगिक व्यवहारांवरून गलिच्छ शिव्या देणे हे त्या काळी शिष्टसंमत मानले जात असेल. पुरुष आहे, मर्द आहे शिव्या तर देणारच. त्यात काय एवढं...

या शिव्या आपल्याला आईबापांवरून पडू नयेत या काळजीपोटी अनेक स्त्रिया सतत पडतं घेत. नवऱ्याला, सासऱ्याला, दीराला राग येऊ नये म्हणून पडेल ते करीत. बापाला नि भावाला राग येऊन त्यांनी आपल्याला घाण शिव्या देऊ नयेत म्हणून आयाबहिणीही नेमून दिल्याप्रमाणे वागत. ओंगळाने ओटी भरली जाऊ नये एवढी एक प्रबळ इच्छा त्यांच्या मनात असे.

मग आला काळ सभ्य मध्यमवर्गाचा. आता शिव्या देणारे पुरुष हे मर्द वाटेनासे झाले. ते असभ्य, असंस्कृत आहेत, नालायक आहेत अशी धारणा स्त्रियांच्याच काय पुरुषांच्याही, लहान मुलामुलींच्याही मनात रुजू लागली. शाळेत जाणारी मुलंमुली शिव्या देणाऱ्या बापाकडे शंकेने पाहू लागली. तरीही शिव्या, विशेषतः लैंगिक

व्यवहारांवरून शिव्या या कुणालातरी भिवविण्याचे साधन म्हणून कामात येतच होते. ही असभ्यता साऱ्या जगातून दूर व्हायला अजून बराच काळ जावा लागणार आहे.

तरीही पूर्वीसुद्धा शिवराळपणा हा आपापल्या खाजगी अवकाशात होता. लिखित वाङ्मयात, साहित्यात शिवराळपणा काही वास्तव मांडण्याची गरज म्हणून येत राहिला. महाराष्ट्राच्या लाडक्या संत तुकोबांनीही शिव्यांचा वापर काही प्रमाणात केला. त्यातही एक विशिष्ट जाणीव होती, हेतू होता. दलित कवितेत त्या आल्या कारण त्यातून आसमंताचे वास्तव भान येत होते.

भारतात २०१३मध्ये  निवडणुकीचे वारे घोंघावू लागले आणि एका विचित्र सामाजिक सत्याचे दर्शन सर्वांनाच होऊ लागले. जी शिवीगाळीची भाषा केवळ घरात वा वस्तीत वापरली जात होती ती आता थेट समाज माध्यमांच्या खुल्या व्यासपीठावर दणदण करू लागली.

यात सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय लोक सहभागी आहेत हे स्पष्ट होते आहे.

यातील एक गोष्ट मात्र जुनीच आहे. विशेषतः स्त्रियांना नमते घ्यायला लावण्यासाठी त्यांचे शिवराळ ट्रोलिंग अधिक प्रमाणात होते. दुष्टता अशी की अशा ट्रोल होत असलेल्या स्त्रियांचा कैवार घेऊन जाणारेही पुन्हा त्याच प्रकारची शिवीगाळ करू लागतात- त्यांचे स्पष्टीकरण असे असते की त्यांना त्यांच्याच भाषेत समजावावे लागते.

२०१३-१४ या वर्षानंतर आजतागायत, लैंगिक व्यवहारांवर उतरणाऱ्या वैयक्तिक शिवीगाळीचा अनुभव मी घेतला आहे. माझ्या वयाला या मठ्ठ शिवीगाळीने काहीही फरक पडत नाही इतपत मी ज्येष्ठ वा वयोवृद्ध आहे. मी घाबरत नाही आणि त्या शिवीगाळीला कणभरही भीक घालत नाही. गप्प रहात नाही. राणा अय्यूब, बरखा दत्त, तिस्ता सेटलवाड, स्वाती चतुर्वेदी सारख्या तरुण पण पेशाचे संरक्षक कवच काही प्रमाणात लाभलेल्या स्त्रियाही गप्प रहात नाहीत. पण सामान्य मतदार असलेल्या, किंवा राजकीय कार्यकर्त्या असलेल्या तरुण स्त्रियांनी जर एखादी ठाम विरोधी भूमिका घेतली तर त्यांना अशा प्रकारे शिवराळ ट्रोलिंग केले गेले तर त्या भेदरून जातील आणि गप्प रहातील याची या लोकांना खात्री असते. म्हणजेच स्त्रियांचे दमन करण्यासाठी भीतीचे शस्त्र आता भरबाजारात वापरले जात आहे.

मध्यंतरी काही नवीन काम करायला घ्यायचे म्हणून मी फेसबुक कमी करण्याचा मानस व्यक्त केला होता. तेव्हा एक गंमतीशीर पोस्ट फेसबुकवर माझ्या संदर्भात एका मठ्ठाने टाकली होती. त्यात मला नवऱ्याने बेदम मारले, माझा मुलगा आणि सून घर सोडून गेले, आडनाव बदलण्यासाठी त्यांनी अर्ज केला या गोष्टींना घाबरून मी फेसबुकवरून जाते आहे असे म्हटले होते. या पोस्टवर साजऱ्या गोजऱ्या नावांच्या काही महिलांनीही वाहवा केली होती पोस्टची. हे म्हणजे हसून लोटपोट करणारेच होते सारे... पण त्यात एक मुद्दा अधोरेखित झाला, की व्यक्त होणाऱ्या विवेकी स्त्रीला थांबवण्यासाठी नवऱ्याचा मार हाच प्रभावी ठरतो यापलिकडे या मद्दड लोकांना काहीही सुचत नाही. याचेही कारण आहे, की अजूनही घराघरांत स्वतंत्र विचार करणाऱ्या बाईमाणसांना विचार व्यक्त करण्यासाठी, ते कुठे कसे व्यक्त करावेत हे

ठरवण्यासाठी नवऱ्याची वा घरातल्या इतर पुरुषांची अनुमती असावी लागते. नाहीतर मार पडण्याची शक्यता असते. किंवा मग घाणेरड्या शिव्या ऐकून घेण्याची शक्यता गृहीत धरून मागे सरावे लागेल असेही होऊ शकते.

समाज-माध्यमे घाण झाली आहेत असे अजिबात म्हणू नका. ती माध्यमे अखेर समाजाचे प्रतिबिंब दाखवतात. संघीभाजपाई असोत, काँग्रेसी वा उपकाँग्रेसी, वा आंबेडकरी असोत, भ्रष्टाचारी असोत वा भ्रष्टाचार विरोधाचं निशाण घेऊन एकत्र आलेले असोत- कुठल्याही छटेचे असोत, अनेक पुरुषांना स्त्रीबाबत बोलताना मर्यादा सोडायला काही वावगं वाटत नाही.

पण या सर्वात अव्वल नंबर मिळवलाय तो स्वतःला हिंदुत्ववादी, मोदीवादी म्हणवून घेणाऱ्या नीतीहीन भुतावळीतील शिवराळ पुरुषांनी. त्यांच्या पोस्ट्सवर लाईक देणाऱ्या स्त्रिया एका झेंड्यासाठी निष्ठा दाखवायच्या नादात त्यांना फारसं टोकतही नाहीत. किंवा त्यांना अनफॉलोही करत नाहीत.

आता नाखुआ, बग्गांसारख्या नामचीन शिवराळ ट्रोल्सना फॉलो करणारे महामहीमजी ज्यांचे हृदयस्वामी आहेत त्यांच्याकडून वेगळी अपेक्षा तरी काय करणार.

आपल्या महाराष्ट्रात अनेक चांगल्या चळवळी जन्म घेतात, वाढत जातात, तशीच एक चळवळ अलिकडेच मूळ धरू लागली आहे. आमच्या नवऱ्यांना दारू पाजणाऱ्या कुठल्याही राजकीय पक्षाच्या उमेदवाराला मत देणार नाही अशी एक चळवळ काही स्त्रियांनी एकत्र येऊन सुरू केली आहे. कायद्याने वागा ही चळवळ

प्रभावीपणे आणि नेटाने चालवणारे श्री. राज असरोंडकर यांनी याच धर्तीवर एका नवीन कृतीला सुरुवात केली आहे. ते म्हणतात ते इथे जसेच्या तसे दिलेच पाहिजे. कारण अशा विचारांच्या चळवळीमुळे आपला पितृसत्ताक शाब्दिक जुलुमांनी प्रदूषित झालेला सामाजिक अवकाश थोडा तरी स्वच्छ व्हायला मदत होईल.

असरोंडकर म्हणतात, “इथे फेसबुकवर युवकांना एकमेकांना किंवा आपल्या विरोधकांना लxx वगैरे म्हणणं फार भूषणावह वाटतं. त्यात महिलाही सहभागी होताना दिसतात. विसंगती इथेच आहे. वास्तविक, लxx वगैरे शब्द केवळ शिवराळ नाहीत, तर ते पुरूषप्रधान समाजव्यवस्थेचे प्रतीकही आहेत, ज्या व्यवस्थेने इथे जातीवादापासून, स्त्रीचं दुय्यमत्व ते सामाजिक विषमतेपर्यंत अनेक समस्या जन्माला घातल्या. या व्यवस्थेला विरोध करणारीही अनेक तथाकथित सुधारणावादी मंडळी शिवराळपणात आघाडीवर दिसतात. जर संस्कृतीवाद्यासोबतच परिवर्तनवादी, सुधारणावादी, समतावादी, पुरोगामी, समाजवादी, आंबेडकरवादी आणि कोण कोण वादी मंडळी शिव्यांचा मुक्त वापर करत असतील तर त्या लाटेवर सत्तेने उन्मत्त झालेले लोक स्वार न होतील तरच नवल. यात सुरूवात कोण करतं, असाही प्रश्न उपस्थित केला जाईल, पण स्पष्ट सांगायचं तर ज्यांचं नातं संविधानिक विचारांशी आहे, शिव्या टाळण्याची जबाबदारी त्यांचीच पहिली आहे.

फिरून या शिवराळ वादविवादांचा मोठा फटका महिलांनाच पडतोय. महिलांना समाजमाध्यमात व्यक्त होणं मुश्कील झालंय. त्यातही सत्तेच्या विरोधात लिहिणं तर जोखमीचं झालं. रखेल, रांड, माझ्याकडे पाठवा, घ्या हिला, चढा, रेट काय, तासाला एवढे पण कोणी देणार नाही, ही भाषा उघडपणे सर्रासपणे वापरली

जातेय. प्रत्युत्तरातले लोकही तुझी आई पाठव, बहिण पाठव अशी आव्हानात्मक भाषा वापरताना दिसतात. या दोन्ही बाजूंच्या प्रवृत्तींविरोधात आपण निवडणुकीच्या बहाण्याने मोठी मोहीम उघडली पाहिजे.

अशा प्रतिक्रिया आपल्या स्वत:बाबतीत असो वा नसो, रिपोर्ट करा. आपले सरकार, ईमेलमार्फत पोलिसांना कळवा. शक्य झाल्यास थेट पोलिस तक्रार करा, न्यायालयात खाजगी केस दाखल करा.

आक्षेपार्ह प्रतिक्रियांचा स्क्रीनशॉट घ्या, तो ती प्रतिक्रिया देणाऱ्या व्यक्तिच्या कुटुंबातील, नात्यातील सदस्यांना मेसेंजरवर पाठवा आणि आपण या भाषेशी सहमत आहात का म्हणून विचारा. तिथे कोणतीही चर्चा करू नका किंवा वाद घालू नका. हीच गोष्ट दोघांच्या मित्रयादीतील सामाईक मित्रांबाबत करा. संबंधित पोस्टवर शिवराळपणाला विरोध करण्याचा आग्रह सामाईक मित्रमंडळींना करा. त्यांनी प्रतिसाद न दिल्यास मित्रयादीतून डच्चू द्या.

हे लगेचचे उपाय नाहीत, पण दबावतंत्रं आहेत.”

मी आपण सर्व वाचकांना याचा गांभीर्याने विचार करायची विनंती करते.

आणि शिव्यांना आणि शिव्या देणारांना घाबरायचं नाही हे तर आपलं ठरलेलंच आहे.

***

# न स्त्री मोबाईलम् अर्हति

स्त्रीला स्वातंत्र्य असता कामा नये या जुन्या जपलेल्या दुष्ट समजाचे वेगवेगळे अवतार आपल्या समाजात येतच असतात. विनोदी म्हणावे इतक्या पातळीवर घसरून आता गुजरातच्या ठाकूर समाजाच्या एका गटाने आपले नियम काढले आहेत. हे नियम केवळ अविवाहित मुलींना लागू आहेत. मुलांना नाही.

बनासकांठाच्या ठाकूर समाजाने अविवाहित मुलींनी मोबाईल वापरू नये असा फतवा काढला आहे. वरवर मखलाशी करण्यासाठी त्यांनी अभ्यासाकडे लक्ष देणे महत्त्वाचे आहे म्हणून हा नियम केल्याचे सांगितले जाते. किती हास्यास्पद लोक आहेत हे! याच्या पुढचाच फतवा आहे तो मुलींनी आंतरजातीय विवाह करू नयेत हे सांगणारा. तसे त्यांनी केल्यास अशा मुलींच्या आईवडिलांना समाजाकडे दंड भरावा लागणार आहे. अविवाहित मुलींच्या हातचा मोबाईल आणि त्यांची आंतरजातीय विवाह करण्याची शक्यता हा संबंध या मद्दड समाजाच्या धूर्त नेत्यांनी नकळत दाखवून दिला आहे. खरे तर हा संबंध त्याही पलिकडचा आहे. तो संबंध आहे मुलींच्या संपर्ककक्षा विस्तारून त्यांना आपले डबक्यातले जग ओलांडायची दिशा सापडण्याचा, किंवा जगातील सर्वोच्च मूल्य असलेली प्रेमभावना सापडण्याचा. मुलींना ही तत्त्वे सापडली तर या समाजातील सत्तेच्या शिड्या कोसळून पडतील. जातीबंधनाच्याच खुंटलेल्या रिंगणात सर्वांनी गरगरत रहावे हेच जुन्या व्यवस्थेच्या धुरिणांना हवे असते. त्यात शिक्षण घेणाऱ्या मुली स्वतंत्र वृत्तीने

विचार करू लागल्या, निर्णय घेऊ लागल्या तर मग या जुनाट कल्पनांचे फेटे बांधून वावरणाऱ्यांची हजामतच होईल कायमची.

गंमत म्हणजे स्त्रीसंबंधीच्या अडगळीतल्या विचारांची पाठराखण करणाऱ्यांत काँग्रेस पक्षाच्या स्त्री आमदारानेच पुढाकार घेतला आहे. विधानसभेसारख्या संविधानाच्या रक्षणकर्त्या संस्थेची ही लोकनियुक्त सदस्या संविधानाची सर्व तत्वेच आपण पायदळ तुडवतो आहोत हे पूर्णतः विसरली आहे. असल्या सदस्यांना काँग्रेस पक्षाने खरे तर ताबडतोब पक्षातून काढून टाकले पाहिजे. पण तसे होण्याची अपेक्षा ही अर्थातच फोल आहे.

देशातील कोणतीही जातपंचायत वा समाज अशा प्रकारे तालिबानी सामाजिक नियम काढून त्यांची अंमलबजावणी करू शकत नाही कारण अजूनतरी देशात कायद्याचे राज्य आहे. अजूनतरी भारताचे संविधानच देशाच्या चलनवलनात सर्वश्रेष्ठ आहे.

या साऱ्या नियम लादण्याच्या कल्पनेतून मुलांना वगळण्यात आले आहे. अविवाहित मुलांनी मोबाईल वापरायला यांची हरकत नाही- त्यांनी अभ्यास केला नाही तरी चालेल. मुलांनी आंतरजातीय विवाह केला तर त्यांच्या पालकांना दंड करण्याची भाषा नाही- त्यांनी आंतरजातीय विवाह केला तर चालणार आहे (?). हे अर्थातच स्वागतार्ह म्हणायचे!!

आमदारबाई म्हणतात मुलींच्या हातातून मोबाईल काढून त्यांना टॅब्लेट्स देणार आणि लॅपटॉप्स देणार. टॅब्लेटवरून, लॅपटॉपवरून त्यांनी गूगलहँगआउट, मेसेंजर

कॉल्स किंवा चॅट केले तर ते टॅब्लेट्स किंवा लॅपटॉप्स त्यांच्या डोक्यात घालण्यासाठी ठाकूरसेनेची उभारणी वगैरे होणार आहे की काय पाहायला हवे.

असो, बनासकांठा फार दूर आहे...

पण आपण आपल्या घरात काय करतो याचाही या निमित्ताने विचार करायला हवा. जितकी बंधने आपण मुलींवर घालतो त्या मानाने किती बंधने मुलांवर घालतो? सामाजिक असुरक्षेचा प्रश्न असेल, वाईट सवयी लागण्याचा प्रश्न असेल, अभ्यासाचा वेळ वाया घालवण्याचा प्रश्न असेल, तर किशोरवयीन मुलामुलींवर काही प्रमाणात बंधने घालणे योग्यही असेल. त्यापेक्षा अधिक श्रेयस्कर असेल त्यांना चांगल्या वाईटाची ओळख करून देणे आणि त्यांच्या मनात मूल्यांसाठी आदर उत्पन्न करणे. पण ठीक आहे- मान्य करू की सर्वच पालकांना एवढे बौद्धिक कष्ट घेणे जमणार नाही. म्हणून ते बंधनांचा शॉर्टकट घेतील. पण मग ही सारी बंधने मुलींपेक्षाही मुलांवर घातली पाहिजेत. कारण आज सरसकट नव्हे, पण दुर्वर्तन, वाईट सवयींच्या आहारी जाणे, फसवणे, बलात्कार करणे हे गुन्हे स्त्रियांच्या तुलनेत पुरुषांमध्ये अधिक असतात हे अगदी पट्टीचे स्त्रीवादद्वेष्टेही मान्य करतील. तशी आकडेवारीच आहे. मग वळण लावणे, मूल्ये दृढ करणे किंवा बंधने घालणे हे मुलींपेक्षाही मुलांसाठी अधिक गरजेचे आहे.

अनेक समाजांत तर ‘किती झालं तरी तो मुलगा आहे- किती झाली तरी मुलीची जात आहे’ असले भुक्कड समज जपून मुलांचे आयुष्य धोक्याच्या वळणावर आणून ठेवण्यात पालक जबाबदार असतात. मुलींच्या आयुष्यावर विपरित परिणाम होईल कदाचित् पण मुलांच्या आयुष्याची वाट लागू शकते.

अनेक मराठी कुटुंबांतही मुलांच्या हाती मोबाईल लवकर येतो. मुलींना तो मिळत नाही. मुलांच्या उच्च शिक्षणावर कुटुंब काय गावंच्या गावं खर्च करायला तयार होतात. पण मुलींची धाव लग्नापर्यंत असं सगळ्यांनी जवळपास मान्य करून टाकलेलं असतं. लग्नावर खर्च होईलच तुझ्या- असे सांगून मुलींना सर्व प्रकारे कुपोषित ठेवणारा बहुतांश समाज आहे आपला.

अधूनमधून दारू पिणे, हातात सिगरेट असणे (आणि पुढे बरंच काही-) ही मर्दाची लक्षणे असतात. त्यात आता ठाकूरांनी हातात मोबाईल असणे हेही मर्दाचे लक्षण ठरवले आहे की काय अशी शंका येते.

'मोबाईलवर बंदी' या एका उद्गारामुळे कदाचित् इथल्याही काही पालकांचे डोळे चकाकतील. मोबाईलचे व्यसन हे इतर कुठल्याही व्यसनाप्रमाणे वाईट ठरतेच. डोळे बिघडणे, महत्त्वाच्या गोष्टींवरून लक्ष उडणे, कुणाच्या तरी नादी लागणे, गेम्स, बेटिंगमध्ये वाहवत जाणे, अनोळख्यांवर विश्वास टाकून नुकसान करून घेणे हे इंटरनेटच्या उपलब्धतेतून आलेले रोग आहेत. मोबाईल हे त्याचे सर्वात कॉम्पॅक्ट साधन आहे. आणि यातील एखाद्या गोष्टीमुळेही मुलंमुली शिक्षणाच्या वाटेवरून ढळू शकतात हे सत्य आहे. मुलं हट्ट करतात म्हणून त्यांना ते देणे, आपल्याला सुखेनैव आपल्या मोबाईल किंवा टीव्हीकडे पाहाता यावे म्हणून कटकट टाळण्यासाठी मुलांना मोबाईल देणे असे प्रकार पालक करत असतात.

मोबाईलचे व्यसन लहान वयातच लागू नये म्हणून काळजी घेणे हे सर्वस्वी समजू शकते. पण ते फक्त मुलींनाच लागता कामा नये, मुलांना लागले तरी चालते हे म्हणणे म्हणजे मुली वाचल्या पाहिजेत मुलं मेली तरी चालतील याच तोडीचे आहे.

पण असे तर नक्कीच नाही. प्रत्यक्षात आपल्या बव्हंश समाजाला मुली मेल्या तरी चालतात, मुलं मेली तर चालत नाहीत. गर्भ मुलीचा असेल तरच पाडला जातो, मुलाचा नाही. मग हे काय आहे नेमके?

तर यात मुलींच्या कल्याणाचा विचार वरपांगी असून त्या मोठ्या स्त्रिया झाल्यानंतर केवळ आपल्या घट्ट नियंत्रणात रहाव्यात, वस्तू म्हणून स्त्रियांचा वापर अबाधित रहावा, त्या तुलनेने अडाणी राहून पुरुषांच्या टाचेखाली रहाव्यात यासाठी केलेली ही एक बुद्दू डोक्यांतून निघालेली तजवीज आहे. आईबाप अविवाहित मुलींच्या हाती मोबाईल देणार नाहीत, तर मग लग्न झाल्यावर सासरकडचे देणार नाहीत हे पचवायला बापड्या मुलींना कसं सोपं जाईल.

याच समाजाने लग्नावर वारेमाप खर्च करण्यावरही निर्बंध आणले आहेत म्हणे. पंधरा वर्षांपर्यंत मुलामुलींच्या हातात मोबाईल देण्यावर त्यांनी निर्बंध आणले असते तर तो निर्बंधही स्वागतार्ह असता. पण तो निर्बंध केवळ मुलींपुरता लागू करून त्यांनी आपल्या खऱ्या नख्या दाखवल्या आहेत. आणि आंतरजातीय विवाह केल्यास दंड वगैरे ठरवून त्यांनी स्वतःला संविधानविरोधीही जाहीर केले आहे. असल्या प्रवृत्तींचा निषेध झाल्याशिवाय विषयांना तोंड फुटणार नाही.

बनासकांठाचा अल्पेश ठाकोर नावाचा भाजपच्या मार्गावर असलेला एक आमदार म्हणतो की मोबाईल बंदीचा निर्णय हा मुलगे किंवा मुली अशा दोघांनाही लागू असला पाहिजे. काही मात्रेत सद्बुद्धी पाहिली तरी गहिंवरून येतं असले दिवस आले आहेत आपल्याला.

***

# किती काळजी... किती काळजी...

सर्वोच्च न्यायालयाने किसान आंदोलन, कृषि कायदे-कमिटी यांबाबतीत त्यांच्या निकालांत जे काही घोळ घातले आहे ते आहेतच. पण त्यापेक्षाही एक वाईट घोळ त्यांनी अकारण घातला. न्यायालयाच्या कार्यकक्षेच्याच नव्हेत तर घटनात्मक समतेच्या तत्त्वालाही त्यांनी गालबोट लावले. या आंदोलनातून वयोवृद्ध व्यक्ती आणि स्त्रियांनी सहभागी होता कामा नये, त्यांनी परत जावे असा अगदी आपुलकीचा, काळजीचा अनाहूत सल्ला या न्यायाधीशांच्या बाकड्याने दिला.

राजकारणात सहभागी होण्यासाठी, हक्क बजावण्यासाठी वृद्ध असणे, स्त्री असणे आड येत नाही तर मग आंदोलनात सहभागी होण्याआड वृद्धत्व किंवा स्त्रीत्व कशासाठी येते? न्यायाधीशांनी राजकीय क्रियाशीलतेबरोबरच न्यायालयाच्या चौकटीतून राजकीय सल्लागारीही सुरू केल्याचे दिसून येत आहे. आणि ती सल्लागारीही मनुस्मृतीतल्या सल्ल्यांना अनुसरून केली आहे असे दिसते.

स्त्रियांनी आंदोलनात सहभागी होणे, त्यासाठी कष्ट उपसणे, हाल सोसणे हे काही नवीन नाही. शाहीनबागेतल्या आंदोलनाचे उदाहरणही द्यायची गरज नाही. जालियनवाला बागेतल्या निषेधाच्या सभेत जे दहाहजार भारतीय होते त्यात महिलाही होत्या, जे दोन हजार भारतीय मेले त्यात लहान मुले, वयोवृद्ध माणसे आणि महिलाही होत्या.

भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात भाग घेणाऱ्या अनेकानेक स्त्रिया होत्या. आसाममधून लढा देणाऱ्या अनेक भारतीय स्वातंत्र्यसैनिक स्त्रिया लढताना शहीद झाल्या. कनकलता बारुआ, रेबती बारुआ, मालती, दरिकीदासी, भोगेश्वरी, तिलेश्वरी अशा अनेक स्त्रियांनी आसामातून स्वातंत्र्य लढ्याचे आय़ोजन केले. त्यात त्या शहीद झाल्या.

अरेरे... फुकट मेल्या बिच्चाऱ्या. या स्त्रियांना तुम्ही घरी सुरक्षित बसा, आंदोलनात सहभागी होऊ नका हे सांगायला हे बाकडे नव्हते.

हळुहळू, स्त्रियांनी घरीच बसावे हे सांगणारे आवाज वाढू लागले आहेत. तिकडे शिवराज चौहान म्हणतात, नोकरी करणाऱ्या महिलांचे ट्रॅकिंग त्यांच्याच सुरक्षेसाठी करता यावे म्हणून त्यांनी पोलिसांकडे आपली नावे नोंदवावीत.

आज रस्त्यावर पाहिलं, मेट्रोच्या जोडतोड मराठी जाहिराती पत्र्यांवर रंगलेल्या- त्यात एक होती- मेट्रो येता दारी महिला येती लवकर घरी. आई येई घरी नाही, बाबा येई घरी नाही. महिला येती घरी... यांना हे लिहिताना लाजही वाटत नाही. अभिमानच वाटत असावा.

मंदिरात स्त्रीवर बलात्कार झाला तर भाजपच्या महिला मोर्चाची बाई म्हणते एकटीने कशाला जायचं तिने मंदिरात... कुणाला तरी सोबत घेऊन जायचं...

आता हे असलेच प्रतिगामी कित्ते सर्वात मोठ्ठं न्यायाळू, मायाळू कोर्ट गिरवतंय. आणि न मागितलेले फालतू सल्ले देतंय.

आपले हक्क आणि आपलं स्वातंत्र्य जपायचं असेल तर आंदोलनांत भाग घेतला पाहिजे, एकटं फिरण्याचा हक्कही आपण सोडता कामा नये.

बालपणात पिता, यौवनात नवरा आणि म्हातारपणी मुलगा आपलं रक्षण करणार हा सल्ला देणाऱ्या बापसत्तेचा हलकटपणा आपण गाडत आणला आहे. आता हे लोक मागल्या दाराने त्याला पुन्हा बाहेर काढत असले तर सावध रहावंच लागेल. असल्या न्यायाधीशांपासूनही सावध रहावं लागेल आणि सत्तेपासूनही.

ज्या आंदोलनात स्त्रियांनी सहभागी होऊ नये असं न्यायालयाने चुचकारलंय त्या आंदोलनात गेला महिनाभरापासून सामील झालेल्या स्त्रियांच्या मुलाखती पाहिल्या. त्या आंदोलनात चपात्या लाटतानाचे एक दृश्य दाखवले गेले, त्याच्या पुढल्या दृश्यात पुरुष चपात्या लाटतानाही दाखवले गेले. आपण शेतकरी म्हणून इथे आलो आहोत- रूढीगत परंपरांचे टिळे पुसून टाकून सारे काम करीत आहोत ही जाण तिथे बळकटपणे जाणवली.

तोफू कुबूल करो म्हणत पार्श्वभाग दाखवणाऱ्या माध्यमांना आणि प्रतिगामी सत्तेच्या हस्तकांना हे कधीच कळणार नाही.

# शब्द-अपशब्द

माझ्या लेखनात छिनाल शब्द आल्यामुळे माझा एक छोटा मित्र अस्वस्थ झाला. हा शब्द मी निराशाग्रस्त झाल्यामुळ लिहिला की संतापच... माझ्या सारख्या ज्येष्ठ काकूने हा शब्द कसा काय वापरला असे अनेक प्रश्न त्याला पडले होते. त्याला जी उत्तरं दिली त्याचा एक लेखा इथे सर्वांसाठीच लिहिते.

मी लेखनात अपशब्द वापरण्याची ही काही पहिलीच वेळ नव्हती. ते ही त्याला सांगितलं. शब्द ‘अप’ असतात कारण ते ज्या परिस्थितीला उद्गार देतात ती परिस्थितीच वाईट असते. संतापाचा, त्वेषाचा, द्वेषाचा, तिरस्काराचा उद्गार जेव्हा तोंडातून बाहेर पडतो तेव्हा तो केवळ त्या व्यक्तीला मोकळं करतो आणि विरतो. पण तो लेखकाच्या लेखनातून येतो तेव्हा तो केवळ लेखकालाच नव्हे तर एकंदर समाजात झिरपलेल्या एका भावनेलाच वाट करून देत असतो. छिनाल हा शब्द चॅनेल्सच्या बाबतीत मी वापरला तेव्हा त्या भावनेशी सहमती दाखवणाऱ्या कमेंट्स आल्या. साहित्यिक वर्तुळातील एक सन्मित्राने भा.पो.भा.नि. असे म्हटले. म्हणजे भावना पोहोचल्या- भाषेचा निषेध. त्यांच्यापुरते योग्यच म्हटले. पण निषेधार्ह गोष्टीचा निषेध करताना शब्द तापले तर भावना खऱ्या अर्थाने पोहोचतात असे मला मनापासून वाटते. ते साजुकपणे मांडण्यात अर्थ नाही. मग गप्पच का न बसावे...

या मुलाला सांगताना मला आठवल्या माझ्या गेल्या दोन वर्षांतल्या दोन कविता. या दोन कवितांतील शब्दांमुळे फेसबुक परिसरात गदारोळ उडाला होता. असा तो उडेल याची मी कल्पनाही केली नव्हती. मी आहे आई ही कविता तर रस्त्यावरच्या पोरसवदा मुलांच्या तोंडून दोन मिनिटांत सातवेळा आईची गांड आईच्या गांड हे शब्द- अपशब्द ऐकून मी पराकोटीची संतापले होते. आणि त्याच झटक्यात ती लिहून काढली होती. काय होती ही शिवराळ (!) कविता-

मी आहे आई,

साधीसुधी कुणाही माणसाच्या बाळाची.

झोपते कधी प्रेमाखातर, कधी नाईलाजाखातर कुणातरी नराबरोबर.

आणि जन्म घेतात नर मादी माणसाच्या माझ्या योनीतून.

चक्र सुरू रहाण्यासाठी.

याच योनीवर जणू थुंकता तुम्ही सारे मर्द

गांडपुचीच्यूत नि कायकाय...

तिच्यात कोण घुसला नि कुणी काय घुसवलं.

थूः.

कधी कुणा नराने दुसऱ्या नराला परम दुःख देण्यासाठी केला असेल

त्याच्या आईचा अपमान.

नंतर ही तुमची सांस्कृतिक रीत होऊन गेली.

आईतल्या बाईने आपल्या वेदना सांगायलाही योनीचा उल्लेख करायचा नाही.

खाली दुखतंय म्हणतात आय़ा, तिकडे आत फार खुपतं सांगतात डॉक्टरलाही.

आणि तुम्ही... तुमच्या हृदयासकट जिथून धडधडलात त्या योनीला

मुद्दाम हलकट शब्द सहजच वापरता-

म्हणून आज मी ही लिहून ठेवतेय इथे जळजळत्या काळजातल्या संतापाने.

------

मी आहे आई, बाई सर्वसमावेशक.

माझ्या गांडीचा उल्लेख तुमच्या ओठांत रुळलेला असतो.

माझ्यावर चढायला कोणतीही लेकरं तयारच असतात.

कधी शाब्दिक कधी प्रासंगिक.

रामाचं नाव घे नायतर-  आईची गांड तयारच असते घालून घ्यायला.

शिवाजीराजाचा जयजयकार करताना तुम्ही आईच्या पुच्चीला विसरत नाही.

बाबासाहेबांचा जयजयकार करणारांना तरी कुठे बाबाच्याही जननस्थानाचा विसर पडेल?

तेरी माँ की च्यूत

तिकडे ते जगातली सर्वश्रेष्ठ प्रगत संस्कृती म्हणून मिरवणारे सश्रद्ध पाश्चात्यही

एकमेकांच्या मदरला फक करतात किंवा तूच तुझ्या मदरला केलंस म्हणतात.

अल्ला के बंदे काय डायरेक्ट पडत नाहीत पृथ्वीवर.

त्यांनाही तर यावं लागतं बाहेर आईच्याच मांडीमधून

त्यांचाही कुणीही दुश्मन त्याच्या माँला ‘घालणारा’ असतो.

आणि तोही त्याच्या काफीर दुश्मनाला...

तरी असतात सगळेच त्यांच्या आयांची लेकरं. बच्छडी...

मी आहे आई.

कधी तुमची आई कधी त्याची आई.

‘घालून’ घेण्याच्या पोझमध्ये जणू जन्मजन्मांतरी वाट बघत रहाणारी.

निरखत, ऐकत रहाते गर्दीतही कानावर सहज पडणारे घण

गांडगांडगांडगांडगांड...

तुमचे शब्द, तुमच्या जिभा माझ्या आईपणाच्या इंद्रियावरून लपलपताना.

वाट पाहात रहाते झडतील कधी जिभा या- महाकुष्ठ झाल्यासारख्या.

लक्षातही येणार नाही तुमच्या- जेव्हा कदाचित् होऊनही जाईल तसं.

आत्ताच पहा.

तुमचा मेंदूच झडतो आहे.

महाकुष्ठ जडलंय त्याला.

रक्तपू होऊन तो पिसाळेपर्यंत देतच रहा तुम्ही आईच्या योनीच्या नावे शिव्या.

एक काळ असा उगवेल

तुम्हाला आईच्या योनीतून जन्मच नाही मिळणार.

हा असेल गांडीचा शाप.

उःशाप नसलेला.

मन ठिकाणावर असेल तर सांगा यात वापरलेल्या अपशब्दांचा अर्थ काय. डोकं ठिकाणावर आणण्यासाठी वापरलेल्या शिव्या तर तुकयाच्या अभंगांतही होत्या...

गोखले नि रावळ या नटांनी अरुंधती रॉय आणि शबाना या बुद्धीवंत स्त्रियांबद्दल जे काही भकले त्याचा संताप आणखी एका कवितेतून फुटला होता.

संस्कृती जतन करणे हा आपलाच ठेका आहे असे मानणाऱ्या अनेक भक्तवर्गीय श्वापदांनी या दोन कविता प्रसृत झाल्यानंतर जी काही अपशब्दांची आतषबाजी केली होती ती खरं म्हणजे मराठी भाषिक घटनांच्या इतिहासात नोंदलीच जायला हवी. अगदी भजन-कीर्तन करणाऱ्या महोदयांपासून ते फुटकळ ट्रोलपुत्र आणि ट्रोलकन्यांनी या कवितेचे निमित्त करून मला अपशब्दांचे नजराणे पाठवले. आपापल्या भिंतींवर भरपूर रंग उधळले.

म्हणजे जी कविता बाईला शिव्या देण्याबद्दलचाच संताप ओकत होती त्याच शिव्या कविता रचणारीला साभार परत मिळाल्या होत्या.

परेश रावळना इच्छा आहे... या कवितेतील शेवटच्या ओळींतला योनीचा उल्लेख म्हणजे अनेक सात्विक, स्निग्ध स्त्रीपुरुषांना माझ्या चारित्र्यहीनतेचाही पुरावा वाटला. नवल नाही. ही कविता काय होती...

परेश रावळना इच्छा आहे अरुंधती रॉयला जीपसमोर बांधून फिरवण्याची.

ते पाच हजार लोक लाइक करतात, चारशे लोक शेअऱ करतात.

विक्रम गोखलेंना इच्छा आहे अनेकांना फाशी देण्याची

आणि

शबानाला ओरबाडण्याची.

त्यांच्यासमोरचा श्रोतृवर्ग टाळ्या वाजवतो. कुणीच सांगत नाही थोबाड बंद करायला.

आणखी कुणाला वाटतं ही विरोधी बोलते हिला नागडी करून मारायला हवं.

आणखी कुणाला वाटतं त्या बाईला तुरुंगातच बसवायला हवं.

बरखा दत्त रांड आहे. तिला 'ते' भोगतात आम्हीच का नाही?

ट्विंकल खन्नाला ते म्हणे फक्त रंडी म्हणून सोडून देतात कारण ती देशप्रेमीची बायको आहे.

सागरिका कधी सापडतेय का पाहू कुठे!

तीस्ता सेटलवाड, नेहा दीक्षित, स्वाती चतुर्वेदी,

गुरमेहर कौर, नंदिता दास, स्वरा भास्कर, शीला रशीद... कितीकितीजणी...

सर्वांच्या योन्यांमध्ये खंजीर खुपसून आडवातिडवाच फिरवला पाहिजे खरं...

--

असं काहीतरी केलं पाहिजे

तरंच आपली संस्कृती टिकेल

तरंच आपला देश विश्वगुरू होईल

भाऊ... उचल जीभ लाव टाळ्याला

भाऊ, उचल हत्यार... लाव गळ्याला

आसेतूहिमाचल ते हिंदुकुश...

भाऊ, या रांडांना धडा शिकवू या...

आपल्या संस्कृतीतील एक महत्त्वाचा पैलू असलेल्या लज्जागौरीचे शिल्पचित्र टाकले तरीही ज्यांचा थरकाप उडतो अशांकडून दुसरी अपेक्षाच नाही माझी.

'मी आहे एक आई' या कवितेत राम, शिवाजीराजे, बाबासाहेब यांचा अपमान झाल्याची भुमका उठवून एका सत्शील बेशरमाने पुण्यातील एका पोलीसठाण्यात माझ्याविरुद्ध तक्रार नोंदवली. तेथील एका स्त्री पोलिसांचा फोन आला. त्यांनी नीट समजून घेतले. काही आक्षेप असलेच तर लेखी पाठवू म्हणाल्या- त्याला तुम्हीही लेखी उत्तर द्या म्हणाल्या. पण समजा भीमा कोरेगाव केसमधल्या पोलिसांसारखे प्रेरित पोलीस असते तर काही वेगळाच मनस्ताप देता येणं शक्यच होतं.

योनीवर अत्याचार करू, त्यात काटेरी दांडकी खुपसू, समूहाने बलात्कार करू अशा धमक्या अनेक भाजपविरोधी, किंवा भाजपच्या नेत्यांविरोधात लिखाण करणाऱ्या तरुण पत्रकार महिलांना खरोखरच आल्या आहेत. त्यांना रांडा म्हटले जाते. पुरुष पत्रकारांसाठीही प्रेस-प्रॉस्टिट्यूट वरून प्रेस्टिट्यूट हा सब्द लोकप्रिय- नव्हे

ट्रोलप्रिय केला गेला. अशा धमक्या आल्यानंतर पोलिसांत तक्रार करून मग या ट्रोल कंपनीवर संशोधन करणाऱ्या स्वाती चतुर्वेदीचे उदाहरण तर आता तिच्या पुस्तकातून उघड झाले आहे. नेहा दीक्षितने आपल्या सत्कारसमारंभात या बीभत्स धमक्यांचा उल्लेख जाहीरपणे केला.

प्रश्न असा आहे, योनी या स्त्रीजननेंद्रियाच्या उल्लेखालाच भडकाऊ मानणारे हे लोक योनीला किती गलिच्छ शब्दांत आणि कृतीने अवमानित केले जाते याबद्दल खरोखरच अजाण आहेत, अडाणी आहेत की आपल्या चिखलात आपण सुखी या वृत्तीचे आहेत?

या कवितेनंतर अरुंधतीला बांधायलाच नको तर तिला गोळ्याही घाला, तिलाच काय तिची बाजू घेणाऱ्या या बाईला म्हणजे कर्णिक बाईलाही बांधा, हिच्याही योनीमध्ये सुरे खुपसायला हवे- हिचं स्वतःचंही नाव तिने यादीत का नाही घातलं असे लिहिणारे बोलणारे स्त्रीपुरुष कुणाचाही अपमान करीत नाहीत. ते केवळ स्वतःच्याच माणूसपणाचा, स्वतःच्याच थोर मानीव संस्कृतीचा अधिक्षेप करतात हे त्यांना कळेनासे झाले आहे, हे आजच्या वातावरणाचे फलित आहे.

आणि म्हणूनच म्हणेन की अपशब्द वापरताना अविचाराने वापरणे आणि विचारपूर्वक वापरणे हा फरक महत्त्वाचा आहे.

उगीच आपण कशाला त्यांच्या पातळीवर उतरायचं हा साजूकपणा सोडला मी केव्हाच. नामदेव बिघडण्यापूर्वी त्याने शिव्यांचे गडद अर्थ आम्हाला केव्हाच समजावून दिले होते. आणि त्याच्याही तीनशे वर्षं आधी तुकारामाने...

हा आहे माझ्या अपशब्दांचा वारसा.

तेव्हा बेजबाबदारपणे पत्रकारिता करणाऱ्या चॅनल्सना मी छिनाल म्हटलं याचं नवल वाटून घेऊ नका. अधःपतनालाच गौरव समजण्याच्या काळात मी तरी अजून जगत नाही.

***

# साथीच्या महामारीत स्त्रिया...

साथीच्या महामारीतच का, कुठल्याही नैसर्गिक आपत्तीमध्येही पुरुषांपेक्षा स्त्रियांचे दुःखभोग अधिक वाढतात हे अगदी ऐतिहासिक काळापासून पाहिले गेले आहे.

बाईचं काम घरातलं असं समजण्याच्या काळापासून बाईने कमवायचंही आणि घरही सांभाळायचं या अपेक्षेच्या काळापर्यंत आपण वाटचाल केली आहे. मुलांना जन्म देणे, त्यांना स्तनपान करवणे या गोष्टी तर आहेतच. पण साऱ्या घरादाराला शक्य तेवढ्या सुविधा पुरवणं हे बाईकडून अपेक्षिलं जातं. आणि ती त्या पुरवतही असते. भारतासारख्या संस्कृतीच्या नावाखाली बापसत्तेला पूरक अशा परंपरांच्या पगड्याखाली असलेल्या समाजात तर याचा कळस असतो.

आजारपणं, शाळा, रोजचं जेवणखाण, साफसफाई, आणि कितीही दमणूक झाली तरी मालकाने हक्काचं शरीरसुख मागितलं तर तेही... जे नाही देता आलं तर घरगुती हिंसाचार हा काही फार मोठा गुन्हाही मानला जात नाही ही सार्वत्रिक परिस्थिती. निदान कमाई करायला परवानगी असेल तर चोरूनमारून का होईना थोडे फार पैसे हाताशी असले तर ठीक नाहीतरी सगळाच खेळ तळ्यातमळ्यात.

अर्थात इथे प्राधान्याने गरीब वर्गातल्या अशिक्षित किंवा अर्धशिक्षित स्त्रियांचा विचार करायचा आहे. या वर्गातल्या बहुतेक कमवणाऱ्या स्त्रियांचे उत्पन्नाचे

साधनही बहुधा अगदीच असुरक्षित असते. कारखान्यांत बारीकसारीक कामांवर कंत्राटी, शेतीवरही रोजगारावर आणि शहरात काहीतरी चिपाड काम कारखान्यांतून माल आणून घरात मान मोडून करायचं किंवा घरकामं करायची असे उत्पन्नाचे साधन असलेल्या कायम असुरक्षित बायका, किंवा असुरक्षित, असंघटित कामगार, मजुरांच्या बायका महामारीच्या संकटात काय भोगतात हा आज वेगळ्या अभ्यासाचा विषय आहे. आणि तो करणाऱ्या अभ्यासकांची निरीक्षणे वाचून हादरून जायला होते. नोकऱ्या करणारे पुरुष काही महिन्यांनंतरतरी कामावर जाऊ शकतील... पण या काळात मोडून पडलेल्या असंघटित बायकांना उभं रहायला आधारही असणार नाही ही बव्हंशी परिस्थिती आहे खरी.

युनायटेड नेशन्सचे सचिव अँन्टोनिये ग्युटेर्स यांनी असं जाहीर केलं आहे की कोविड-१९च्या टाळेबंदीनंतर जगात सारीकडेच स्त्रियांना घरगुती हिंसाचाराचा सामना करावा लागला. काही देशांतील आकडेवारी उपलब्ध झाली आहे, तर आपल्यासारख्या काही घरातली गोष्ट चार भिंतींबाहेर जाता कामा नये असं मानणाऱ्या देशांत ही आकडेवारी कधीच बाहेर येणार नाही कारण ती गोळाच होणार नाही.

एरवी विशिष्ट वेळेला सारे बाकीचे घराबाहेर पडले की घरातली कामं मर्यादित रहातात. पण सदासर्वकाळ सगळेजण घरात म्हटल्यावर सतत भांडी, धुणी आणि अन्नअन्न... या कामातून सुटका नाही. त्यातच पैसा नाही, फुकट मिळालेल्या किंवा रेशनवरच्या धान्यातून अन्न शिजवणे आणि जेवणारांना समाधान देणे शक्यच नसते. अशा वेळी बायकोला धोपटणारे वीर भरपूर असतात.

याच काळात स्त्रियांना गर्भ रहाण्याचे प्रमाण वाढते याचे कारण स्पष्टच आहे. याबाबत चेष्टाविनोद करणं ज्या वर्गाला परवडतं त्यांचं सोडा. पण शरीराला आणि खिशाला न परवडणारं मूल या काळात नको असलं तर गर्भपात करून घेण्याचे रस्तेही स्त्रियांना बंद असतात. महामारीतल्या टाळेबंदीचा हा एक मोठा फटका बायकांना बसतो, बसला आहे.

जगात कुठल्याही शासनाने प्रथम प्राधान्याने स्त्रियांना घरगुती हिंसाचारापासून वाचवण्यासाठी पावले उचलली पाहिजेत. दुसरं म्हणजे गर्भवतींना आवश्यक वाटत असल्यास गर्भपाताची सुरक्षित व्यवस्था करून दिली पाहिजे. आणि तिसरं म्हणजे त्यांचे उत्पन्नाचे मार्ग बंद पडले असल्यास त्यांना पर्यायी उत्पनाचे साधन वा पाठबळ दिले पाहिजे. एकट्या पडलेल्या स्त्रियांबाबत तर हे नक्कीच करावे लागेल.

महामारीत काही विशिष्ट लिंगाच्याच व्यक्तींना त्रास होतो असे काहीच नाही. पण सामाजिक स्थान आणि समाजव्यवस्था लक्षात घेतली तर महामारीचा परिणाम सर्वांवर वेगवेगळ्या प्रमाणात होतो हे मान्य करावे लागेल.

परिस्थितीने गांजलेला पुरुष, आपल्यापेक्षा दुर्बळ असलेल्या घरातल्या स्त्रीवर अत्याचार करतो हे काही नव्याने उमगलेले सामाजिक सत्य नाही. आणि त्याचे समर्थनही करण्याचे कारण नाही किंवा हे बदलले पाहिजे, मानसिकता बदलली पाहिजे वगैरे लांबच्या गोष्टींची चर्चा करण्यात तर आत्ता काहीच अर्थ नाही. हे होणार हे दिवसामागून रात्र येते इतके अटळ आहे. प्रश्न असा आहे, की महामारीच्या

थैमानाला तोंड देताना या पुरुषी थैमानाला करकचून आवर घालणारी दंडव्यवस्था हवीच. आणि फक्त तक्रार आल्यावर नव्हे, तर गृहीत धरून.

असा दाखला आहे की तर या महामारीच्या टाळेबंदीच्या काळात दर महिन्याला- २९ तासाला एक स्त्री आपल्या पतीच्या हातून ठार होते आहे. अजूनही यासंबंधीचे अधिकृत आकडे हाती यायचे आहेत. ते कधी येतील, येतील की नाही सारीच शंका आहे, कारण तक्रार करायला बाहेर पडण्याचा मार्गच बंद आहे.

यापूर्वी येऊन गेलेल्या इबोला, झिका या साथींच्या वेळीही अशा वाढत्या कौटुंबिक हिंसाचाराचा अनुभव बायकांनी घेतला आहे. तरीही अनेक देश कौटुंबिक हिंसाचार हा काही फार गंभीर प्रश्न आहे हे मान्यही करायला तयार नाहीत. आणि ३६५ दिवसांतले विशिष्ट सणासुदींचे नऊ-दहा दिवस सोडले तर स्त्रीला ताडन की अधिकारी मानणाऱ्या अडाण्यांच्या देशात तर हे मान्य होणारच नाही. स्त्रियांना नवऱ्यापासून संरक्षण- हे काय भलतंच... भर्ता रक्षति यौवने... अजूनही कोंडलेल्या मनांच्या डबक्यांतून हद्दपार होत नाही तिथे तोच शत्रू आहे हे मान्य कोण करणार.

यापूर्वी अलिकडेच इबोला, झिका या भयंकर साथीच्या रोगांना तोंड दिलेल्या देशांतील फक्त केनियाने घरगुती हिंसाचाराबाबत कडक पावले उचलली होती. फोनवरून तक्रार करण्याची सोय करून दिली होती. आणि ही तक्रार पूर्ण गांभीर्याने घेतली जाईल असेही पाहिले होते.

तसेच या काळात स्त्रियांना गर्भनिरोधक गोळया उपलब्ध करून देण्याचेही एक मोठे काम होते. ते करण्यात कमी पडल्याने लोकसंख्या वाढेल वगैरे विनोद करू नका. एक मूल- नको असलेले मूल- जन्माला घालणे हा बाईच्या जिवाशी खेळ असतो हे कुणीच विसरता कामा नये. आणि शरीरसंबंध म्हणजे नेहमीच स्त्रीला हवी असलेली गोष्ट असते असले फालतू ग्रहही करून घेऊ नका. शरीरसंबंध लादला जातो, अशा वेळी राहिलेला गर्भही लादलेलाच असतो- अगदी लग्नाच्या नवऱ्याचा असला तरीही- हे लक्षात घ्यायला हवं. या लांबलेल्या टाळेबंदीच्या काळात गर्भपात करून घेणं अशक्य झालं तर या स्त्रियांवर दुहेरी संकट कोसळणार आहे हे नक्की.

एक दुर्दैवी उदाहरण आपल्यापुढे आहे. २०१४मधल्या इबोला साथीच्या वेळी सिएरा लिओनमध्ये टाळेबंदी काळात किशोरवयीन मुलीं गर्भवती रहाण्याचे प्रमाण २३ टक्क्यांनी वाढले होते. घरातलेच पुरुष या मुलींवर जबरदस्ती करत होते. आणि त्याच्या परिणामांपासून सुटका करून घेण्याचाही मार्ग या मुलींकडे नव्हता. आपल्या देशात हे झालेलेच नाही असे नाही. आकडेवारी नाही म्हणजे घटनाच नाहीत असे समजण्याचा बालिशपणा आपण करू नये. यातून मुली किंवा त्यांचे पालक असुरक्षित गर्भपाताचे मार्ग निवडून अधिकच धोक्यात येऊ शकतात. ही सारी उदाहरणे आधीच्या साथींच्या काळांत इतर देशांत घडलेली आहेत. त्यावरून आपणही शहाणे व्हायला हवे.

या काळात गर्भ राहिलेल्या स्त्रियांना न जाणो कोविडचा संसर्ग झालाच तर गर्भाला व्यंग आणि मातेला मृत्यूचा धोका असेही होणे शक्य आहे, हे आणखी वेगळेच.

या तीन मुख्य शक्यतांचा विचार कुठल्याही महामारीच्या आपत्ती व्यवस्थापनात यापुढे तरी केला जावा यासाठी जगभर विविध संघटना प्रयत्न करत आहेत.

आता आपण दुसऱ्या म्हणजे मध्यमवर्गीय शिक्षित, महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ घेतलेल्या भारतीय स्त्रियांच्या वर्गाचा विचार करू. अर्थातच गरीब, अशिक्षित स्त्रियांच्या दुःखभोगांची आणि या वर्गातील स्त्रियांच्या समस्यांची तुलना ही असमतोलाची तुलनाच असेल. पण अखेर वाट्याला आलेल्या दुःखाची तऱ्हा वेगळी असली तरीही दुःखाचे चटके त्या त्या स्त्रीला जाणवतात ते खरेच असतात. दुःख वेगळं असतं पण खोटं नसतं.

या लांबलचक टाळेबंदीच्या दिवसांत मध्यमवर्गीय नोकरदार स्त्रियांना किंवा गृहिणींना काय अनुभवावं लागलं, काय सोसावं लागलं त्याचाही विचार करावाच लागेल. या नोकरदार स्त्रियांच्या वर्गात जवळपास अर्ध्याहून अधिक स्त्रिया आरोग्य, शिक्षण, अन्नविषयक सेवा, सामाजिक कार्यातील सेवांमध्ये रोजगार कमावणाऱ्या आहेत. या नोकऱ्यांवर एकतर परिणाम झाला आहे किंवा नोकऱ्या टिकल्या तरीही त्यातील जोखीम वाढली आहे. परिणामी या स्त्रियांना घरातूनच घरात बसण्याची जबरदस्ती होताना दिसते. जगभरात अशा ७४ कोटी स्त्रिया असतील असा अंदाज आहे. त्यातील कितीजणी आपली नोकरी, आपले उत्पन्न टिकवू शकतील शंकाच आहे. कारण कष्टाची कामे अंतर्भूत असलेल्या पुरुषांच्या नोकऱ्या वा रोजगार पूर्ववत् झाला तरीही स्त्रियांची परिस्थिती पूर्वपदावर आलेली नाही. शिवाय स्त्रियाच असा

विचार करतात की मलाच कोरोना झाला तर घराकडे पाहाणार कोण, पिल्लांना जेवायला घालणार कोण. ज्या स्त्रियांना मुले पाळणाघरात ठेवून कामाला जाणे भाग होते, त्या स्त्रियांची तर पंचाईत झाली आहे. पाळणाघरे बंद तर आहेत किंवा उघडी असली तरीही भीतीपोटी मुलांना तिकडे सोडावे असे वाटत नाही. ज्या स्त्रियांच्या घरात आई-वडील, सासूसासरे असतील त्यांना थोडा दिलासा आहे. पण तरीही अनेकदा जाऊ दे आता तू नोकरी सोड असाच धोशा मागे लागण्याची शक्यता जास्त.

जागतिक आऱोग्य संघटनेच्या आकडेवारीनुसार एकूण १०४ देशांतील ७० टक्के महिला आरोग्य आणि सामाजिक सेवा क्षेत्रात कोविडशी लढाईत उतरल्या आहेत. पण त्यांचे उत्पन्न मात्र याच लढाईत उतरलेल्या पुरुषांपेक्षा तुलनेने ११ टक्क्यांहून कमी आहे.

अगदी तुटपुंजा पगारावर आरोग्यक्षेत्रात काम करणाऱ्या या महिलांना सॅनिटाइझर्स, मास्क, पीपीई अशा मूलभूत सुविधा न मिळाल्यामुळे त्यांचे जीव धोक्यात आहेत असे भारतात घेतलेले निरीक्षण आहे.

पुन्हा आधीच्या नाही रे वर्गातील स्त्रियांप्रमाणेच या वर्गातील स्त्रियांनाही लैंगिक छळणूक, कौटुंबिक हिंसाचार, पावलोपावली अपमान या गोष्टींचा सामना करावा लागतोच आहे.

त्या घरी रहातात तेव्हा घरातले सगळे काम- घरकामाची बाई येत नसल्यामुळे घरातल्यांना करावे लागते. काही आदर्श, समजूतदार कुटुंबे सोडली तर

भल्याभल्यांच्या घरातही या सर्व जबाबदाऱ्या बाईच्याच अंगावर खुशाल टाकल्या जातात. ती स्वतःही घरातून ऑफिसचे काम करत असली तरीही 'तिला ते जमतं, मला कधी सवयच नाही' म्हणत घरातले पुरुष तंगडीवर तंगडी टाकून बसतात हे चित्र निश्चितपणे भारतात दिसतं. घरकामाची पैशात मोजदाद करण्याची आपली 'संस्कृतीच' नाही. आणि त्या कामाला आदर देण्याचीही नाही.

या सगळ्या भानगडीत स्त्रियांवर अन्याय होतो आहे असं नुसतं म्हटलं तरीही आता या काळातही तुम्हाला स्त्रीवाद सुचतो का म्हणत शिंग रोखून अंगावर धावून येतील लोक. पण जे सत्य आहे ते सत्यच आहे.

एक आकडेवारी असं सांगते की ज्या चांगल्या पगारदार स्त्रिया घरून काम करत होत्या, त्या पुरुषांच्या तुलनेत केवळ एक तृतियांश वेळ काम करू शकत होत्या. त्यांचा बराचसा वेळ घरातील कामे, मुलांकडे लक्ष देणे यातच जात होता. तर पुरुष मात्र आता मला ऑफिसचं काम आहे सांगून पूर्णपणे ऑफिसचं काम करू शकत होते. आणि घरातलं काम जराही करत नव्हते. हे निरीक्षण युरोपातले आहे. मग भारतात काय अपेक्षा करणार.

या परिस्थितीचा परिणाम निश्चितपणे स्त्रियांच्या भविष्यातील प्रमोशनच्या संधी, अप्रेझलवर होणार आहे. चित्र पुढल्या वर्षी स्पष्ट होईल. पण तत्पूर्वीच या परिस्थितीची दखल घेऊन स्त्रियांना न्याय मिळेल अशी पावले शासनांनी उचलायला हवीत.

न्यायकल्पनेला अधिक संवेदनशील व्हावे लागेल.

याच काळात शिक्षणक्षेत्रातील अभिजन वर्गातही याचे पडसाद उमटले आहेत. या काळात स्त्री प्राध्यापक, संशोधकांनी फार कमी संशोधन वा निबंध लेखन केल्याचे दिसले आहे. पुरुषांच्या लेखनावर तेवढासा परिणाम झाला नव्हता.

असं म्हणतात की सोळाव्या शतकातील प्लेगच्या काळात शेक्सपिअरने आणि सतराव्या शतकातील प्लेगच्या काळात आयझॅक न्यूटन यांनी सर्वात महत्त्वाचे लेखन आणि संशोधन केले. सारे जग प्लेगने ग्रस्त असताना त्यांना हे शक्य झाले याचे एक कारण म्हणजे त्यांच्यावर कौटुंबिक जबाबदाऱ्या नव्हत्या. मुलांच्या जबाबदाऱ्या नव्हत्या... ते प्रतिभावंत होतेच. पण ही कारणेही होतीच.

स्त्रियांना मात्र या जबाबदाऱ्या संन्यस्त झाल्याशिवाय चुकत नसतात. याच साथीच्या काळानंतर अनेक स्त्रियांना करीअर सोडून घरी बसायला लागेल की काय अशी भीती सतावू लागली आहे.

१९५०नंतरच्या गेल्या काही दशकांत स्त्रियांनी करीअरच्या दृष्टीने, आर्थिक स्वावलंबनाच्या दिशेने जी काही प्रगती केली होती ती प्रगती सगळी या साथीच्या हाहाकारात वाहून जाईल आणि पुन्हा एकदा स्त्रिया संघर्षाच्या पहिल्या पायरीवर पोहोचतील अशी सार्थ भीती जगभरात व्यक्त केली जाते आहे.

आणि असे होऊ नये म्हणून अँजेला मर्केल यांच्यासारख्या जगातील कर्तृत्ववान स्त्रीनेत्या पुढे येत आहेत हे एक सुचिन्ह आहे. स्त्रीपुरुषांच्या परंपारिक भूमिकांचा उदोउदो सुरू होण्याअगोदर ते थांबवले जाणे गरजेचे आहे. या साथीनंतर स्त्रीपुरुषांना समान संधी दिल्या जातील याची खातरजमा करून घेणे गरजेचे आहे.

नाहीतर संधीच्या बाजारात सर्व धर्मांतले मूलतत्त्ववादी आपले हात धुवून घेण्याची शक्यता जास्त आहे. या काळात स्त्रीवर होणाऱ्या अन्यायाबाबतचे सर्व मुद्दे वेळच्यावेळीच निकाली काढले तर आपत्तीचे रुपांतर संधीमध्ये केल्याचे श्रेय जगभरच्या महिला नेत्यांना, राजकीय नेत्यांना मिळू शकेल.

***

# अडसर झालेल्या प्रतिगामी स्त्रियांची कहाणी

गेल्या शतकात जगभरात स्त्रीहक्क जाणीवा वाढल्या. त्यांची बौद्धिक समानता तत्वतः तरी मान्य होण्याचे प्रमाण वाढले. त्यानुसार वर्तन बदलले असे नाही, अन्याय, असमानता थांबली असेही नाही. पण निदान झेप घेऊ पाहाणाऱ्या स्त्रियांना, विविध क्षेत्रांत कवाडे खुली झाली. विशेषतः आर्थिकदृष्ट्या संपन्न असलेल्या वर्गातील स्त्रियांना हे फायदे मिळाले. आणि कष्टकरी वर्गातील स्त्रियांच्या आर्थिक शोषणाला लगाम बसला. कुटुंबसंस्थेत हे सारे फारसे परिणामकारक ठरले असे नाहीच. पण तरीही परिस्थिती बरीच सुधारली. हे विचारात घेता जगभरातील स्त्रियांना या बदलाचे, आणि हा बदल आणणाऱ्या उदारमतवादी विचारसरणीचे आभार मानावेसे वाटले पाहिजेत असे गृहीत धराल. दर वेळी सनातनी भूमिकेतून स्त्रियांच्या साध्यासाध्या हक्कांसाठी मोडता घालणाऱ्या परंपरागत विचारसरणीला त्या कधीच वश होणार नाहीत असेही गृहीत धराल.

पण तसे दुर्दैवाने नाही. जगातल्या सर्व स्त्रियांना या प्रगतीचे कौतुक वाटले असे नाहीच. सारे बदल आयतेच मिळालेल्या आजच्या अनेक तरूण स्त्रियांना तर आता पूर्वीच्या परिस्थितीकडेच वळण्याचे डोहाळे लागले आहेत असे दिसते. हे होत आहे ही परिस्थिती धक्कादायकच म्हणायची.

पण स्त्रिया आपल्या पारतंत्र्यासाठी आग्रही असण्यालासुद्धा इतिहास आहेच.

आज भारतातच नव्हे तर जगभरात- इस्लामिक कट्टरतावाद्यांत, श्वेतवर्णश्रेष्ठतावाद्यांत, म्यानमारच्या बौद्ध कट्टरांतही स्त्रियांनी परंपरागत मूल्यांनुसारच जगायला हवे असा विचार करणाऱ्या स्त्रिया उजव्या विचारधारेत क्रियाशील आहेत. स्त्रियांनी चूल-मूल-आणि चर्च या पलिकडे जाऊ नये हा विचार नाझी जर्मनीमध्येही जोरात होता. हिटरलच्या जगात भारी जर्मनीत ज्या स्त्रिया चूलमूलचर्च हे मान्य करत नव्हत्या त्यांना मानसिक रुग्ण ठरवून इस्पितळांत भर्ती करून कोंडून ठेवले जात असे. स्त्रियांनी नाझीवादी पुरुषांच्या सर्व गरजा भागवण्यासाठी सज्ज असावे हा विचार नाझी राष्ट्रवादात चपखल बसत होता. त्यातील काही स्त्रिया खुद्द नाझीसेनेत अधिकारपदावर होत्या- पण त्या मुखत्वे त्या शत्रू म्हणजे ज्यू स्त्रियांची वासलात लावण्यासाठी, त्यांना पकडण्यासाठी, त्यांचे तुरुंग सांभाळण्यासाठी नेमल्या जात असत. आणि त्यात त्यांना रोजगाराबरोबरच स्वतःच्या सक्षमीकरणाचा आभास होऊन समाधान होत असे. पण त्यापलिकडे त्यांच्याकडे अधिकारपदे येत नसत. इटली, स्पेनमधील फॅशिस्ट चळवळींतही हेच चित्र होते.

आज भारतातील महात्मा फुले, सावित्रीबाई फुले, महर्षी कर्वे, ईश्वरचंद्र विद्यासागर, राममोहन रॉय यांच्यासारख्यांच्या प्रयत्नांनंतर आधुनिक स्त्रीहक्कांची लढाई लढणाऱ्या स्त्रियांची मोठी मालिका भारतात झाली. कष्टकरी स्त्रियांचे वेतन, सुट्ट्यांचे हक्क, अन्याय निवारणासाठी न्यायालयीन लढाया लढणाऱ्या वकील स्त्रिया, जगण्याची साधने हिरावली जाण्याविरुद्ध लढणाऱ्या जनआंदोलनांतील स्त्रिया या साऱ्या त्याच एका लढाईचा गौरवास्पद भाग आहे.

पण प्रतिगामी विचारसरणीने लिंपलेले अनेक पुरुष, मग ते धर्मवादी संघटनांचे असोत की तथाकथित पुरोगामी असोत, स्त्रीमुक्तीचे प्रयत्न म्हणजे काहीतरी केवळ फॅशन किंवा उच्चभ्रू, पैसेवाल्या स्त्रियांचे खेळ असे गैरसमज पसरवण्याच्या मागे झटून प्रयत्न करतात. आणि दुर्दैवाने त्यांच्या होयबाया झालेल्या स्त्रियाही सर्वत्र आहेत. पण पुरोगामीपणाचा स्पर्श सोडाच, प्रतिगामीपणाचाच अभिमान असलेल्यांचे काय? ते या स्त्रीहक्कांचे काय करतील? स्त्रीसमानतेच्या तत्वाचे काय करतील?

भारतात हिंदुत्वश्रेष्ठत्वाची कट्टरता नव्या जोमाने सुरू झाली आहे. या कट्टर उजव्या विचारप्रणालीकडे हक्कांसंबंधी जागृत झालेल्या स्त्रिया जाणार नाहीत हे तर्कसुसंगत आहे. पण अशी तर्कसुसंगती प्रत्यक्षात पाहायला मिळत नाही. बायकांना राजकारणातली अक्कल नसते म्हणणाऱ्या बहुसंख्यांकांच्या राजकारणात या स्त्रिया त्या राजकारणाच्या बाजूने तोंडाळ होऊ लागल्या आहेत हा विनोद आहे.

पदव्युत्तर शिक्षणाची बिरुदावली मिरवणाऱ्या स्त्रियाही सारासार विचार बाजूला ठेवून केवळ प्राचीन हिंदू परंपरेत जे सांगितले आहे त्यानुसार स्त्रियांनी वागावे हे मान्य करतात. आणि हिंदू धर्माचे अपार गोडवे गाऊन त्यासाठी झेंडेही खांद्यावर घेतात. इस्लाममधील कुराणनिष्ठ अशिक्षित अविचारी महिलांत आणि उच्चशिक्षित अशा हिंदू किंवा ख्रिश्चन महिलांमध्ये गुणात्मक फरक काहींच नाही. कुणी बुरख्यात तर कुणी भारतीय अंगभर कपड्यांत तर कुणी पाश्चात्य पद्धतीच्या अंग उघडे टाकणाऱ्या कपड्यांत असतील. विचारांचा तोकडेपणा सर्वत्र सारखाच.

उजव्या कट्टर धर्मवादी किंवा वंशश्रेष्ठतावादी प्रणालींतून सुरू झालेल्या चळवळींत म्हणूनच आपल्याला स्त्रियांचाही सहज वावर दिसतो. इतर धर्मीयांचा द्वेष करणाऱ्या हिंसक चळवळींमध्ये स्त्रियांचाही म्हणूनच सहभाग असतो. बहुतेक वेळा अशा संघटनांच्या कार्यपद्धतीत स्त्रियांना दुय्यम स्थान असतेच असते. तरीही त्या तो अधिक्षेप सहन करून तेथे टिकून रहातात.

कू क्लक्स क्लॅनमध्येही स्त्रियांचे प्राबल्य होते. पंधरा लाख स्त्रिया त्या घृणास्पद चळवळीत आत्मसन्मानाच्या विकृत कल्पनांतून सहभागी झाल्या होत्या. त्या संघटनेसाठी सर्व धार्मिक स्वरुपाचे कार्य करत. त्यांचे श्वेत नसलेल्यांविरुद्धचे रक्षाकार्य -व्हिजिलॅन्टिझम- जबरदस्त असे. (-आपणही आता येथे संस्कृतीरक्षक स्त्रियांचे मुलामुलींनी एकत्र फिरू नये प्रकारचे रक्षाकार्य अनुभवू लागलो आहोत.) एकंदर संस्कृतीश्रेष्ठत्वाची बोंब मारली की स्त्रिया काय नि पुरुष काय- अविवेकी प्रकारातले सारेच त्यात सामील होतात.

भारतीय जनता पक्षाने, त्यांच्या मातृसंघटनेने म्हणजे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने आता देशात आपल्या मूल्यसमजाची जोरदार शिंपण केली आहे. परवाच्या विजयानंतर त्यांच्या संस्कृतीश्रेष्ठत्वाच्या अभिनिवेशाचा कलशाध्याय सुरू झाला आहे. आणि त्यात दिसणाऱ्या उन्मादात स्त्रियाही सारख्याच हीन अभिरुचीने सामील आहेत हे पाहायला मिळते. या नव्या प्राचीन भारतात स्त्रियांनी आजवर मिळवलेले समान हक्क कसे काय टिकाव धरतील हे पाहायचे आहे. हिंदुत्वाचा बडीवार सांगणाऱ्या स्त्रियांना आपले सवयीचे झालेले हक्क गमावणे पटणारे नाही. पण मग

त्यांतून काय मार्ग काढला जाईल- ते पाहाणे कदाचित् सुरस कदाचित् क्लेशकारक ठरेल.

नपेक्षा या नवप्राचीन स्त्रियांनी प्रगतीच्या वाटांपेक्षा पुरुषसत्ताक व्यवस्थेतील स्त्रीद्वेषी तत्वे अंगिकारली आहेत असे चित्र आकाराला येईल.

उजव्या विचारधारेतील स्त्रिया, त्यांची कार्यपद्धती, कृत्ये हा एक स्वतंत्र अभ्यासाचा विषय आहे. हा अभ्यास जगभर सुरू आहे. भारतात ही वेळ कधी येईल असे अगदी अलिकडेपर्यंत वाटले नव्हते. माया कोडनानींच्या घटनेनंतर ते बदलले. आणि आता तर ती शक्यता गहिरी झाली आहे. इतिहासाच्या मांडणीसाठी भारतातील उजव्या विचारधारेतील क्रियाशील स्त्रियांच्या कथनांची, मांडणीची आणि कार्यपद्धतीची नोंद करून ठेवावी लागेल.

***

# धैर्य



२०१६ सालचा हा फोटो जगातील धैर्यशील आंदोलकांच्या मनात घुसून बसला आहे. चिली देशातील आंदोलकांपैकी दोन महिलांना पोलिसांनी ताब्यात घेतले तेव्हा त्यांच्या सोबतच्या या मुलीने समोरच्या सशस्त्र पोलिसाच्या नजरेला बेडरपणे नजर भिडवली. तो क्षण कॅमेऱ्यात पकडला गेला. फोटोग्राफरला त्या मुलीचे नावही विचारायला फुरसत मिळाली नाही. पण ती बेडर नजर नंतर कित्येकांना बळ देत राहिली आहे.

चीनच्या तियानानमैन चौकात आंदोलकांवर चिनी कम्युनिस्ट सरकारने घातलेल्या रणगाड्यांच्या ताफ्यासमोर एक तरुण एकटाच उभा राहिला. असं म्हणतात रणगाड्यांसमोर अडवायला उभे राहिलेले आणखीही काही तरूण होते. पण फोटो मात्र या एकट्याचाच जगापर्यंत पोहोचला. आपल्या जुलूमशाहीच्या खऱ्या बातम्या जगापर्यंत पोहोचू नयेत, वास्तव चित्र जगाला कळू नये याची कसोशीनी काळजी घेणारी सरकारे कॅमेरे, शब्द, आणि आता इंटरनेट यांच्यावर बंदी घालतात. तरीही सत्य कधीतरी उसळी घेऊन बाहेर येतेच- त्याचेच हे साक्षात चित्र होते.

अमेरिकेतील काळ्या लोकांवर होणाऱ्या भेदभावावर पहिला आवाज उठवणाऱ्या दोन स्त्रिया- क्लॉडेट कोल्विन आणि रोझा पार्क्स. रोझा पार्क्स हे नाव प्रसिद्ध आहे- पण तिच्याआधीही क्लॉडेट कोल्विन या अगदी किशोरवयीन मुलीने बसमध्ये आपली जागा गोऱ्या माणसाला द्यायला खंबीर नकार दिला होता. खटला चालला आणि तो तिने जिंकला. पण खटला चालू असतानाच एका गोऱ्याने तिच्यावर बलात्कार केला, आणि त्यातून तिला गर्भ राहिला. कुमारी माता म्हणून तिचा खटलाच खराब करून टाकला जाऊ नये म्हणून तिचे नाव हेतुतः अप्रसिद्ध ठेवले गेले. रोझा पार्क्सलाही हे माहीत होते. रोझाने क्लॉडेटच्या विरोधाची ध्वजा पुढे नेली.

अशाच बेडर प्रतिकाराची आणखी एक प्रतिमा होती रॅचेल कोरी, वॉशिंग्टनच्या ऑलिम्पिया कॉलेजची अवघ्या २३ वर्षाची विद्यार्थिनी. तिचा खून झाला तेव्हा तिने गडद केशरी निऑन जॅकेट घातले होते. ह्यूमन शील्ड म्हणून काम करणारे कार्यकर्ते

आपण स्पष्टपणे नजरेत यावं म्हणून सुरक्षेच्या दृष्टीने असली जॅकेट्स वापरतात. इजिप्तच्या सीमेलगतच्या गाझा पट्टीतल्या राफाह या गावात रोजच घरांना भुईसपाट करण्याची कारवाई होत असे. १६ मार्च २००३ रोजी एका पॅलेस्टिनी डॉक्टरच्या घरावर ही कारवाई होणार होती. ती थांबवण्यासाठी जे आठ अमेरिकन तरुण उभे होते, त्यातच रॅचेल होती. ते समोरून येणाऱ्या शस्त्रसज्ज डी-नाईन बुलडोझरच्या ड्रायवरला मेगाफोनवरून थांबण्याची विनंती करत राहिले. तो थांबला नाही तेव्हा रॅचेल त्याच्या मार्गात गुडघे टेकून बसली... तरीही तो न थांबता तिच्या अंगावरून तिला चिरडून पुढे गेला. या घटनेवर जेव्हा इस्राएली न्यायालयात खटला चालला तेव्हा इस्राएली न्यायालयाने रॅशेलचा खून हा केवळ एक दुर्दैवी अपघात होता असा निकाल देऊन इस्राएल सरकारला आणि बुलडोझरच्या चालकाला दोषमुक्त केले.

रॅशेल कोरीइतकाच धैर्य़शील असा एक तरूण भारतातही ब्रिटिशांविरुद्ध उभा राहिला होता. बाबू गेनू... ट्रक्स अडवून उभ्या राहिलेल्या तरुणांमधला बाबू गेनू ट्रक अंगावर आला तरीही हटला नाही. हे धैर्य सारेच दाखवणार नाहीत हे स्पष्टच आहे. अनेकजण त्याला आणि रॅशेलला अव्यवहारी म्हणूनही मोकळे होतील. पण त्यांच्या धैर्याचा एक थेंब तरी अंतरी जोपासावा.

अशा बेडरपणाच्या घटना जगभर अगणित असतील. तरीही त्या एकंदर मानवी लोकसंख्येच्या मानाने, त्यांच्यावर होणाऱ्या अत्याचारांविरोधात आवाज उठवण्याच्या संबंधात कमीच आहेत.

१९ डिसेंबर २०१९ रोजी या देशातील लाखो लोक बेडरपणे नागरिकत्वाच्या कायद्याचा वापर दुही माजवण्यासाठी करणाऱ्या भाजप सरकारच्या विरोधात

रस्त्यावर उतरले. आणि या लाखो लोकांत खूप मोठ्या प्रमाणात युवतीही होत्या. रविशकुमारने जंतरमंतर येथे घेतलेल्या मुलाखतीत जामिया मिलिया विद्यापीठाच्या विद्यार्थिनी खणखणीत बोलत होत्या. पोलिसांना घाबरत नाही आम्ही. ते ही आमच्यासारखीच माणसे आहेत. आणि त्यांना सरकारने आमच्यावर सोडले तरीही आम्ही मागे हटणार नाही, विरोध थांबवणार नाही, इतकी स्वच्छ प्रेरणा त्यांच्या बोलण्यात होती.

घरातल्या बापमाणसांसमोर नजरही वर उचलून बघायचे नाही, बोलायचे नाही, असले संस्कार सर्व धर्मांतून, जातींतून, स्तरांतून झिरपवलेल्या कालबाह्य संस्कृतीला झुगारून देऊन आज देशाच्या कठीण काळात हुकूमशाही, दुहीवादी सत्ताधाऱ्यांच्या मुजोरीला आव्हान देत आम्ही स्त्रियाही उभ्या आहोत.

२००६ साली सुरू झालेल्या मी-टू आंदोलनाचे पडसाद अजूनही येथे उमटत रहाणार आहेतच. बलात्कार होण्याचे निर्लज्ज समर्थन करणाऱ्यांच्या देशात आज एक चुकीचा स्पर्श, एक हलकट नजर किंवा एकही अश्लील शेरा सहन करणार नाही असे म्हणणाऱ्या स्त्रियांचीही संख्या वाढत चालली आहे.

आजच एका मित्राने एक घटना व्यथित होऊन सांगितली. बसमध्ये बसलेल्या एका बाईला तिच्या मागे बसलेला एक पन्नाशीतला टिळेवाला माणूस कडेने हात लावत होता. ते या मित्राने पाहिले. त्याने कंडक्टरला बोलावून सांगितले आणि दाखवले. मग दोघांनी मिळून त्याला खडसावले- तर तो म्हणे मी कसा दिसतो ते पहा. मी असे करणे शक्य तरी आहे का (तेच ते- कपड्यांवरून ओळखता येतेच... हा युक्तीवाद). या दोघांनी सांगितले की वाटण्याचा काही विषय नाही, आम्ही स्वतः

पाहिलंय. त्या बाईला त्या सोद्याने जोरात विचारलं मी काय केलं काय तुम्हाला. ती इतकावेळ गप्प राहिली यावरून त्याने ती घाबरट आहे हे ताडलं होतं. ती घाबरून म्हणाली- काय नाय काय नाय- काय बी केलं नाय. खेडवळ तरुण बाई होती ती. पण या दोघांनी तिला म्हटलं आम्ही स्वतः पाहिलं नि तुम्ही काय नाही सांगता. तिचे डोळे भरून आले. ती मान खाली घालून बसून राहिली. मग या दोघांच्या मदतीला गाडीतली दुसरी मुलगी आली. आणि म्हणाली धरून बदडा त्याला. मग बाकीच्यांनी साथ दिली आणि टिळेवाल्याला सगळयांनी बुकलला. बस थांबवून पोलिसातही दिला. त्या बाईनेही सांगितलं हात लावत होता. तिला मित्राने नंतर विचारलं तुम्ही आधी का नाही म्हणालात हो- तेव्हा म्हणाली- आम्ही साधी मान्सं- घाबरले मी. या तिच्या उद्गारांनी डोळयात पाणी आलं? नको. अंगार उतरू दे. कुणी खिळवली आपल्या हाडीमाशी भीती?

सावित्रीबाई फुल्यांनी साऱ्या भयावर मात करून हे निर्भय ज्ञानाचे संपुट आपल्या हाती दिलं... तरीही आपण स्त्रियांनी घाबरून रहाण्यात भूषण मानायचे? भगतसिंगांपासून महात्मा गांधींपर्यंत, आंबेडकरांपर्यंत जीव गेला तरी चालेल पण माफीवीर होणार नाही हे कृतीतून दाखवून दिले तरीही आपण बुळबुळीत तडजोडी करत दिवस ढकलायचे?

हे घाबरणेच आपल्या आत्मसन्मानाला पायदळी तुडवू देते. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत हीच कथा... हीच कथा...

म्हणून कुठल्याही देवादेवीपेक्षा, पूजाप्रार्थनेपेक्षा स्वतःसाठी स्वतः -न भिता उभे रहाणं महत्त्वाचं आहे. माराल तरी बेहतर- अन्याय सहन करणार नाही हे एकच तत्त्व

असं आहे की ते मनुष्यत्व वाचवतं. आणि या भावनेला ज्ञानाची आणि सत्याची जोड असेल तर कुठलाही बापसत्तेचा धुरंधर नरेंद्र आपल्याला पराभूत करू शकणार नाही.

प्रत्येक समस्येच्या, प्रत्येक अन्यायाच्या मुळाशी एक खात्री असते. की अन्यायित व्यक्ती अखेर घाबरून गप्प रहाणार आहे.

बेशरम खोट्याला घाबरून सत्य गप्प राहील.

झुंडीच्या प्रचारापुढे दबून वास्तवाचा स्वर सुन्न पडेल.

तुरुंगाला घाबरून लोक गप्प रहातील.

पगार थांबेल म्हणून नोकरदार तडजोडी करतील.

मरायचीच पाळी असली तरीही कच्च्याबच्च्यांकडे पाहून शेतकरी तोंड मिटतील.

पंचतारांकित जगण्याला मुकू म्हणून पत्रकार चुपचाप रहातील किंवा सत्ताधाऱ्यांची कुत्री बनून भुंकू लागतील...

आपल्यावरही बलात्कार झाला तर या भीतीने सेंगरच्या गुंडांना विरोध करायला ना स्त्रिया धजावतील ना त्यांच्या घरचे.

आपल्याला आपले मित्रमैत्रिणी इस्लामचाटोइस्ट म्हणतील या भीतीने डोळ्यादेखत चाललेल्या दहशतवादाकडे विवेकी हिंदूही कानाडोळा करतील.

शाळा-विद्यापीठांत ज्ञानाचा बोजवारा उडत असतानाही आपल्याला नापास करतील या भीतीने तरुण विद्यार्थी खालमुंडी रहातील...

धैर्याविना स्त्रीपुरुष दोघेही देशात आणि जगात विनाश ओढवून घेतील.

म्हणूनच धैर्य दाखवून धर्मवेडातून होणाऱ्या अन्यायाच्या डोळयाला डोळा भिडवून सामोरे जाण्याचे बळ आपल्याला मिळो, यासाठी सर्व विवेकी भारतीय स्त्रीपुरुषांना सदिच्छा.

देशात अंधाराच्या अंताची सुरुवात झाली आहे- तो अंत व्हावा.

***

# भारतीय स्त्रीची कदान्नदशा...

स्त्री... अन्नपूर्णादेवी वगैरे... ती इतरांची भूक आधी सांभाळते, सर्वांना पोटभर, चवीचं खाऊ घालणे हे तिचे परम कर्तव्य वगैरे सगळं पाठ आहे आपल्याला. जवळपास शंभर टक्के भारतीय स्त्रिया या संस्कारात मुरून स्थितीप्रिय झालेल्या असतात. यात सहज प्रवृत्तीपेक्षा शतकानुशतकांचे मुरवलेले भूमिकांसंबंधीचे संस्कारच अधिक काम करत असतात. तथाकथित श्रम विभागणीत पुरुषाने अन्न शिकार करून आणणे- त्यासाठी शस्त्रे तयार करणे, इतरांच्या जमिनींवर आक्रमण करून अन्नप्राप्तीची शक्यता वाढवणे या गोष्टी सुरुवातीला होत्या. आणि गोळा करण्यासारखे अन्न म्हणजे रानावनातील कंद, फळे, पाने, मध, अळंबी वगैरे गोळा करण्याचे काम स्त्रियांकडे होते. मिळवलेले अन्न टिकवणे, शिजवणे यासाठीही स्त्रियाच पुढे झाल्या.

मानववंश टिकण्यासाठी, प्रगत होण्यासाठी ही श्रमविभागणी काही हजार वर्षांपासून ते गेल्या दोन हजार वर्षांपर्यंत उपयुक्त ठरली असे कदाचित् म्हणता येईल. तसे करण्यात मानवाच्या समाजबांधणीतील नियमांचे स्थान सुरुवातीला जरा सैल होते, ते नंतर दृढावत गेले. संघटित धर्मांच्या आस्थापना ते अधिक जाचक करत राहिल्या- हा विषय आणखी वेगळा आणि वेगळ्या स्थानी लिहिण्याचा.

शतकानुशतके नव्हे सहस्रकानुसहस्रके ज्या गोष्टी जीव करत रहातात त्याचा परिणाम त्यांच्या अनुवांशिक स्मृतींवरही होतो असे एथॉलजीमध्ये (प्राणीवर्तनशास्त्र) बहुतांशी सिद्ध झाले आहे. जगात टिकून रहाण्यासाठी ज्या क्रिया उपयुक्त असतात, यशस्वी ठरतात त्यांची छाप सजिवांच्या जैविक घटनेवर रहाते. अमुक जीव अमुक प्रकारेच का वागतात यामागील कारणे बहुधा या प्रकारातील असतात. वातावरणात, पर्यावरणात अचानक काही बदल झाले तर असे वर्तन कदाचित् त्या जिवांना उपयुक्त न ठरता मारकही ठरू शकते (याचे चपखल उदाहरण म्हणजे पतंगांचे ज्योतीवर उडी घेऊन जळून जाणे. रात्रीच्या वेळी चंद्राच्या दिशेने प्रवास करण्याचे अनुवांशिक जैविक वळण चंद्राची जागा दिव्यांनी, ज्योतीने घेतल्यानंतर पतंगांच्या प्रवासाला दिशा न मिळता त्यांचा जीव जातो).

मुद्दा असा, की काही हजार वर्षांपूर्वी जी भूमिका मानववंश टिकून रहाण्यासाठी उपयुक्त ठरली ती भूमिका आता कदाचित् एकमेव उपयुक्त राहिलेली नाही. तरीही तिला चिकटून राहिल्यास मरण ओढवू शकते किंवा मरणप्राय परिस्थिती ओढवू शकते. केवळ भौतिकदृष्ट्या नव्हे तर बौद्धिक, मानसिकदृष्ट्याही असे होऊ शकते.

आज आपण अन्न आणि स्त्री या विषयावर विचार करताना ही वैज्ञानिक सैद्धांतिक मांडणी लक्षात ठेवायला हवी.

अन्न आणि स्त्री या दोघांचा अन्न शिजवण्या-वाढण्या-पुरवण्याचा संबंध गहिरा आहे, जुना आहेच. अनेकदा विसरले हे जाते की अन्नाचा आणि स्त्रीच्या देहाचाही संबंध आहे. अर्थातच उत्क्रांतीतून आलेल्या आनुवंशिक जैविक सवयींतून बाहेर

पडलेल्या स्त्रियाही आहेतच. पण त्यांच्या तुलनेत त्याच सवयीत अडकून पडलेल्या स्त्रियांची संख्या खूपच जास्त आहे.

भारतात स्त्रियांच्या अन्नदशेशी गहिरा संबंध आहे तो धार्मिक संस्कारांच्या संस्कृतीचा. अन्नावरच्या अनेक प्रक्रियांसकट शिजवण्याची मुख्य प्रक्रिया पार पाडणे हे स्त्रियांचे कामच नव्हे तर कर्तव्य ठरले. आणि ते पार पाडतापाडता स्त्रीला विनाकारण त्यागमूर्ती ठरवून, तीच चौकट तिला गारद करत गेली. या त्यागमूर्तीने नवऱ्याला, नवऱ्याच्या घरातल्यांना, मुलाबाळांना प्रथम द्यायचे आणि मग स्वतः खायचे या नियमांच्या जोडीला स्वतःच्या पोटाची फिकीर करायची नाही, जेमतेम जेवायचे, स्वतःसाठी चांगले काही राखून ठेवायचे नाही, चांगल्यात चांगले आधी इतरांना द्यायचे हे फडतूस दिव्य संस्कार स्वतःला पटवत गेलेल्या स्त्रिया पाप्याची पितरं होऊन जगायला लागल्या. किंवा फोफशा तरी होत गेल्या... बाळंतपणे झाल्यानंतर अशक्त झालेल्या माता अंगावर दूध पाजताना केवळ पहिला महिना सव्वामहिना जरा कौतुकाच्या रहात- तेही झालेले मूल मुलगा असेल तर. नाहीतर मग बाईच्या खाण्याची वज कोण राखतो?

धार्मिक संस्कारांच्या आणखी एका अध्यायात स्त्रियांनी मांसाहारी जेवण्यावरही निर्बंध आले. सुसंस्कारित स्त्री म्हणजे शाकाहारी असणे, तिने मांसाहार कमी करणे- खरेतर एकंदरच आहार कमी घेणे या गोष्टी गृहीतच धरल्या जातात.

मानवी शरीराला उत्तम प्रथिनांची गरज असते. आणि उत्तम प्रथिने ही प्रायः प्राणिज असतात. स्निग्ध पदार्थांतील सर्वोत्तम स्निग्धांश हे प्राणिज असतात. भारतात एकंदरीत मांसाहाराबद्दल अलिकडच्या हजार वर्षांत झालेल्या बौद्धिक गोंधळानंतर

अनेक चुकीचे समज पसरले. आणि त्याची परिणती मांसाहार कमी होण्यात झाली. या परिणाम थेट भारतीय वंशाच्या लोकांची उंची, स्नायू (आणि बुद्धीही) कमी कमी होण्यात दिसतो आहे.

पण विशेषत्वाने वाईट परिणाम सातत्याने दिसून येतात ते स्त्रियांच्या आरोग्यावर.

आपण काही ठोस उदाहरणे पाहू.

पुरुषांना स्त्रियांपेक्षा अधिक भूक असते आणि अधिक सकस आहार द्यावा लागतो, कारण त्यांना बाहेर वावरायचे असते, शारीरिक कष्टाची कामे असतात हे गृहीतक पूर्वी होते. ते परिस्थिती बदलल्यानंतरही सुरू राहिले. घराघरांमध्ये मुलांना दूध देणे आणि मुलींना चहा पाजणे हे अजूनही गरीब परिस्थितीतल्या आणि शैक्षणिकदृष्ट्या मागास वर्गांच्या कुटुंबांत दिसत असते. सासरी चहा तरी मिळेल की नाही माहीत नाही... दूध कोण देणार तुला- घे सवय करून. बाईने भागवायचं असतं हा संस्कार गेल्या किती पिढ्यांपासून आपल्या स्त्रियांवर होत आला आहे.

आम्ही अनेक गावांमध्ये अन्न आणि पोषक आहार या विषयावर शिबिरे घेतली. त्यातील शेतकरी-कामकरी समाजात घेतलेल्या शिबिरांत हेच दिसून आले की पोषक आहार सोडा- वेळेला आहार घ्या हेच सांगावं लागत असे. समोर बसलेल्या पन्नास बायकांतील दोघीतिघी धडधाकट दिसत. बाकी सगळ्या स्पष्ट पंडुरोगी-ऍनिमियाग्रस्त.

सकाळी उठल्यावर काय खाता- याचं उत्तर चहा घेतो हेच असे. त्या चहाबरोबर काहीतरी खा- आदल्या रात्रीची शिळी चपाती-भाकरी काहीतरी पोटात ढकला हे सांगावं लागे. नाहीतर भरपूर गूळ नाहीतर साखर घातलेला मिट्ट गोड चहा हेच त्यांचं ऊर्जा टिकवण्याचं एकमेव साधन असे.

बायांना वाटतं की त्यांनी पुरेसं न खाणं हेच योग्य. एक निरोगी बाई अख्ख्या घराचा त्रास वाचवते हे समजत नाही. रांधलेल्या गोडाधोडातलं जेमतेम खायचं आणि महागामोलाचं मासेमटण असेल तर त्याच्या फक्त रश्शाला लावून चपातीभाकरी खायची आणि पोरांसाठी राखून ठेवायचं हा वेडेपणा त्यांना त्याग वाटतो. पण अशा प्रकारे केलेली हेळसांड नंतर त्यांना आणि अख्ख्या कुटुंबाला महागात पडते हे समजत नाही.

निर्धन घरांपासून सधन घरांपर्यंत सगळीकडच्या बायका स्वतःसाठी उत्तम भाग कधीच घेत नाहीत. माशाचं डोकंच खातील, पोटाकडचीच तुकडी घेणार, कोंबडी-मटणातले हाडाचेच तुकडे स्वतःसाठी ठेवतील... डाळीचं पाणी घेतील- घट्ट डाळ इतरांच्या ताटात घालतील- नाहीतर मला नं इच्छाच नाही म्हणत चटणीलोणच्याशी खातील. हे असे करणे जुन्या (फडतूस) त्यागाच्या कल्पनेत बसत असेल. पण त्याचे दीर्घकालीन दुष्परिणाम पाहाता ते एकंदर सर्वांनाच महागात पडते हे समजून घेतले पाहिजे.

डाळी, उसळी, या दुय्यम प्रतीच्या प्रथिनांसोबत उत्तम प्रतीची प्राणिज प्रथिने म्हणजे दूध, दही, अंडी, मांस, मासे, सुके मासे या गोष्टी पोटात गेल्या पाहिजेत.

सकाळी केवळ भाकरी- पोहे-उपमा- चपाती अशा कार्बोहायड्रेट्सयुक्त गोष्टींनी भूक भागवावी लागत असेल तरी ती उत्तम न्याहारी नव्हे. कांदेपोहे, बटाटेपोहे, उपमा वगैरे करण्यासाठी कितीही यातायात नि कष्ट करावे लागले असले तरीही एक साधे उकडलेले अंडे, किंवा त्याची पोळी ही न्याहारी अधिक उपयोगाची असते. आमची एक परदेशी मैत्रीण म्हणते, इंडियन्स फार जास्त कार्ब्स खातात. पोह्यात बटाटे, बटाट्याची भाजी चपाती, सगळंच कार्ब्स वर कार्ब्स. यात प्रथिने कुठे आहेत? कितीही चवदार बटाटा असला तरी त्यातून जे मिळते ते तेवढेच रहाते.

अन्नशुचितेच्या कल्पना ब्राह्मणी वर्चस्ववादातून किंवा आपल्या वर्णोन्नतीच्या प्रवासाच्या ध्यासातून नको इतक्या रुजल्या आहेत. न पेक्षा गायीच्या मांसासारखा उत्तम, आणि स्वस्त प्रथिनांचा पर्याय आपण असा वाया घालवला नसता.

प्राचीन काळात ऋषिमुनींच्या आश्रमांत आतिथ्य करायचे तर गोवत्साचे मांस अतिथीला किंवा निमंत्रिताला देण्याची सर्रास पद्धत होती. पण स्वतःच्या विनाशा कडे वाटचाल करणाऱ्या काही प्राणी प्रजातींप्रमाणेच भारतीयांनी शाकाहाराचे स्तोम वाढवून मांसाहार टाळायला सुरुवात केली आहे. याला सर्वप्रथम बळी पडत आहेत त्या स्त्रिया.

धर्माधिकारी, समर्थ, बापू, गुरुदेव वगैरे स्वामी मंडळी शाकाहाराचा सल्ला त्यांच्या बैठकांतून देतात. घराबाहेर पडायची आणि एक प्रकारे काहीतरी समाजजीवन मिळवण्याची संधी म्हणून असल्या बैठकांना स्त्रिया फार मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावतात. मग मांसाहार करणे म्हणजे डेड बॉड्या खाणे वगैरे

सारखे भयाण वाक्प्रयोग रूढ करून पोराबाळांनाही मांसाहारापासून परावृत्त केले जात आहे.

आधीच मर्कट तशात मद्य प्याला या पंक्तींप्रमाणे- या देशातील स्त्रियांचे जीवन आणि आरोग्य आधीच विविध सामाजिक समजांमुळे धोक्यात असते. नर बालक व्हावे म्हणून जीव मेटाकुटीला येई तो बाळंत होत रहाणे वा शक्य तर मुलींचे गर्भ पाडून पुन्हापुन्हा फॅक्टरी सुरू ठेवणे, मग आबाळ, मग कुपोषण या चक्रात बायका सापडून त्यांची चिपाडं किंवा फुगे झालेलेच असतात. त्यात या बाबामहाराजांचे सल्ले, घरच्यादारच्यांचा दबाव... सारेच शोकात्म आहे.

आपण स्त्रियांशी बोलत असलो तर त्यांना वेळेवर पोटभर खा, मांसाहारही करा हे त्यांना सतत सांगून मनावर ठसवणे आवश्यक आहे.

***

# कुंकवाची उठाठेव! पॅंटची उठाठेव!!

संस्कृतीरक्षक दांभिक नेहमीच काही ना काही मनोरंजन करत असतात किंवा मग दंगलरंजन करत असतात हा आजच्या कालखंडाचा एवंगुणविशेष झाला आहे. शबरीमलातील प्रवेशाचे रक्तरंजित प्रहसन झाले, अजूनही सुरूच आहे. हे २०१८चे स्त्रियांबाबतच्या भारतीय परंपरा-प्रवाहपतितांच्या भूमिकेचे लांच्छन जगभर दिसले.

२०१९ची सुरुवात होताना, जानेवारी महिन्यातही हेच लज्जास्पद दर्शन सुरू राहील असे दिसते आहे. चार दिवसांपूर्वी तीन दशकांपूर्वीची एक नटी मौशुमी चतर्जी भाजपमध्ये धूमधाम के साथ प्रवेशकर्ती झाली. विचारांचा संबंध नसला की चकचकाटीचा आधार घेतला जातो किंवा सनसनाटीचा किंवा मग दंग्याचा हे सत्ताधारी पक्षाचे विशेष झालेच आहे. मौशुमी चतर्जींचा पक्षप्रवेश हा त्याच खात्यात जमा. या स्तंभात त्यांचा उल्लेख करण्याचे कारण इतकेच की त्या मंचावरून कार्यक्रमाचे सूत्रसंचालन करणाऱ्या तरुणीवर तिने पॅंट घातली म्हणून डाफरल्या. तू साडी किंवा पंजाबी ड्रेस घालायला हवास असा सल्लाही देत्या झाल्या. हवेशीर तिसऱ्या मजल्यात असे सारे घडणार यात काही नवल नाही. पण या निमित्ताने आपल्यातल्या आपल्यातल्या बौद्धिक त्रुटी तपासायची संधी आहे.

स्त्रियांच्या बाबतीत संस्कृती जपणे म्हणजे भारतात-

ती सणवार करते का,

देवधर्म-कुळाचार पार पाडते का,

साडी नेसून, (वेळप्रसंगीतरी) डोईवरून पदर घेते का,

(पॅंटशर्ट वगैरे घालत नाही नं?)

कुंकू लावते का,

लग्न झालं असेल तर मंगळसूत्र घालते का,

नवरा मेल्यास कुंकू पुसते का, मंगळसूत्र काढते का,

नोकरीबिकरी शिक्षणबिक्षण ठीक आहे- ते तर करावंच लागतं आताशा- पण ते सारं करून घरच्यांचं नीट करते का- या प्रश्नांच्या भोवतीच स्त्रियांची सांस्कृतिक जपणूक गिरमिटत असते.

एक प्रसंग आठवतो. दूरदर्शन सुरू झालं त्या पहिल्या दुसऱ्या दशकात म्हणजे सत्तर आणि ऐंशीच्या दशकात दूरदर्शनवर दिसणाऱ्या वृत्तनिवेदिका त्यांचे दिसणे, त्यांच्या साड्या, त्यांचे दागिने हे बायकांच्या निरीक्षणाचे विषय होते. आज शेकडो मालिकातल्या नटनट्यांचे अनुकरण किंवा त्यांच्या कपड्यालत्त्यांवर चर्चा होते- ती चर्चा तेव्हा या पाचसहा वृत्तनिवेदकांपुरती मर्यादित असे. एक प्रौढा तेव्हा भाजी निवडतानिवडता मला फणकारत म्हणालेली- या बातम्या वाचणाऱ्या पोरी गळ्यात वेगवेगळे दागिने घालतात पण मंगळसूत्र नाही घालत. त्यांची लग्न झालीत की नाहीत की काय काही कळायला मार्ग नाही. मी खुदखुदत फटकारलेलं- का तुम्हाला स्थळ घेऊन जायचंय, त्यांचं लग्न झालंय की नाही कळून तुम्हाला काय फरक पडतो. बाई नरमल्या, पण म्हणाल्या आपल्यात पद्धत आहे, ती पाळायला हवीच. मी

म्हटलेलं असो असो... पद्धती पाळूनही कुलंगडी करता येतात आणि पद्धती भिरकावूनही माणसं स्वच्छ राहू शकतात. आपण दुसऱ्याच्या कुंकवाचीही उठाठेव करू नये आणि मंगळसूत्राचीही.

पेहराव, अलंकार, परंपरा पालन यापुरतेच स्त्रियांच्या सन्मानाचा परिघ आवळत नेणाऱ्या समाज घटकांना आपण स्त्रियांनी जाणीवपूर्वक भिरकावून दिले पाहिजे. गंमत म्हणून, आवड म्हणून नटणेमुरडणे वेगळे आणि एका साच्यात बसण्यासाठी हे सारे करणे वेगळे.

मंगळसूत्र हा विषय तर स्त्रियांनी खास लक्ष द्यावे असाच आहे. अनेक विवाहांत मंगळसूत्राचे प्रस्थ एवढे वाढते की नाते तकलादू आणि मंगळसूत्र चोख एवढेच त्यात उरते. ते सोन्याचे हवे- होऊंदेखर्च. ते इतकेच लांब हवे- होऊंदेखर्च. नवराबायकोंच्या नात्यात फोलपट उरलं असलं तरीही स्त्रिया त्या मंगळसूत्राभोवती वेड्या होऊन गरगरतात. मंगळसूत्र फेस्टिवल वगैरेंच्या भरमसाठ जाहिरातींना भुलून परंपरा साजरी करण्याचा सोस केवढा मोठा असतो.

जगात मंगळसूत्रांविना प्रेम सांभाळणारी जितकी जोडपी आहेत त्यांच्या कैक पटींनी जास्त प्रेमाचा लवलेश उरलेला नसताना मंगळसूत्रांचे ओझे सांभाळणारी जोडपी असतील.

हेच थोड्याफार फरकाने संस्कृतीच्या इतर अनेक फोलकट दृश्य प्रतीकांबद्दल म्हणता येईल. जीन्स, टीशर्ट घालून भारतीय संस्कृतीच्या अवशेषांच्या जतनावर काम करणाऱ्या स्त्रिया शेकडो आहेत, जीन्सपॅन्ट टीशर्ट घालून भारतीय समाजात

उपयुक्त काम करणाऱ्या, अभ्यास करणाऱ्या स्त्रिया हजारो आहेत आणि त्या या साडीवाल्या मौशुम्यांपेक्षा अधिक संस्कृतीप्रेमी आहेत, अधिक देशभक्त आहेत.

मौशुमीसारखेच संस्कृतीचे मुलामे गुंडाळलेल्यांत स्त्रीपुरुष सगळेच आहेत. प्रियंका गांधी या सत्तेचाळीस वर्षांच्या स्त्रीने गेल्याच आठवड्यात राजकारणात प्रवेश केला. तिच्या प्रसन्न व्यक्तिमत्वाचा प्रभाव भारतीय जनमानसावर पडेल याची खात्री जशी कॉन्ग्रेसींना आहे तशीच विरोधकांनाही आहे. त्यात भीतीतून विरोधकांमधून तिच्यावर चिखल उडवायला सुरुवात झाली. (प्रियंका गांधी साडी नेसते बरं... तरीही.) तिला बारबाला म्हणण्यापासून ते तिच्या सेवेसाठी कुठला स्वामी सोडावा वगैरे गलिच्छ बोलून या देशप्रेमी सू-संस्कृत भारतीयांनी आपली नैतिक पातळी दाखवून दिली. आधी इंदिरा गांधींना विधवेच्या हाती देश गेला म्हणणाऱ्यांचेच वैचारिक आत्मज सोनिया गांधींना विधवेच्या खात्यात सगळे पैसे वगैरे ख्याख्या करून सार्वजनिक मंचावरून बोलत होते. आता प्रियंका गांधींना तिच्या नवऱ्यावरून ताडन सुरू आहे. ती स्वतःचे नाव प्रियंका गांधी लावत असतानाही तिला प्रियंका वड्रा म्हणून संबोधणारे याच जातकुळीतले. एकंदर या पोकळ देशभक्तांना, संस्कृतीप्रेमींना कर्त्या स्त्रीचे स्वतंत्र अस्तित्व मान्यच होत नाही.

अनेक स्त्रिया मला माहीत आहेत- त्यांना मंगळसूत्र घालण्याचे, कुंकू लावण्याचे अजिबात प्रेम नसते. पण केवळ वाद नको, कुणी घालूनपाडून गलिच्छ बोलायला नको, कुणी गृहीत धरू नये म्हणून त्या या गोष्टी घालतात.

घरकाम करणाऱ्या ओळखीच्या स्त्रियांना नवऱ्याने टाकलेले आहे, टाकलेले नसतानाही रोजची मारहाण गेली अनेक वर्षे सोसून मगच त्यांचा जीव मोकळा झाला आहे- त्या स्त्रियाही मंगळसूत्र टाकत नाहीत. टिकली लावायची सोडत नाहीत.

त्या टिकलीचीही मोठीच गंमत आहे. कपाळ भकास दिसतं म्हणून म्हणे टिकली... विषय एवढाच असतो की डोळ्यांना सवय झालेली असते, ती काही काळाने वेगळी सवयही होऊ शकते.

एक विनोदी किस्सा- घरकामावरच्या एक बाई एक दिवस मोकळ्या कपाळाने आल्या. त्यांना मालकिणीने विचारलं, काय हो, टिकली पडली वाटतं. त्या बाई उत्तरल्या- पडली नाही. बेवड्याने(नवऱ्याने) पैसे मागितले आणि नाहीत म्हटल्यावर शिव्या देऊ लागला. तेव्हा त्याच्या हातात ठेवली टिकली. म्हटलं- चार आण्याच्या टिकलीसाठी तुझा हजाराचा त्रास- नकोच मला. सोडला त्याला. टिकलीपण सोडली. टिकली काय- टिकली तर टिकली.

आणखी एक गंमत. एका अतिशय बुरसट नवरोबा आपल्या बायकोला सांगत- टिकली नाही हं लावायची. कुंकूच पाहिजे. पिंजर. तीच खरी. टिकली काय काढली की संपलं. ते कुंकू ओघळून नाकावर येई घामाने. पण आपली बायको बावळट दिसली तर बरंच असा हिशेब.

नवरा जिवंत असलेली (स्पेशल ) स्त्री घरातून निघताना हळदकुंकू लावण्याची निरर्थक पद्धत अजूनही अनेक घरांतून फार सोज्वळपणे पाळली जाते. मी तरी ते थेट नाकारते. माझ्या कपाळावर नाकावर रंगांचा शिडकावा मला चालत नाही. फार राग

येतो लोकांना. मग हे हळदकुंकू लावताना शुभेच्छा देणे जे अध्याहृत आहे ते पार विसरले जाते. आणि मला मनातल्या मनात दूषणे दिली जातात. पण कुणाच्याही दूषणांनी आणि शुभेच्छांनाही वास्तवात काहीही फरक पडत नाही हे एक फार बरे असते.

एकंदर काय, आपल्या म्हणून समजल्या गेलेल्या या सांस्कृतिक प्रतीकांचा आणि नैतिकतेचा काहीही संबंध राहिलेला नाही. त्यांची फोलपटेच झाली आहेत. त्या प्रतीकांची जागा सांस्कृतिक इतिहासाच्या पुस्तकात आहे- अंगाखांद्यावर, पैसा खर्च करून अजिबातच नाही.

स्त्रियांनी सुटसुटीत कपडे घालून मोकळेपणाने वावरावे, दागिने कमीत कमी घालावेत, दुसऱ्याच्या कुंकवांची, मंगळसूत्रांची आणि पॅन्टची उठाठेव करू नये. कणखर, नैतिक आणि स्वत्व असलेल्या स्त्रीचे तेच अलंकार ठरतील. डोक्याच्या आत काहीही नसेल कपाळावर लावा टिळे. आणि गळयातून उमटणाऱ्या शब्दांत धैर्य नसेल तर बांधा लोढणी खुशाल.

बाकीच्यांनी हे लोढणे नि टिळे खुशाल भिरकावून द्यावेत.

मोकळंच वाटेल.

***

# मानवजन्मदात्या योनीचा अवमान- नेहमीचीच गोष्ट

२०१६ सालचा जानेवारी महिना जगभरच्या स्वतंत्र वृत्तीच्या स्त्रियांमध्ये गाजवला होता अश्ली ज्यूडने नीना डोनोवॅनची कविता अमेरिकेतल्या रॅली मध्ये कविता म्हणून. स्त्रियांच्या योनीला तुच्छ लेखत ग्रॅब देम बाय पुसीज् म्हणणाऱ्या ट्रम्पचा निषेध अमेरिकेच्या रस्त्यांवर धुंवाधार कोसळला होता. आम्ही स्त्रिया हे असलं आता ऐकून घेणार नाही, सहन करणार नाही, काटेरी उत्तर देऊ असा जबरदस्त आवाज उठवला होता देशोदेशीच्या स्त्रियांनी.

पण हे स्वातंत्र्याचे, सत्याचे उद्गार अखेर काही सीमित कप्प्यांमध्येच उमटतात. दूरवर त्यांचे प्रतिध्वनीही उमटतात की नाही कोण जाणे.

आमच्या देशात या जानेवारी महिन्यात जे रणकंदन उसळले त्याचे दोन्ही पक्ष स्त्रीद्वेष्टेच म्हणायचे. ‘पद्मावती’ या विषयावर कोट्यवधी रुपये घालून नाचगाणी टाकून खपाऊ चित्रपट काढणारा संजय लीला भन्साळी एका बाजूला आणि दुसऱ्या बाजूला पद्मावती ही आमची माता आहे म्हणून तिचे अमुकतमुकढमुक प्रकारे चित्रण होऊ नये असे चित्रपट न पाहाताच आग खाणारी राजपूत पुरुषांची झुंड. संजय लीला भन्सालीच्या जोडीला एक गरीब बिचारी धमक्या मिळणारी स्त्री- दीपिका पदुकोण... आणि झुंडीच्या जोडीला बिनतक्रार पुरुषी वर्चस्व सहन करणाऱ्याच नव्हे तर त्या वर्चस्वाचे जीव जाईस्तोवर उदात्तीकरण करणाऱ्या गरीब बिचाऱ्या स्त्रियाही होत्या.

दीपिका सिद्धीविनायकाला साकडं घालत होती आणि राजपूत झुंडीच्या स्त्रिया जोहारासाठी नावनोंदणी करीत होत्या. सगळीच शोबाजी, सगळाच मद्दडपणा.

स्वरा भास्कर या अभिनेत्रीने संजय लीला भन्सालीच्या ‘पद्मावती उणे आय’ चा जबरदस्त समाचार घेतला आहे. चित्रपट काढण्याचे, दाखवण्याचे त्याचे स्वातंत्र्य अबाधित राहो असे स्पष्ट करतानाच तिने पद्मावतीच्या निर्मितीवर कोरडे ओढले आहेत. अँश्ली ज्यूडचा जसा संतप्त आवाज तिथे उमटला तसा आमच्याकडे स्वरा भास्करचा उमटला.

ती भन्सालीला म्हणतेय, तुझा हा चित्रपट पाहून अखेरीस मला वाटलं की माझं संपूर्ण अस्तित्व माझ्या योनीपुरतंच सीमित झालं...

या काळात- जिथे विवेकाची मूल्येच फक्त मानवी जीवन सुखकर करायला उपयोगी येणार आहेत, तिथे युद्धात पुरुषांची हार झाली तर आधीच योनीशुचितेची तरतूद म्हणून जाळून घेऊन जीव द्यायचा अविवेकी, कालबाह्य पर्याय झगमग उदात्तीकरण करून पडद्यावर आणणे हा नादानपणाच आहे.

मागास मूल्यांकडे संस्कृतीच्या नावाखाली वाटचाल हा आजघडीच्या भारतीय सत्ताधुरिणांचा गेमप्लॅन आहे. आणि या वाटचालीचा आधार घेऊन जशा बकवास पौराणिक मालिका चालवल्या जातात, बाबाबुवांची कडेकोट दुकाने चालवली जातात तसाच इतिहासातील संदर्भांचे टेकू घेऊन अनैतिहासिक दंतकथांवर अधिकच बकवास चित्रपट निर्माण होऊ लागले तर नवल नाही. बाहूबलीने करोडो ओढले- आपणही ओढू. त्या बाहुबलीत निदान सतीबिती घालवून बायकांचे

शरणत्व दाखवले नव्हते. स्वरा भास्कर म्हणते त्याप्रमाणे पद्मावतीच्या शेवटच्या जोहाराला मंत्रोच्चारासारखे गंभीर संगीत देऊन जे काही उदात्तीकरण केले त्याने करणीसेना पुढेमागे खुष होणार आहे. आणि स्त्रियांच्या योनीशुचितेला उगाच नव्याने भाव येणार आहे- निदान काही कप्प्यांतून तरी. नवऱ्याच्या निधनानंतर बायकोला काहीही कामजीवन असू नये यासाठी आधीच भारतीय समाजात अनेक जाचक बंधने टिकून आहेत. त्यांना नवा केशरी रंग चढवला गेला नाही तर नवल.

याच राजपुतांच्या प्रदेशात गेल्या एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर असताना रूपकुंवरला जाळून मारण्यात आले आणि सतीमाँ म्हणून तिचे मंदीर उभारून धंदाही सुरू झाला. अशी सती मंदिरे ही शोक प्रकट करण्याची, आपल्या घृणास्पद परंपरांना तिलांजली देण्याची ठिकाणे बनायला हवी होती. पण होते आहे उलटेच. तिथे जाऊन स्त्रियांना डोके टेकावे लागते... तूही तुझ्या नवऱ्याच्या पलिकडे तुझ्या जिवाचा विचार करायचा नाही असेच अप्रत्यक्षपणे बिंबवले जाते.

योनीशुचितेचा बडिवार आजही माजवला जातो.

कंजारभाट समाजातल्या इंद्रेकर दांपत्याने काही वर्षांपूर्वी कौमार्य-तपासणीला नकार दिला होता. आजही कंजारभाट समाजात नवपरिणित दांपत्याच्या पहिल्या रात्रीवर समाज लक्ष ठेवतो. चादरीवर हायमेन फाटल्यानंतरचे रक्त दिसले नाही तर छळ होतो. आणि मुख्य म्हणजे खाजगीपणा उद्ध्वस्त केला जातो. आजही नीलेश कळस्कर आणि त्याची नियोजित वधू यांनी या प्रथेला विरोध करून संघर्ष उभारला आहे. आणि त्यामुळे त्यांना त्यांच्या समाजाकडून धाकदपटशा होतोच आहे.

मूल झाले नाही तर स्त्रियांनाच दोष देण्याचे प्रमाण अजूनही या देशात महाभयंकर आहे. हिंदू धर्मांतील अनेक समाजांत अजूनही घुंघटची सक्ती असते. मनाप्रमाणे वागले नाही तर सुनेचा शारीरिक छळ करण्यात पुत्रवंत कुटुंबियांचा अधिकार मान्यच केला जातो. पोरीची योनीशुचिता सांभाळण्याचे दडपण येणार म्हणूनही मुलगी नको असते. आणि तिच्या योनीचा वापर करणारा कुणी नवरदेव विकत घेणे परवडणार नाही म्हणूनही मुलगी नको असते... अनेक प्रांतांत. तथाकथित जन्मजात शूरवीरांच्या समाजांत नि प्रदेशांत तर फारच.

अशा विविध पातळ्यांवरचा मागासपणा या देशात असताना उत्तम प्रतीचे विज्ञानातून जन्मलेले तंत्रज्ञान वापरून चित्रपट जेव्हा असल्या फालतू प्रथांचे उदात्तीकरण करतात तेव्हा खरं म्हणजे तो कायमचा डब्यात घालवण्याची आपली जबाबदारी आहे. पण अर्थात या असल्या फसव्या कलाहीन आणि अकलाहीन प्रयत्नांतीही जग पुढे जायचे थांबणार नाहीच. विवाहाआधी कंडोम वापरणाऱ्या तरुणींची संख्या वाढते आहे अशी ताजी बातमी आहे. स्त्रियांनी घटस्फोट मागण्याचे प्रमाण वाढते आहे. नवऱ्याच्या मृत्यूनंतर स्वतःचे जीवन नीट जगावे, काम करावे असे मानून पुन्हा लग्न करून वसणाऱ्या स्त्रियांची संख्याही वाढते आहे. स्त्रीचे जगणे हे केवळ तिने लग्न केलेल्या पुरुषाच्या आधारेच अर्थपूर्ण आहे हा विचार तसा सांस्कृतिक-केराच्या टोपलीत केव्हाच जाऊ लागला आहे. तो काही वर्षांत पूर्णपणे जाईल. स्त्रीही पुरुषाइतकीच स्वयंसिद्ध, स्वयंपूर्ण आणि स्वतःच्या इच्छेने जोडीदार निवडणारी वा टिकवणारी होणार आहे. मनाविरुद्ध लग्न टिकवून त्यात गुलाम बनून रहाण्याचा काळ आता उतरणीला लागला. पटलं-रुचलं तरच निष्ठा. एकतर्फी निष्ठा

मान्य असणार नाही हे ठणकावून सांगणाऱ्या आम्हा कणखर स्त्रियांचा काळ सुरू झाला आहे. या काळात प्रवेश करायला काहींना वेळ लागेल. अजूनही काही आयुष्ये बरबाद होत रहातील. अजूनही काही कवट्यांआडची बुद्धी, भावना मागास सांस्कृतिक मूल्यांच्या वरवंट्याखाली चेचल्या जात रहातील. पण आता जोहारात योनी सांभाळणाऱ्या विकल स्त्रियांचे देह पडणार नाहीत हे नक्की.

ही कालबाह्य मूल्येच विवेकाच्या अग्नीत जळोत. कालबाह्य विषयांना सजवून चित्रपट काढणारांच्या बुद्धीचा खेद वाटतो. त्याचा राजकीय वापर करणारांचा तिटकारा वाटतो आणि आमच्या मातेचा अपमान वगैरे नाटकं करणारांची कींव वाटते.

शेवटी, कुठल्या नतद्रष्ट विषयावरून आपल्या देशात रणधुमाळी माजते, आणि कुठले सुमार हुतात्मा ठरतात हे पाहाणे क्लेशकारक आहे.

***

# सुहैला अब्दुलअली: निर्भयतेचे दुसरे नाव

१९८०मध्ये सुहैला अब्दुलअली या तरुणीवर मुंबईत एका टोळीने बलात्कार केला. तेव्हा ती फक्त १७ वर्षांची होती. बलात्कारानंतर तिच्या भोवतालच्या समाजाची प्रतिक्रिया, कारवाई करण्यात पोलिसांनी दाखवलेला थंडपणा या साऱ्याने ती बलात्काराइतकीच हादरून गेली. या घटनेनंतर ती अमेरिकेत अभ्यासासाठी गेली आणि बलात्कारानंतर तीन वर्षांनी तिने 'मानुषी' या स्त्रीवादी मासिकात या घटनेवर एक लेख लिहिला. तिने त्यात स्वतःचे नाव लपवले नाही, सत्य पडदानशीन करणारे शब्दही वापरले नाहीत. प्रत्यक्ष बलात्कारानंतरच्या अत्याचारात जिवटपणे जगण्यासाठी कायकाय करावे लागले हे तिने अगदी स्पष्टपणे त्यात लिहिले. स्वतःवर झालेल्या बलात्काराबद्दल उघडपणे, निर्भीडपणे लिहिणारी, बोलणारी ती भारतातील पहिली स्त्री होती.

वयाच्या विसाव्या वर्षी सुहैला आपल्यावर झालेल्या बलात्कारावर जे लिहिते त्यात तिच्या स्त्रीवादी विचारांची स्पष्टता आणि तिचे जगण्यावरील प्रेम ज्या तीव्रतेने व्यक्त होतो त्याला केवळ सलाम.

चेंबूरजवळच्या एका टेकडीवर मित्राबरोबर संध्याकाळी फिरायला गेली असताना चार तरूण हातात विळे घेऊन आले. जिवाची धमकी देऊन त्यांनी तिच्या मित्राला धरून ठेवले, मारहाण केली. आणि या सतरा वर्षांच्या लहान मुलीवर

दहावेळा बलात्कार केला. वर या बलात्कारी तरुणांनी अगदी आज चाळीस वर्षांनंतर संस्कृतीरक्षणाची जी भाषा वापरली जाते तीच वापरून तिला सांगितलं- की असं संध्याकाळी कुणाबरोबर तरी फिरायला येणं चूक असतं. तुला धडा शिकवण्यासाठीच आम्ही हे करतो आहोत. आता शिकशील बरोबर...

जिवानिशी सुटल्यानंतर तिने पोलिसांकडे तक्रार करण्याचा आग्रह धरला. वडिलांना घेऊन ती पोलिस स्टेशनला गेली तेव्हा पोलिसांनी विचारले, इतका वेळ बाहेर काय करत होतीस, एकट्या मुलाबरोबर कशासाठी टेकडीवर गेली होतीस, कपडे कोणते घातले होतेस, बरोबरच्या मुलाच्या अंगावर जखमा कशा नाहीत (पोटावर विळयाचं दांडकं मारल्यामुळे त्याला आंतून रक्तस्राव झाला होता- पण ते दिसत नव्हते)- मग म्हणाले तुला महिला सुधारगृहात सुरक्षित ठेवावं लागेल... शिवाय तू विरोध का केला नाहीस, तुला मजा आली का...हेही प्रश्न आडून आले होते...

अनेक महिलांनी तिला असं सुचवलं की कौमार्यभंग झाला म्हणजे आता जगण्यात काहीही अर्थ राहिला नाही. बलात्कारापेक्षा मृत्यू पत्करला असं तर सार्वत्रिक मत होतं. नंतरची अनेक वर्षे सुहैला साध्या स्पर्शालाही दचकत असे, चालताना मागे पावलं वाजली तरी हादरून जात असे, पुरुषांच्या डोळ्यांत (अनेकदाच) दिसणारी ती नजर पाहिली की तिला जीव नको होत असे... गळ्याभोवती घातलेला स्कार्फ म्हणजे कुणाचे तरी गळा दाबून धरणारे हात आहेत असा भास होत असे.

पण या साऱ्यामुळे पराभूत मनःस्थितीच्या गर्तेत न जाता सुहैलाने जगणं, लढणं हेच परम मानलं. अमेरिकेला गेल्यानंतर बलात्कार या विषयावरच त्यांनी संशोधन सुरू केलं.

सुहैला अब्दुलअली या आता साठीला आल्या आहेत. आणि बलात्काराची मानसिकता या विषयावर संशोधन करतानाच त्यांच्या इंग्रजीतील कांदबऱ्या, बालसाहित्य जगाच्या साहित्यपटावर आहेत.

जेव्हा २०१२मध्ये ज्योती सिंग पांडे या तरुणीवर दिल्लीत अमानुष बलात्कार झाला आणि देशभर या विषयावर चर्चा सुरू झाली तेव्हा सुहैला अब्दुलअली यांचा तो लेख पुन्हा एकदा वर आला. स्वतःची ओळख न लपवता लिहिणारी अजूनही ती एकमेव स्त्री होती. ज्योती सिंग पांडेचे नाव लपवण्याचा खूप आग्रह धरला गेला. तिचे नाव काव्यात्म शैलीत निर्भया ठेवले गेले. अजूनही बलात्कारित, पीडीत स्त्रियांची ओळख लपवण्याचा आग्रह धरला जातो त्यामागे संवेदनशीलता असते खरेच- पण ती संवेदनशीलता पितृसत्ताकवादी धारणांतून आलेली असते.

इंग्रजी न वाचणाऱ्या वाचकांना सुहैला अब्दुलअली यांनी काय लिहून ठेवले आहे हे कधीच कळणार नाही म्हणून आज या विषयावर लिहिते आहे. ऑक्टोबर २०१८मध्ये त्यांचे या विषयावरचे पुस्तक प्रसिद्ध झाले आहे. आणि त्याचे नाव आहे- 'व्हॉट वी टॉक अबाउट व्हेन वी टॉक अबाउट रेप' – आपण बलात्काराबद्दल बोलतो तेव्हा आपण कशाबद्दल बोलतो. जगभरातील बलात्कारित स्त्रियांशी बोलून त्यांच्या आणि स्वतःच्या अनुभवांवर आधारूल लिहिलेले हे पुस्तक आहे. त्यांनी

स्वतः बलात्कारित स्त्रियांना मानसिक आधार देण्यासाठी काम केले आहे तो अनुभवही यात प्रतिबिंबित झाला आहे.

बलात्कारित स्त्रियांना मागासलेल्या, पितृसत्ताकवादी बुरसट संस्कृतीत बुडालेल्या समाजांत तर या पेक्षा मेली असती तर बरं असा अनुभव येतो. कुटुंबातही अशी प्रतिक्रिया अनेकदा उमटत असल्यामुळे त्या स्त्रीलाही तसेच वाटत जाते. अनेक बलात्कारित स्त्रिया आत्महत्या करतात किंवा अपमानित जिणे जगतात. सुहैला अब्दुलअली या परिस्थितीच्या मुळाश जाणारे प्रश्न विचारतात. बलात्काराच्या घटनेसंबंधी समाजातील सर्वसाधारण दृष्टीकोन आणि बलात्कारित स्त्रियांसंबंधी गृहीत धरल्या जाणाऱ्या गोष्टी क्रूर आहेत. आणि त्यामुळे बलात्कार झालेल्या अनेक मुली, स्त्रिया अनेकदा त्यासंबंधी अवाक्षरही काढत नाहीत. गुन्हा लपवून ठेवला जातो.

बलात्कार झाल्यामुळे पीडितेचे जीवन संपूर्ण बदलण्याची गरज आहे का? बलात्कार होणे हे मृत्यूपेक्षाही भयंकर आहे का? बलात्कार झालेल्या स्त्रीला आनंदाने परिपूर्ण जीवन जगता येते की नाही? या अनुभवामुळे दैनंदिन आयुष्य होरपळून निघते का? बलात्कार स्त्रीच्या होकारामुळेच होतो का? स्त्रीच्या नकाराला काही अर्थ असतो का? बलात्कार करण्यात कामवासनेचा संबंध असतो का की नाही? हिंसा आणि वासना यांचे काय नाते आहे? – अशा अनेक प्रश्नांना सुहैला वाचकांना सामोऱ्या जायला लावतात.

गेल्या काही दिवसांतच भारतात, शहरांतून आणि गावांतून निर्घृण बलात्कारांच्या बातम्या आल्या आहेत. तशा त्या नेहमीच येत असतात. पण नगरची

एक मुलगी मुंबईत चारजणांच्या बलात्काराला बळी पडते. घरी येऊन काहीही न सांगता, तक्रार न नोंदवता बसून रहाते, तिचे शरीर कमरेपासून लुळे पडू लागते तेव्हा हॉस्पिटलमधून घरच्यांना कळतं की तिच्यावर सामूहिक बलात्कार झाला होता. त्या वेदना सोसत, ताप सोसत ती मुलगी तशीच गप्प रहाते... आणि मग अखेर गुंतागुंत होऊन मरून जाते.

बिहारमध्ये एका गावात ज्या मुलीवर बलात्कार होतो, तिची आई पंचायतीकडे दाद मागण्यासाठी जाते आणि पंचायतीतले ज्येष्ठ पंच तीच वाईट चालीची म्हणून तिच्यावर बलात्कार झाला म्हणत तिचे डोके भादरून गावात तिचे धिंडवडे काढतात. ती मुलगी पोलिस स्टेशनमध्ये तक्रार नोंदवते तेव्हा तिला कॅमेऱ्यासमोर आणलं म्हणून एक अती हुषार लोकांचं चॅनेल पोलिसांची चंपी करतं.

एका नगरसेवकाच्या बलात्काराच्या प्रयत्नांना हाणून पाडणाऱ्या मायलेकींचं डोकं भादरून गाव त्यांची धिंड काढतं... हे सारं आजही या देशात घडतंय. या देशात बलात्काराच्या घटनेत जात शोधून लाखालाखांच्या मोर्चाचं लाजिरवाणं राजकारण उभं रहातं... आणि याच देशात दलितांच्या पोरीबाळींवर बलात्कार झाला तर ते नेहमीचंच ठरतं आणि जमिनीत जिरून जातं...

या देशातले नेतेच नव्हे तर अगदी सालस, साजुक घरांतली माणसंही बेदरकार निरागसपणे मुली असेतसे कपडे घालतात म्हणून बलात्कार होतात असं सांगतात. म्हणूनच मुलींना घराबाहेर पाठवू नये, जास्त शिकवू नये, स्त्रियांची खरी जागा घरातच आहे वगैरे ज्ञान आता नव्या केशरिया भारतात नव्याने जोर धरू लागलं आहे.

पण एकीकडे मी टू चळवळीत असल्याच सेमीबलात्काराला विरोध करणाऱ्या निर्भय मुलामुलींचीही संख्या वाढते आहे. मैत्रीत, सहकाऱ्यांत सोबतच्या लोकांवर विश्वास टाकताना घेतला जाणारा गैरफायदा आता लपवून ठेवता येत नाही. केवळ सत्तेत आहे म्हणून स्त्रियांना गृहीत धरणाऱ्यांना उघडं पाडलं जात आहे.

हे पुस्तक स्त्री आणि पुरुषांनी जरूर वाचावे. आणि लक्षात ठेवावे कोणतीही स्त्री बलात्कार मागून घेत नसते. तो तिच्यासाठी सर्वात घाणेरडा अनुभव असतो. आणि तो करणारा पुरुष हा लैंगिक सुख ओरबाडण्यासाठीही तो करत असतो आणि आपली सत्ता गाजवण्यासाठीही करत असतो.

बलात्कार झालेल्या स्त्रियांच्या पाठीशी आपण सर्वांनीच उभं राहिलं पाहिजे. आणि भयानक अपघातात सापडलेल्या कुणालाही पुन्हा जीव वसवण्यासाठी जशी मदत मिळते तशीच त्यांनाही मिळाली पाहिजे. पोलीस, न्यायव्यवस्था वगैरे मंडळी बलात्काऱ्यांना शासन करतील की नाही ही शंका नेहमीच असेल. सत्य हा पुरावा होऊ शकत नाही या कुबडीच्या आधाराने अनेक गुन्हेगार सुटत आले आहेत. पुरावा नष्ट करण्याची एक समांतर यंत्रणा न्याययंत्रणेतच असू शकते हेही आपल्याला अनेक उदाहरणांत अनुभवाला आलेले आहे. पण या पलिकडे जाऊन अन्याय भोगलेल्या बलात्कारित स्त्रियांना- कदाचित् बलात्कारित पुरुषांनाही (पुरुष पुरुष बालकांवरही बलात्कार करतात हे समजून घ्या) आपण समजून घेऊन सामान्य, न्याय्य वागणूक दिली पाहिजे एवढे नक्की.

# स्फुल्लिंग धैर्याचे

धैर्य उमलून यायला एखाद्या क्रौर्याची परिसीमा व्हावी लागते. अन्यायाविरुद्ध लढणे श्रीमंत घरांतून आलेल्या स्त्रियांना जरी शक्य असले तरीही श्रीमंत घराण्यातून आलेल्या सर्वच स्त्रियांना असे धैर्य दाखवता येते असे नाही. पण स्थैर्य, शहरात रहाणे, विदेशात शिकणे या गोष्टी नक्कीच धैर्याला पोषक असतात. पण आर्थिक-सामाजिक परिस्थिती फारशी चांगली नसतानाही अत्याचाराचा विरोध करण्याचे धैर्य दाखवणाऱ्या स्त्रियांचे कौतुक वेगळ्या रीतीने करायला हवे.

देशात अलिकडेच म्हणजे २०१९ या वर्षाच्या जून महिन्यात घडलेली तबरेझ अन्सारीच्या लिंचिंगची घटना...

२०१९च्या १७ एप्रिलला शाहीदा आणि तबरेझचा विवाह झाला होता. पुण्यात काम करणारा हा केवळ चोवीस वर्षांचा तरूण कदमदिया या त्याच्या गावी गेला आणि त्याने लग्न केले. काही दिवस गावी राहून दोघे पुण्यात येणार होते. पण तत्पूर्वीच धातकिडिहा गावात चोरीच्या संशयावरून जमावाने त्याला मारहाण केली. तो मुस्लिम आहे हे कळताच त्याला जय श्रीराम जय हनुमान वगैरे जप करायला लावणे आलेच. जखमी तबरेझला ना पोलिसांचे साहाय्य वेळेवर मिळाले, ना वैद्यकीय सेवा. २२ जूनला तबरेझचे प्राण गेले. मारहाणीनंतर तो हृदय बंद पडून मेला म्हणून पोलीस आधी मारणारांवर खुनाचा आरोप ठेवायला राजी नव्हते.

आणि तेव्हाच आपल्या समोर आले एक वेगळे धैर्य- नवविवाहित शाहीदा परवेझचे. शाहीदाने पोलिसांकडे शवविच्छेदनाच्या अहवालाची मागणी केली आहे. त्या वेळी उपस्थित असलेल्या पोलिसांची, सुरुवातीस तबरेझला ज्यांच्या ताब्यात दिले गेले त्या डॉक्टरांची नावे मागितली आहेत. सरकेलियाच्या सर्वात उच्च अधिकाऱ्यांची भेट घेऊन न्याय मिळवण्यासाठी पाठपुरावा सुरू केला आहे. तिच्या प्रयत्नांमुळे जमावातील व्यक्तींवर ३०४ ऐवजी आता ३०२चे कलम लागू करण्यात आले आहे.

या पूर्वी पहलू खानची हत्या जमावाने केली त्या प्रकरणातही पहलू खानची पत्नी ताठ उभी आहे. तिची दोन मुलं जे काही कमवत आहेत ते सारे हा खटला लढवण्यात खर्च करीत आहेत. आणि त्यांची आई राजस्थानच्या बदललेल्या राज्यकर्त्यांकडून न्याय मिळेल अशी आशा करतानाच हायकोर्टापर्यंत लढायची तयारीही दाखवते आहे.

जुनैद खान या कोवळ्या किशोराला गाडीत जमावाने मारले, त्या प्रकरणात अद्यापही गुन्हेगारांना सजा झालेली नाही. आरोपीच्या घरच्यांनी जुनैदच्या कुटुंबियांना मिटवामिटवीसाठी पैसे देण्याची तयारी दाखवली आणि मग जुनैदचे कुटुंबीय पैसे मागत आहेत अशा बातम्या पेरल्या. तरीही ते ताठपणे अजूनही झगडत आहेत. जुनैदची आई सायरा हिचा आक्रोश तुम्ही कदाचित् बातम्यांमध्ये पाहिला असेल. पण आता सायरा ताठपणे नवऱ्याच्या सोबतीने हे आव्हान पेलते आहे. मुलगा गेला पण त्याला न्याय मिळवून देण्याची आकांक्षा जपते आहे.

हे झाले सामाजिक दुहीतून झालेले अत्याचार आणि त्यांचा न्याय करण्यासाठी लोकांनी विशेषतः स्त्रियांनी दाखवलेले धैर्य. पण स्त्रियांना स्वतःवर झालेल्या अत्याचाराची दाद मागण्यासाठी वेगळेच धैर्य दाखवावे लागते.

भाजपचा खासदार असलेला, योगीचा मित्र असलेला, अटलबिहारींच्या केंद्रीय मंत्रीमंडळात असलेला उत्तरप्रदेशचा चिन्मयानंद हा तर सध्याच्या सत्ताधाऱ्यांमधला एक महत्त्वाचा मोहरा. त्याने केलेल्या लैंगिक अत्याचाराबद्दल तक्रार दाखल करणे सोपे नव्हते. पण कायदा शिकणाऱ्या एका विद्यार्थिनीने धैर्य दाखवले आणि त्याच्याविरुद्ध तक्रार केली. भाजपचे लोक हे प्रकरण मिटवण्याच्या मागे आहेत असे कळताच तिने आक्रमक पवित्रा घेतला आणि जोवर त्याला अटक झाली नाही तर आत्मदहन करण्याचा इशारा दिला. सत्तेतील मदांधांशी टक्कर घेताना प्राणांची बाजी लावावी लागते हे लोकशाहीत तरी अश्लाघ्य आहे. पण या तरुणीने ती बाजी लावायची तयारी दाखवली आहे.

या पूर्वी घडलेल्या, जुन्या झालेल्या घटनांतूनही असे धैर्य समोर आले आहे.

आसाराम बापू बलात्कारी आहे हे सांगणे सोपे नव्हते... सोळा वर्षाच्या एका मुलीने- तिचे सारे घरदार आसाराम भक्त असताना आसारामने आपल्यासोबत काय गैरकृत्य केले ते सांगण्याचे धैर्य दाखवले आणि पोलिसांत तक्रार करण्याचे धैर्य तिच्या कुटुंबाने दाखवले. या कुटुंबाला, या मुलीला साथ देणाऱ्या तिघा साक्षीदारांची आसारामच्या भाडोत्री भक्तगुंडांनी हत्या केली.  त्या मुलीची शिक्षिका, शाळेच्या प्राचार्या, त्यांची साथ देणारा पोलीस अधिकारी, तिचे वडील या सर्वांना सतत धमक्या येत राहिल्या. या प्रकरणाचा वृत्तपत्रातून पाठपुरावा करणारा पत्रकार नरेंद्र

यादव याला चाकूने भोसकण्यात आले. तो वाचला, पण दहशत कायम झाली. वडिलांवर खोट्या केसेस टाकण्याचे कामही भक्तांनी केले.अखेर आसारामला तुरुंगात टाकण्यात आले. पण ही मुलगी आणि तिचे कुटुंब लढण्याची किंमत अजूनही मोजत आहेत.

डेरासच्चावाल्या रामरहीमच्या गलिच्छ अपराधांविरुद्ध तोंड उघडणाऱ्या दोन मुलींमुळे डेरा फुटला. या दोघींना तर केवढ्या प्रचंड दबावाला सामोरे जावे लागले. त्यांची नावे अजूनही सार्वजनिक नाहीत. निनावी पत्र लिहिल्यानंतर चार वर्षांनंतर त्या दोघी न्यायालयासमोर जाऊन साक्ष देण्यास राजी झाल्या. जिवाच्या भीतीवर मात करून त्यांनी हे धैर्य दाखवले आणली एक प्रचंड साम्राज्य उलथून पडले.

पण एकंदरीत धैर्याची कमतरता आहेच. संपन्नता असूनही अत्याचारित न्यायाधीशाच्या कुटुंबियांनी माना टाकल्याचेही उदाहरण ढळढळीत समोर आहेच आपल्या...

गप्प बसून रोजच अत्याचार सहन करणाऱ्या स्त्रिया, पुरुष असतातच...

पण आपला जीव केवढा, आपली ताकद किती, आपण ठेचून टाकले जाऊ की काय असल्या भेकड प्रश्नांच्या बेडीत न अडकता स्वत्व जपणारे काहीजणच मानवी मेंदूच्या उत्क्रांतीची साक्ष देतात.

आणि मग सर्वांना न्यायासाठी धैर्य गोळा करण्याचे बळ देणारी एखादी गुलाबी गँगही तयार होते. आज स्त्रियांना बळ देणारी ‘गुलाबी गँग’ ही एक संघटना उत्तर प्रदेशमध्ये आहे. गडद गुलाबी साडी आणि हातात लाठी असा गणवेष असलेली ही

संघटना संपत देवी पाल या स्त्रीने बुंदेलखंडात सुरू केली. आज या संघटनेच्या चार लाख स्त्रिया सदस्य आहेत. आणि आपापल्या परिसरातील अत्याचार सोसणाऱ्या स्त्रियांच्या मदतीला धावून जात आहेत.

उत्तरप्रदेशच्या अकरा जिल्ह्यांत सासरचे लोक, नवरा यांच्या अत्याचाराला बळी पडणाऱ्या स्त्रियांच्या रक्षणासाठी आता स्त्रियाच उभ्या राहिल्या आहेत.

१९८० साली साधी, गृहिणी असलेल्या, कधीही शाळेतही न गेलेल्या संपत देवीने शेजारणीला तिचा नवरा बेदम ठोकून काढताना पाहिले आणि तिने लाठी हातात घेतली. नाठाळ नवऱ्यांच्या माथी काठी हाणण्याची ताकद तिने ओळखली. मग मुली होतात म्हणून मार देणाऱ्या, मुलीचा गर्भ पाडावा म्हणून छळ मांडणाऱ्या, हुंडा आणला नाही म्हणून छळ करणाऱ्या, स्वयंपाक मनासारखा केला नाही म्हणून बुकलून काढणाऱ्या सर्व नवऱ्यांचे आणि सासरच्यांचे थेर थांबवण्यासाठी ही स्त्रीशक्ती कामाला लागली. बलात्कार करून वर पीडीतेलाच तुरुंगात अडकवणाऱ्या बलाढ्य राजकारण्यांच्या विरोधात स्त्रीशक्ती कामाला लागली.

बायकांना जाळून मारून मग त्यांनी आत्महत्या केल्याचे बनाव रचणाऱ्या साऱ्या नराधमांना दहशत बसवणारी गुलाबी गँग ही या देशातील ग्रामीण स्त्रियांनी साध्य केलेले एक अजब आहे. कायदा हातात घेतात म्हणून त्यांच्यावर काही लोक साळसूद टीका करतात. कारण या देशात गाईसाठी कायदा हातात घेणाऱ्या दलालांचा गौरव होतो, बाईसाठी कायदा हातात घेणे म्हणजे संस्कृतीलाच की हो आव्हान!

न्यायव्यवस्थेचा आधार असलेली कायदा आणि सुव्यवस्था राखणारी पोलीस व्यवस्था मुळातच प्रचलित सामाजिक व्यवस्थेची गुलाम असते. संविधानाने दिलेली सुरक्षा स्त्रियांपर्यंतच काय, कुठल्याही दुर्बळ गटापर्यंत पोहोचवण्यात ती स्वऊर्जेने काम करणे कठीणच. अशा या पोकळीत गुलाबी गँगचा हस्तक्षेप हा स्वागतार्ह ठरल्याचे खुद्द पोलीसही कबूल करतात. संवाद, भाषणे, मोर्चे, उपोषणे, धरणे यांच्यासोबतच काठीच्या माराची दहशत या सर्व मार्गांचा वापर या स्त्रिया करतात.

२०१४मध्ये गुलाबी गँग वर त्याच नावाचा तद्दन बाजारू चित्रपट निघाला होता. त्या चित्रपटाची संपत देवी पाल यांनी स्पष्ट शब्दात निंदा केली होती. पण मग याच गुलाबी गँगवर अमाना फॉन्टानेला खान या गार्डियनच्या पत्रकार लेखिकेने ‘द पिंक सारी रेव्हल्यूशन’ हे पुस्तक लिहिले, कर्व्ह थिएटरने ब्रिटनमध्ये नाटक केले आणि निशिता जैन यांनी दिग्दर्शित केलेला एक पुरस्कार विजेता माहितीपट (डॉक्युमेन्टरी) ‘पिंक सारीज्’ नावाने वितरित झाला.

अखेर संपत देवीने धैर्य दाखवले म्हणून ही सुरुवात झाली. आणि स्त्रियांवरील अत्याचारांची राजधानीच मानावी अशा उत्तर प्रदेशमध्ये धैर्यशील स्त्रियांनी परंपरागत अत्याचार आणि शोषणाविरुद्ध झंझावात सुरू केला.

अखेर धैर्याचे स्फुल्लिंगच मनात जागले तरच अत्याचारांना पराभूत करता येते हे इथेच स्पष्ट होते.

***

# दूध मागणाऱ्या भिकारणी...

वसंताची सुरुवात होती... आमच्या घरासमोर गुलाबांची झुडपं शेकडो कळ्यांनी डंवरली होती... जणू शेकडो लालचुटुक पक्षीच त्यावर उतरले होते.

आणि नूर खानच्या दुकानासमोर काही अगदी थकल्या भागल्या बाया गोल करून बसल्या होत्या. त्यातल्या बहुतेकजणी रडत होत्या. बाकीच्या त्यांची समजूत घालत होत्या

---

त्यांना विचारलं काय हवंय तुम्हाला. त्यांचे हुंदक्यांनी भिजलेले आवाज फुटत नव्हते. दोनच शब्द कळत होते. आमची मुलं, आमची तान्हुली...

मी बाबांना बोलवून आणलं. बाबांना मी खेचतच आणलं खाली.

दहाबाराजणी होत्या त्या. सगळ्यांचा रंग पिवळट पडलेला जणू कावीळ झाल्यासारखा. बाबा त्यांच्याशी बोलायला उभे राहिले. पण त्यांचे हंबरडे थांबत नव्हते. बाबांनी नूरला पाणी आणायला लावलं. ते त्यांच्यापुढे धरलं. थोडी टायगर बिस्किटं आणि जुनाटसा ऑरेंज स्क्वाशही देऊ केला.

त्यांचे कृश, निळया शिरांनी तटतटलेले हात चाचरतच पुढे झाले. त्यांनी एखादं बिस्किट घेतलं. पाणी प्यायल्या. साऱ्याच पांढऱ्या पडलेल्या अशक्त बायका.

बाबांनी बसायला सांगितलं. त्यांना पुरुषांसमोर वावरायची सवय नसावी. त्या उभ्याच राहिल्या. खोल गेलेल्या, पाझरणाऱ्या डोळ्यांनी पाहात राहिल्या.

कपड्यांवरून बऱ्या घरच्या असाव्यात असं वाटत होतं. बाबांनी त्यातल्या सगळ्यात लहान मुलीच्या खांद्यावर थोपटलं, "मला सांगा, मी इथला सरपंच आहे. काय झालंय, काय हवंय सांगा. मी शक्य तेवढी मदत करेन. वचन देतो. मुलीसारखी आहेस तू माझ्या. सांग, कुठून आलात तुम्ही. अशी का अवस्था झालीय तुमची? निःशंकपणे मला सांगा. मी नक्की मदत करीन. सांगा मला."

ती टपोऱ्या डोळ्यांची लहानशी स्त्री म्हणाली- "अस्सलाम आलैकुम". तिच्या पाठोपाठ सुकले ओठ विलग करत साऱ्याच म्हणाल्या. बाबांनी वालैकुम म्हटल्यावर ती बोलत राहिली...

"आम्ही खूप दुरून आलो आहोत. तीन महिने कर्फ्यू उठलेला नाही. खायला काहीही उरलेलं नाही घरात..."

पण मग दुसरी तिला थांबवत, हुंदका रोखत म्हणाली- "नाही नाही,  भाईजाना, आमच्यासाठी काही नकोय. आम्ही भागवतो कसंही... पण आमची...", तिला पुन्हा रडू कोसळलं. ती वयाने सर्वात लहान असावी.

पण मग बाकीच्या साऱ्याच एकदमच बोलू लागल्या, "आम्हाला रित्या हाती पाठवू नका, भाईजान.. खूप दुरून आलोत आम्ही."

बाबा गोंधळून गेले होते.

मग तिसरी म्हणाली, ‘आम्ही आमच्या लहान लेकरांसाठी आलो इतक्या दूर...’ तिचे डोळे आसवांनी डबडबले होते.

बलराज सहानीच्या कृष्णधवल चित्रपटाचा न पुसता येणारा परिणाम जसा असतो तसा तो दिवस माझ्यासाठी आहे. त्या स्त्रिया रडत, गागत, हुंदके देत, आक्रोश करत उभ्या होत्या. त्या सगळ्या जणू एकसारख्या दिसत होत्या. रडत होत्या, सुस्कारत होत्या, कधी एकजण सांगत होती, कधी सगळ्या एकदम... तेच तेच सांगत होत्या. भुताटकीचे आवाज यावेत तसे त्यांचे स्वर चिरफाळत होते, दुःखभाराने फाटत होते... त्यांच्याकडे पाहाताना मला आठवत होतं आमच्या काश्मिरी बायका अशा गोलात उभ्या राहून लग्नाची गाणी म्हणतात, जन्माची गाणी म्हणतात, सुगीची गाणी म्हणतात. पाहिलं होतं मी... या दुधाची भीक मागत होत्या... एकमेकींच्या खांद्यांवर हात ठेवून रडत नूर खानच्या दुकानासमोर अर्धवर्तुळात त्यांचे शोकगीत जणू सुरू होते. बायका अशा किंचित मागेपुढे झुलत आनंदाची गाणी गातात, पहिलीची ओळ अर्ध्यावर येताच बाकीच्या ती उचलतात आणि गाणे सुरू रहाते. वानुवुन आणि रौफ अशा दोन शैली असतात उत्सवी गाण्यांच्या... हे काहीसं तसंच होतं. फक्त या बायकांच्या गालांवरून आसवांची धार लागली होती, त्यांच्या मानाही आसवांनी भिजून गेलेल्या, त्यांच्या फेरानचा गळ्याकडचा सारा भाग, छातीपर्यंत भिजून गेलेला... मी जिथे होतो तिथे खिळून राहून पाहात होतो. रडू आवरणं मुश्किल होतं.

नूर खान त्यांच्यासाठी आणलेला पाण्याचा जग हातात घेऊन तसाच उभा होता. बाबा दाढी खाजवत होते. आणि त्या बायका बोलताना पुढे झुकून बोलत होत्या.

चौथी म्हणाली, “आम्हाला फक्त दूध हवंय, भाईजान, आम्हाला थोडं दूध द्या.”

“पण तुम्ही आलात कुठून?”

पहिली दुसरीच्या खांद्यावर डोकं टेकत म्हणाली, “मी सांगते, भाईजान, आम्हा सर्वांना फार लहान बाळं आहेत... त्यांना दूध नाहीये. तेवढंच हवंय. आमच्या आत आता त्यांना पाजायला दूधच उरलं नाही. म्हणून आलोय.” तिच्या तोंडातून रडतारडता आलेल्या लाळेच्या तारा दिसत होत्या. “सारा दिवसभर चालत आलोय आम्ही. घरं, बागा, तारेची कुंपणं, भिंती, ओढेनाले ओलांडत येऊन कशाबशा पोहोचलो आहोत, आम्हाला थोडं दूध दे रे, भावा, भीक घाल एवढी आम्हाला...”

“थोडंसं दूध,” चौथी बाई म्हणाली. “नाहीतर आमची तान्हुली मरून जातील. झुबेदाची मुलगी काल रात्री मरून गेली... ऐकताय ना... ऐकताय ना भाईजान?”

ती तिसरी पुन्हा बोलू लागली, “आमच्या छात्या आता सुकून गेल्या... बाळांसाठी काहीही नाही उरलं. थेंब नाही येत...”

“घरातला सगळा तांदूळ, संपला, कडधान्य खाऊन झाली, दूध यावं म्हणून बागेतलं गवतही खाऊन संपवलं आम्ही.. आता आमची अब्रूही संपवतोय...” त्यातली वयाने सर्वात मोठी- आतापर्यंत गप्प होती, ती विव्हल हुंदका देत म्हणाली, “बघा, माझ्या छातीत आता काहीही राहिलं नाही.” तिने तिचा फेरान वर उचलला... पोटाच्या खळग्यावर दोन सुकून गेलेले, निळे पडलेले स्तन... स्तनाग्रांभोवती चावल्याच्या जखमा झालेल्या...

बाबांनी नजर वळवली... मी अश्रू आवरत स्तब्ध उभा राहिलो... तिच्या छातीवर पुवाचा टपोरा दाणा होता.

"माझं बाळ मरेल... मरेल माझं बाळ..." मागची एक बाई आक्रोशू लागली...

"मला दूध दे, मी माझी एक मुलगी तुला देईन-"

"फक्त दूध हवंय, भाईजान... फक्त दूध..."

सगळ्यांच्या तोंडून कोरससारखे तेच शब्द फुटू लागले...

"आम्हाला रिकाम्या हाती पाठवू मका, भायू... नका विन्मुख पाठवू... खूप दूरवरून आलोय आम्ही आशेने..."

"संपेल हे कधीतरी... खरंच संपेल... मग दूध मिळेल. कर्फ्यूचा राजा मरून जाईल एक दिवस... आणि मग दूध मिळेल..."

---

द कोलॅबोरेटर या मिर्झा वाहीद नावाच्या काश्मिरी लेखकाच्या कांदबरीतले हे एक प्रकरण... पुस्तकाबद्दल बोलताना एका साहित्य विषयक परिषदेत साहित्याच्या प्राध्यापिकेने सांगितलेलं... तुम्ही वाचलंत तर तुम्हाला वाटेत यात अतिशयोक्ती आहे. पण खरं तर हे खूप सौम्य करून लिहिलेलं सत्य आहे...

कर्फ्यू, झडती, लष्कर, दहशतवादी या सर्वांच्या जात्यात भरडून निघालेलं काश्मिरी जीवन आपल्याला खऱ्या अर्थाने कधीच माहीत होणार नाही. पण नेहमीच- कष्ट, अन्याय भोगणाऱ्या समाजातल्या स्त्रिया सर्वाधिक नरक भोगत असतात...

पंडितांची कत्तल झाली, त्यांच्या स्त्रियांवर बलात्कार झाला असं खूप जोरात सांगणारे आता त्याचा बदला घेण्याची भाषा करीत आहेत. कारण तसं न करणं ही सद्गुण विकृती आहे असं सांगणारी अधम वैचारिकता झिरपत मान्य झाली आहे.

किंवा ३७० आणि ३५ अ रद्द झाल्यानंतर काश्मीरच्या गोऱ्या मुलींशी आमचे तरुण लग्न करतील असं एक लोकनेता जाहीर सभेत सांगतो आहे... किंवा बघा आता अशा सुंदर काश्मिरी तरुणींशी तुम्ही लग्न लावू शकता- असं म्हणत कुठल्यातरी अज्ञात काश्मिरी मुलींचे फोटो फिरवले जात आहेत...

ते पाहून ऐकून कोलॅबोरेटरमधले हे प्रकरण हंबरडा फोडत आठवून गेले... फार काही बोलायची गरज उरली आहे का आता?

थांबावे इथेच.

जमलं तर काश्मीरसंबंधीचे केवळ राजकीय कथन ऐकून न थांबता, त्यांच्या साहित्यातही डोकावून पहा... सुखदुःखाचा आरसा असलेले साहित्य कदाचित् थोडे सत्यही सांगून जाईल आपल्या कानांत.

***

रोजचे आयुष्य जगताना, कुटुंबासोबत जगताना, आपल्या माणूस म्हणून जबाबदाऱ्या सच्चेपणाने निभावताना, पुढे जाताना बुद्धीचे, प्रतिभेचे पंख पसरू पाहाताना स्त्रियांच्या पायातल्या बेड्या निघाल्या आहेत पण कोळीष्टके चिकटून राहिली आहेत. याचे भान आणायची स्त्रियांना- मुलींना, तरुणींना, प्रौढा आणि वृद्ध स्त्रियांनाही गरज आहे. आणि ही कोळीष्टके साफ करण्यासाठी परखड सत्याचा, विवेकनिष्ठेचाच व्हॅक्यूम क्लीनर वापरावा लागेल. कोळीष्टके विणणारे कोळीही गारद करावे लागतील आणि पुन्हा कुठे नवी जळमटे निघू नयेत म्हणून मनाचे कानेकोपरे नेहमीच लखख ठेवावे लागतील. हे रोज करावे लागणारे काम आहे. स्थित्यंतराचा काळ तसा कधीच संपत नसतो. समाजाची उत्क्रांती होणे ही सततची प्रक्रिया आहे. आणि ती आपोआप होत नसते तर त्या उत्क्रांतीचा कारक समाजाचा प्रत्येक घटक असू शकतो. मागे खेचणारे कारक जसे असतील तसेच पुढे नेणारेही असतात. विवेकनिष्ठा म्हणजे अखेर काय? सामाजिक उत्क्रांतीमध्ये विवेकनिष्ठ स्त्रीचा सहभाग कसा असू शकतो?